म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १७०८
IRBK-0101708
IRBK-0101708
IRBK-0101708

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पै. जादा वर्गणी भरावी लागेल.

13 JUL 1982

19 MAR 1978

JUL 1978

1979

30 DEC 1979

12 JUN 1980

MAY 1981

30 MAY 1981

5 JUN 1981

8 JUL 1981

27 AUG 1981

# दिव्यावरती अंधेर

कथा
१८१

म. प्र. ग्रं. ठाणे, बालवाङ्मय शाखा.
१७०८

अनंत काणेकर

बी. ए. एल्एल्. बी.

IRBK-0101708

सागरसाहित्य

बा. द. सातोस्कर बी. ए.

१९४०

मुद्रक
ज. द. सातोस्कर
सागर साहित्य छापखाना
त्रिभुवन रोड मुंबई. ४

संपादक व प्रकाशक
बा. द. सातोस्कर बी. ए.
सागर साहित्य कार्यालय
त्रिभुवन रोड मुंबई. ४

ह्या आवृत्तीचे
सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

किं. १। रु.

—० सोल एजंट ०—
हिरजी मोहनजी
लोहाणा सिनेटरी, शंकरबारी लेन, मुंबई ४.

# अनुक्रम


| कथा | पृष्ठ |
| --- | --- |
| बहिणी | १ |
| प्रोफेसर | १७ |
| कुमारिका | ३० |
| कामकरीण | ४१ |
| नीतिमत्ता | ५२ |
| कम्युनिस्ट | ६३ |
| सृष्टिमाता | ७८ |
| कविवर्य | ८९ |
| क्रांतिकारक | १०४ |

# सागर साहित्य

## आमचें वाङ्मय.


| | | | |
|---|---|---|---|
| १ | सागराच्या लाटा | : प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई | : १ रु. |
| २ | गुलाब गेंद | : जयवंतराव सरदेसाई | : १२ आणे |
| ३ | वादळांतील नौका | : प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई | : १ रु. |
| ४ | कुळागर | : सं.– बा. द. सातोस्कर | : १ ,, |
| ५ | वैमानिक हल्ला | : भा. वि. वरेरकर | : १। ,, |
| ६ | निशिकांतची नवरी | : अनंत काणेकर | : १० आणे |
| ७ | तुटलेले तारे | : ,, ,, | : १ रु. |
| ८ | कारंजाचे तुषार | : व्यं. अ. पै रायकर | : १। ,, |
| ९ | किनाऱ्यावर | : प्रो. वि. द. साळगांवकर | : १ ,, |
| १० | धुक्यांतून लाल ताऱ्याकडे | : अनंत काणेकर | : २। ,, |
| ११ | उंबराचीं फुलें | : ह. वि. देसाई | : १ ,, |
| १२ | दिव्यावरती अंधेर | : अनंत काणेकर | : १। ,, |

४ आणे प्रवेश फी भरून कायम ग्राहक होणाऱ्यास 'साहित्या'चें प्रत्येक पुस्तक पाऊणपट किंमतीस मिळेल.

**'सागर साहित्य' कार्यालय**

त्रिभुवन रोड, मुंबई ४

कथा१९९

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. ........ नों. दि. ..........
वि. ............ क्र. ........ .....

अंधार नेहमी दिव्याखालीं, — दिव्यावर नेहमी प्रकाश; सद्गुणाला नेहमी यश, दुर्गुणाला अपेश; आळशी दुःखांत आणि उद्योगी सुखी; असंच नेहमी असतं किंवा असावं, असं आपणाला वाटतं. पण जगाचा अनुभव बहुधा उलटाच येतो. या कथामालेचा हाच विषय आहे. हा एकच विषय नऊ कथांतून वेगवेगळे प्रसंग आणि वेगवेगळीं पात्रें घेऊन रंगविला आहे. 'The Ant and the Grasshopper' या सॉमरसेट् मॉम्च्या लघुकथेचाही हाच विषय आहे. दोन भावांपैकीं टोळा-

सारखा जो उनाडटप्पू असतो त्याचें आयुष्य सुखपर्यवसायी होतें; आणि मुंगीसारखा उद्योगी भाऊ हलाखींत दिवस काढतो! 'वहिणी' या माझ्या पहिल्याच गोष्टींत असाच प्रकार दाखविला आहे. माझ्या गोष्टींतलीं पात्रें, प्रसंग, घटना वेगळ्या आहेत; पण विषय तोच आहे. अर्थात् माझ्या नऊही गोष्टींचा विषय तोच आहे. तरी पण मॉमच्या गोष्टीचा परीणाम माझ्या मनावर झालेला असणारच. त्याचप्रमाणें 'क्रांतिकारक' ही गोष्ट अगदीं स्वतंत्र असली तरी माझ्या शंभर टक्के स्वदेशी मालवणी 'आई'ची कथा वाचतांना गॉर्कीच्या 'आई'ची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. म्हणूनच या दोन श्रेष्ठ साहित्यिकांचा मी इथें कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतों.

एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. या बोधकथा नाहींत. म्हणूनच, 'कामकरीण' या लघुकथेची नायिका गिरणींत राबत होती तेव्हां तिला अन्न मिळणें मुष्किल झालें, पण ती रखेली झाल्याबरोबर तिला सुखाचे दिवस आले, हें दृश्य पाहून कुठल्याहि शिष्टमान्य धंद्यापेक्षां देहविक्रयाचा धंदा बरा, असें तात्पर्य कुणी काढूं नये! बोध काढायचाच असला, तर ज्या समाजांत प्रामाणिक कामकरणीपेक्षां रंगेल रखेली अधिक सुखी होऊं शकते त्या समाजाचा पाया जितक्या लवकर उखडला जाईल, आणि देहविक्रयापेक्षां समाजोपयोगी कामाला ज्यांत अधिक मोल मिळेल असा समाज जितक्या लवकर अस्तित्वांत येईल तितकें बरें, असाच बोध काढावा!

—लेखक

# बहिणी

आजीबाईंच्या बोलण्यांत तरी खोटं काय होतं ! दुसऱ्या कुणीही तेंच म्हटलं असतं. सुलीला त्या नेहमीं म्हणत, "सुले, बाकी जगाचं सोडून दे. पण निदान आपल्या बहिणीकडून तरी कांहीं शीक. तुझं होणार कसं पुढें ? तुझ्या या असल्या वागण्यानं तुझं लग्न होणं कठिण दिसतं, बाई. मला नाहीं वाटत कुणी समजुतदार पुरुष तुला गळ्यांत बांधून घेईल. आमच्या शांतीची मात्र मला मुळींच काळजी नाहीं. तिचा सोन्यासारखा संसार बघून मग मात्र तुझ्या डोळ्यांत पाणी येईल..."

आजीबाई नेहमीं असं कांहींतरी बोलत; आणि तितकेंच वेळां सुलीही आपलं नेहमींचं उत्तर देई; "पुरे झालं बाई, आजी, तुझं पुराण. किटले कान ऐकून ऐकून. तुझी शांती

कुणाची तरी राणी होईल नी मी भिकारीण होईन इतकंच ना? होऊं दे झालें तर!"

सुलीनं असं उत्तर दिलं कीं आजीबाई चिमणीएवढं तोंड करून बसत आणि म्हणत, "राहवत नाहीं म्हणून बोलतें, सुले, तुझं वाईट व्हावं असं कां वाटतं मला?"

सुली वेणीचा शेंपटा उडवून फणकाऱ्यानं तिथून निघून जाई.

आजीबाईंना सुलीनं असं कांहीं उद्धट उत्तर दिलं, कीं सुलीच्या आईलाही वाईट वाटे आणि राग येई; पण सुलीपुढें कुणाचाच इलाज नव्हता. ती आणि तिचं नशीब,—काय व्हायचं तें होवो, असं प्रत्येकानं ठरवून टाकलं होतं.

शांती मोठी बहीण. शांतीच्या आणि सुलीच्या वयांत फारतर दीडदोन वर्षांचा फरक असेल. शांती जवळ जवळ वीस वर्षांची होती. मुंबईतल्या एका कॉलेजांत बी. ए. च्या वर्गात ती होती. त्याच कॉलेजांमध्यें इंटरच्या वर्गात सुली शिकत होती. मुंबईचे प्रसिद्ध डॉ. रत्नपारखी यांच्या दोघी मुली. दोघीही सख्ख्या बहिणी. पण दोघींत केवढा फरक! शांती गोरटेली, नाकाडोळ्यानं चांगलीच देखणी, शांत, धिम्या स्वभावाची आणि अगदींच खालच्या मानेची. सुली काळीसांवळी, रूपानं सर्व-सामान्य, पण तरतरीत, बेफाम नखरा करणारी आणि देवाच्या बापालाही उद्धट उत्तरं देणारी.

कॉलेजचा वार्षिक उत्सव होता. शांतीनं आणि सुलीनं दोघींनींही वर्गणी भरली होती. पण गॅदरिंगच्या दिवशीं शांती ह्मणूं लागली, "मी नाहीं येत, बाई. मला नाहीं आवडत ती आरडाओरड आणि पोरांचा फाजीलपणा. सोडा नी लेमनचीं ग्लासं हातांत घेऊन मुलींच्या मागें काय लागतात नी आग्रह काय करतात. इश्श ! मी नाहीं येत......"

मोठीं थोरलीं काळीं फुलं अंगावर असलेलं, काळ्या किनारीचं लाल रंगाचं जॉर्जेटचं गोल पातळ नेसून आणि खांद्याला टेकणारे लाल रंगाचेच कांचेचे लोलक कानांत घालून गॅदरिंगला जायला सुली तयार झाली होती. शांतीनें आयत्या-वेळीं हातपाय गाळलेले पाहून आपणाला एकटंच जावं लागणार या कल्पनेनें सुली संतापानें लाल झाली. "आलंच पाहिजे तुला. येतेस कीं नाहीं ?" ती ओरडली. आणि एक साधं, सफेत, नऊवारी रेशमी पातळ शांतीला नेसायला लावून आपल्याबरोबर यायला सुलीनं तिला भाग पाडलं. शांती त्या साध्या पातळांतही सुलीपेक्षां चांगली दिसत होती.

रात्रीं आठ वाजतां गॅदरिंग संपलं, आणि मुलं घरोघर निघून गेलीं. बागेंत खाण्यापिण्याचीं टेबलं मांडलीं होतीं, तिथं गॅदरिंगच्या मॅनेजिंग कमिटींतलीं सातआठ मुलं, चारपांच मुली आणि एकदोन प्रोफेसर खात, पीत, गप्पा मारीत बसले होते. मॅनेजिंग कमिटींत असल्यामुळें सुलीही मागें राहिली होती. घरीं जायला उशीर होतो म्हणून छाती धडधडत असतांही

शांतीलाही तिच्यामुळें ताटकळत रहावं लागलं होतं. मंडळी बसली होती तेवढयाच खुर्च्या बागेंत होत्या. बाकीच्या शिपा-यांनीं उचलून नेल्या होत्या. कुठेंतरी कामांत अडकल्यामुळें सुलीला यायला थोडा उशीर झाला. तिथें आल्यावर तिनं इकडे तिकडे पाहिलं तों बसायला खुर्ची नाहीं. तिची थट्टा करण्या-करतां ते प्रोफेसर आणि मुलं तिला उठून मुद्दाम खुर्ची देईनात. सुली इकडे तिकडे पहात होती. सुलीची धांदल पाहून मुलं आणि मुली खो खो हंसत होत्या. शांती उठून तिला खुर्ची देणार होती, पण शेजारच्या मुलीनं तिला घट्ट धरून ठेवली. सुली मुलांकडे बघून ओरडली, "तुह्माला कांहीं 'Chivalry' आहे. कीं नाहीं.?" तिला चिडवायचं मुलांनीं ठरवलंच होतं. मुलं ह्मणाली, "No. No. Ground for the late-comers!" "अस्सं काय?" सुली उद्गारली! दाणदाण पाय आपटीत ती पुढें गेली; आणि त्यांच्यापैकीं अत्यंत वात्रट जो होता त्याच्या मांडीवर जाऊन बेधडक बसली. सर्व मुलं आणि मुली मोठ-मोठयानें हंसू लागल्या. तो बिचारा लाजला, आणि सुलीला त्यानं जागा करून दिली. सुलीचं हें कृत्य पाहून शांती लाजून अर्धी मेली झाली. तिनं मान खालीं घातली. तिच्या मानेवरही लाल रंग चढला होता. ते प्रोफेसर वर वर हंसत होते. पण सुलीची ही धिटाई पाहून त्यांनाही मनांत धक्का बसला होता.

शांतीला तिथं बसवेना. ती जायला उठली. "सुले, नऊ वाजायला आले. चल घरीं," ती म्हणाली. "मी नाहीं

येत. तूं जा हवी तर," सुली ताडकन् उत्तरली, "हे सप्रे मला नी शालिनीला रीगलच्या दहाच्या शोला नेणार आहेत. कालच कबूल केलं आहे त्यांनीं. आईला सांग मी बारासाडेबाराला येईन घरीं म्हणून. सप्रे, तुम्ही आपल्या मोटारींतून मला पोंचवालच!"

"Of Course!" सप्रे डोळे मिचकावीत ह्मणाला.

शांती घरीं निघून गेली. आईनं जेव्हां विचारलें, "सुली कुठं आहे ग?" तेव्हां शांती ह्मणाली, "तिला कमिटीचं कांहीं तरी काम आहे. हिशोब वगैरे आजच्याआज पुरे करायचे आहेत त्यांना. काम आटपलं, कीं प्रोफेसर पंडित घरीं पोंचवतील तिला आणून." आईचं समाधान झालं.

सुलीचं कसं होणार ह्मणून आई,आजी, बाबांना काळजी वाटतच होती. शेवटीं सुलीनं त्यांच्या काळजाला द्यायचा तो धक्का दिलाच. शांतीची आणि सुलीची इला मलकानी नांवाची कॉलेजमधली एक श्रीमन्त सिंधी मैत्रीण होती. तिच्याकडे त्या नेहमी जात येत. एका शनिवारीं त्या तिच्याकडे गेल्या तेव्हां एका नवीनच पाहुण्याची आणि त्यांची इलानं ओळख करून दिली. तो पाहुणा दुसरा तिसरा कुणी नसून इलाचा भाऊ मोहन मलकानी होता. आदले दिवशींच तो विलायतेहून परत आला होता. मोहन विलायतेंत बारा वर्षं होता. लंडन युनिव्हर्सिटीच्या एम्. ए., डी. एससी. पदव्या घेऊन तो परत आला होता. त्याचं वय असेल पंचवीस सव्वीस वर्षं. उंच,

गोरा, बांधेसूद, एखाद्या खानदानी युरोपियनसारखा तो दिसे. तांबडे गाल, पिंगट केंस, यामुळें त्याला साहेब ह्मणून कुणीही फसला असता. लंडनहून येण्यापूर्वीच मुंबईंतील सरकारी रसायन-शाळेचा प्रमुख ह्मणून आठशें रुपयांवर त्याची नेमणूक झाली होती.

शांतीची आणि सुलीची इलानं त्याच्याशीं ओळख करून दिली, तेव्हां शांतीच्या रेखीव चेहऱ्याची एकदम त्याच्यावर छाप बसली. तो आणि इला संध्याकाळीं सिनेमाला जाणार होतीं. त्यानें आग्रह करून शांतीला आणि सुलीला आपल्याबरोबर यायला लावलं. त्याच्या गोड आग्रहाला त्यांना 'नाहीं' म्हणणं शक्यच नव्हतं. थिएटरांत गेल्यावर शांतीच्या शेजारीं बसण्याचा त्यानं कलापूर्ण शिताफीनें प्रयत्न केला. पण शांतीनं अंग चोरलं आणि चटकन् ती दुसऱ्या खुर्चीवर बसली. त्यामुळें त्याला सुलीच्या शेजारीं जागा मिळाली. सुली, तो, इला आणि शेवटीं शांती अशा अनुक्रमानें तीं बसलीं होतीं. काळोख होऊन चित्रपट सुरू झाला. नायकनायिकेमधला कसला तरी प्रणयोत्कट प्रसंग पडद्यावर रंगत होता. काळोखांत त्याचा हात चुकून सुलीच्या हातावर पडला. सुलीनं पटकन् तो तिथच्या-तिथं दाबून धरला. सिनेमा संपला, आणि मंडळी घरोघर निघून गेली.

सुलीची आणि मोहनची मैत्री दिवसेंदिवस दाट होत चालली होती. आई, आजी, वडील बोलून बोलून तिचा जीव

खात होतीं; रडत होतीं, ओरडत होतीं. तिचं तिकडे लक्ष सुद्धां नव्हतं. शांतीचं लग्न घरच्या मंडळींनीं एका गरीब पण घरंदाज मुलाशीं जमवून ठेवलं होतं. सुलीचे हे चाळे बघून शांतीचं लग्न त्यांनीं तावडतोब उरकून घेतलं. शांतीच्या लग्ना-नंतर कांहीं दिवसांनीं सुली एके दिवशीं संध्याकाळीं कॉलेज-मधून म्हणून परत आली. खरोखर ती दुसऱ्याच ठिकाणाहून परत आली होती. घरांतल्या सर्व मंडळींसमोर उभी राहून तिनें निश्चित स्वरांत जाहीर केलं, "आतांच रजिस्टर पद्धतीनं मोहनशीं लग्न करून मी परत आलें आहे. आजपासून मी त्याच्याकडे रहायला जाणार!"

सर्व माणसं डोळे फाडून तिच्याकडे पहात होतीं. ती आपल्या खोलींत गेली, बॅगेंत आपले कपडे भरले आणि बॅग घेऊन तडक बाहेर निघून गेली. बाहेर रस्त्यावर मोटार घेऊन मोहन वाट पहात होता. आई, आजी, वडील दगडी पुतळ्या-सारखे तिच्या या हालचालींकडे स्तब्धपणें पहात होते. ती गेल्यावर एकदोन मिनिटांनीं सर्वांनीं श्वास खालीं टाकला. सुली-चा सर्वनाश झाला,—सुली आपणाला जन्माची अंतरली, या कल्पनेनें सर्व माणसें दुःखांत चूर झालीं.

चार वर्षे केव्हांच उडून गेलीं. सुली नेहमीप्रमाणें आप-ल्या तीन वर्षांच्या कुमारला घेऊन शनिवारीं संध्याकाळीं माहेरीं आली होती. साहेबाच्या मुलाप्रमाणें दिसणाऱ्या आपल्या गोऱ्या-पान, गुटगुटीत नातवाचें आई, आजी, बाबा कौतुक करीत होते.

कांहीं वेळानें सुली जायला उठली. बाहेर उभ्या असलेल्या आपल्या लाल लान्सिया मोटरमध्यें जाउन ती बसली. मोटर चालू झाली तशी तिच्या गळ्याभोंवती गुंडाळलेला लाल रेशमी स्कार्फ हवेंत फडफडू लागला. दारांत उभी असलेली आजी त्या फडकणाऱ्या लाल फडक्याकडे, आणि आपल्या गोऱ्यापान पंत-वंडाकडे कौतुकानें पहात होती. इतक्यांत दाराच्या फाटकांतून आंत येत असलेली शांती तिच्या दृष्टीला पडली. शांती आंत गेली तरी आजी बाहेर दारांतच उभी होती. शांतीबरोबर एक कडेवर, दोन हातांत अशीं तिचीं तीन हाडकुळीं मुलं होतीं. शांती एक विरलेल लुगडं नेसली होती. तिचे डोळे खोल गेले होते. केस गळून एकेकाळचा तिचा भरदार अंबाडा सुपारीएवढा झाला होता. तिच्या नवऱ्याची वकीली चालेना, म्हणून एका शाळेंत त्यानें मास्तरकी पतकरली होती. तीही नोकरी अलिकडे गेली होती. गिरगावांतल्या एका चाळींत दोन खोल्यांच्या गाळ्यांत शांती आणि तिचा नवरा रहात असत. बापाकडून मधून मधून चार पैसे घेऊन शांती अलीकडे संसार चालवीत होती.

सुलीची मोटर दूर जाईपर्यंत आजी रस्त्याकडे पहात होती. मोटार दिसेनाशी झाल्यावर आजी स्वतःशीं पुटपुटली, "मला वाटलंच होतं, ही मुखदुर्बळ शांती काय करणार? सुली कशी मजेंत आहे पहा!"

# प्रोफेसर

प्रो. चाफळकरांचं त्या वर्षाच्या पहिल्या टर्मचं तें पहिलंच लेक्चर होतं. लेक्चर संपल्यावर बी. ए. साठीं तत्त्वज्ञान घेतलेले ज्यूनिअर बी. ए. चे दोनतीन विद्यार्थी कॉलेजच्या पायऱ्या उतरत होते. त्यांचे डोळे आनंदानें चमकत होते.

"छे बुवा, तत्त्वज्ञानासारखा विषय इतका interesting असेल असं वाटलं नव्हतं," त्यांच्यापैकीं एक म्हणाला. त्यानं बी. ए. साठीं संस्कृत आणि इंग्लिश घेतलें होतं, पण आपल्या इतर मित्रांबरोबर तत्त्वज्ञानाच्या वर्गात आज पहिल्या दिवशीं तो सहज गमतीनें येऊन बसला होता.

"आमचे प्रोफेसर चाफळकर आहेतच तसे," त्याचा मित्र म्हणाला, "त्यांच्या वाणीचा ओघ एकदां सूरू झाला. कीं Ethics, Metaphysics हे जाडे जाडे विषय एखाद्या अद्भुतरम्य कथेसारखे मनोवेधक वाटतात."

"खरंच. भलतेच रंगून जातात आपल्या विषयांत चाफळकर," पहिला विद्यार्थी म्हणाला, "सोडून देऊं कां Languages? येतों उद्यांपासून तुमच्या Philosophy ला!" दरवर्षी प्रो. चाफळकरांवर विद्यार्थी असेच खूष असत. अत्यंत प्रेमळ स्वभाव, आणि तत्त्वज्ञानासारखा कठिण विषय शिकविण्याची असामान्य हातोटी, यामुळें केवळ प्रो. चाफळकरांसाठीं कितीतरी विद्यार्थी बी. ए. साठीं तत्त्वज्ञान घेत.

विद्यार्थ्यांचे घोळके कॉलेजच्या आवाराच्या बाहेर पडून गेले होते. प्रो. चाफळकर एका हातांत हॅट आणि एका हातांत आपली पुस्तकांची बॅग घेऊन जिन्यावरून खालीं उतरत होते. आधींच भव्य असलेलं त्यांचं कपाळ टक्कल पडल्यामुळें अधिकच भव्य दिसत होतं. तसं त्यांचं वय फार नव्हतं. असेल बत्तीस तेहेत्तीस. त्या गुळगुळीत टक्कलामुळें त्यांच्या रूपाला मुळींच कमीपणा आला नव्हता. उलट त्यामुळें त्यांच्या चेहेरेपट्टीच्या धीरगंभीर सौंदर्यांत अधिकच भर पडली होती. उंच, सडसडीत बांधा, गोरापान तुकतुकीत चेहेरा, घारे स्वप्नाळू डोळे, तरतरीत सरळ नाकावर तो बिनकाड्यांचा चष्मा, चायनासिल्कचा स्वच्छ सूट, पांढऱ्या शर्टवर हिरवी किंवा काळी टाय्, एका हातांत ती चुरगळलेली फेल्ट हॅट आणि काखेंत दोन तीन पुस्तकें—केव्हांही पाहलं तरी ते या थाटांत आढळत. त्यांच्याशीं लाडीगोडी करीत हंसत खिदळत बी. ए. च्या वर्गांतल्या दोन तीन मुलीही जिन्यावरून खालीं उतरत होत्या. त्या जितकी

अधिक लगट करीत तितके प्रो. चाफळकर अधिक अंग चोरीत. हातांतल्या फेन्ट हॅटशीं चाळा करीत मधून मधून ते डोळे वर करीत आणि 'Yes' 'no' म्हणून कांहीं तरी उत्तर देत. ते मुलींना लाजत आणि त्यांच्यापासून दूर रहाण्याचा प्रयत्न करीत म्हणूनच कीं काय, मुलींचे घोळकेच्या घोळके त्यांच्या मागें लागत. इतर प्रोफेसर वर वर हंसत; पण मनांतून चाफळकरांचा त्यांना हेवा वाटे.

चाफळकरांच्या घरीं त्यांची म्हातारी आई आणि ते यांच्याखेरीज दुसरं कुणीच नव्हतं. त्यांत आणखी आईला अलीकडे अर्धांगवायूचा झटका येऊन ती अंथरुणाला खिळली होती. लग्न करण्याचा म्हातारीनें त्यांना परोपरीनें आग्रह केला पण आपलीं पुस्तकं आणि कॉलेज यापुढें चाफळकरांना कांहींच दिसत नव्हतं. "हवं कशाला लग्न?" ते आईला म्हणत, "तूं नी मी आहोंत तें ठीक आहे, आई. स्वयंपाकी आहे, गडी आहेत, आणखी काय हवं?" मोठमोठ्या श्रीमंत घराण्यांतल्या घरीं सांगून आलेल्या कितीतरी सुंदर मुली त्यांनीं नाकारल्या होत्या. त्यांनीं ध्येय ठरवून टाकलं होतं—होतां होईल तों लग्नच करायचं नाहीं. श्रीमंत आणि फार शिकलेल्या मुलीशीं तर नाहींच करायचं; "श्रीमंतींत वाढलेली आणि फॅशनेबल बायको नाहीं, बुवा, झेंपणार आपल्याला!" ते नेहमीं म्हणत. करायचंच झालं लग्न तर गरीब घराण्यांतल्या एखाद्या साध्या, साधारण शिकलेल्या मुलीशीं करायचं. सुलभा वापट नांवाची

मुंबईतल्या एका श्रीमन्त गिरणीमालकाची एकुलती एक मुलगी त्यांच्या कॉलेजांत होती. ती सारखी त्यांच्या मागें असे. कांहीं तरी कारण काढून ती त्याच्या घरीं येई आणि तासचे तास गप्पा करीत बसे. सुलभेला चाफळकरांशीं लग्न करायचं आहे अशी कॉलेजांत आणि गांवांत दाट वदंता होती. फार काय, चाफळकरांच्या आईलाही तसेंच वाटत होतें. ती एकदां म्हणाली-सुद्धां, "त्या सुलभेशीं कां नाहीं रे तूं लग्न करीत? किती सुंदर आणि चुणचुणीत मुलगी आहे ती!"

चाफळकरांनां धक्काच बसाला. "छे, छे आई, भलतंच काय बोलतेस", ते म्हणाले, "तिचं एकाद्या आय्. सी. एसशीं लग्न ठरलंही असेल. आमच्यासारख्यानीं तिच्याशीं लग्न करून करायचं काय?" ही दोन वर्षांपूर्वीची गोष्ट. त्यानंतर सुलभा बी. ए. होऊन एम्. ए. चा अभ्यास करीत होती. चाफळकरांचं तिच्याकडे लक्ष नव्हतं तरी सुलभेनं आपला प्रयत्न सोडला नव्हता. ती त्यांच्याकडे नेहमी यायची, आणि हरतऱ्हांनीं त्यांचं मन आपल्याकडे ओढून घ्यायचा प्रयत्न करायची. चाफळकरांनां मात्र तिच्या मनाचा थांगही नव्हता. अभ्यासांतल्या अडचणी सोडवून घ्यायला बिचारी येते, असेंच त्यांना वाटे.

यंदा मात्र आईनं अगदीं धरणंच धरलं. मी आतां लवकरच मरेन,—माझी शेवटची इच्छा तरी पुरी कर, असं ती म्हणूं लागली. तेव्हां चाफळकरांनीं लग्न करायचं ठरवलं. आपल्या

ध्येयवादाला जागून पुण्यांतल्या एका गरीब कारकुनाच्या कुटुं-बातल्या मुलीशीं त्यानीं लग्न केलं. गीताबाईना आईबाप कुणीच नव्हते. त्यांच्या काकांनीं त्यांना लहानाचं मोठं केलं. लग्नाच्या वेळीं त्या अगदीं साध्या होत्या. त्यांचं वय बावीस वर्षांचं होतं. त्यांचं शिक्षणही इंग्रजी चारपांच इयत्तापेक्षां अधिक झालं नव्हतं. पण चारशें रुपये पगाराच्या प्रोफेसराची बायको होऊन मुंबईचं पाणी लागल्यापासून त्यांच्यांत झपाट्यानं बदल होत होता. पांच वर्षांपूर्वीची विटलेलं नऊवारी पातळ नेसणारी, गार्टर लावा-वयाची माहितीही नसल्यामुळें पायाच्या उघड्या पोटऱ्या दाख-वीत असलेली, घट्ट अंबाडा बांधणारी पुण्यांतील गीता; आणि रेशमी गोल पातळ नेसलेल्या, बिनबाह्यांचा ब्लाऊझ घातलेल्या, पाठीवर वेणीचा शेपटा सोडलेल्या, कानांतले इअरिंग्ज उडवीत ठुमकत चालणाऱ्या आतांच्या गीताबाई चाफळकर, या दोघी एकच यावर कुणाचा विश्वासही बसला नसता. लग्न झाल्या-पासून साधारणपणें एक वर्षभर आपला नवरा आणि अंथरु-णाला खिळलेली सासू यांच्याशीं गीताबाईचें पटलें. पुढें पुढें सासूबाईशीं तर त्यांनीं बोलणेंच सोडलें. नवऱ्याशीं बोलणें होई तें कडाक्याचें भांडण करण्यासाठीं. अर्थात् भांडण करीत गीताबाई; चाफळकर नुसते ऐकून घेत. त्या घरांतल्या तीन माणसांना एकत्र धरून ठेवणारा फक्त एकच धागा होता. तो म्हणजे चार वर्षांचा शरद्. चाफळकरांचा शरद् जीव कीं प्राण होता. त्याला आंघोळ घालणं, त्याचे कपडे घालणं, त्याच्या

खाण्यापिण्यावर लक्ष ठेवणं, सर्व कांहीं चाफळकर स्वत: करीत. त्यानं कांहीं खोड्या केल्या तर त्याच्या पाठीवर धपाटे मारण्याचं काम मात्र त्यांची आई करी. शरद्ला आपल्यापेक्षां बापाचा लळा अधिक आहे हें पाहून गीताबाई रात्रंदिवस जळत.

चाफळकरांविरुद्ध गीताबाईची मुख्य तक्रार म्हणजे त्यांचं आपल्याकडे लक्ष नाहीं, नी आपली कसली हौस म्हणून ते पुरी करीत नाहींत. इतर प्रोफेसरांच्या बायका किती सुखी, गीताबाईना वाटे. दागिन्यांच्या नाहीं तर कापडांच्या दुकानांत तासान्तास त्यांचे नवरे त्यांच्याबरोबर फिरतात. चाफळकरांना कधीं विचारलं, जरा दुकानांत चलतां का माझ्याबरोबर?, तर त्यांचं उत्तर ठरलेलं असे, मला हें पुस्तक पुरं करायचंय् आज; तूं जा कुणाबरोबर तरी. कधीं सिनेमा पाहूं या म्हटलं, तर तूं जा यशवंतबरोबर,—मला नाहीं सिनेमा विशेष आवडत, मी शरद्ला फिरवून आणीन संध्याकाळीं, असं म्हणायचे. यशवंत गीताबाईचा कुणीसा दूरचा आतेभाऊ होता. तो आणि त्याची बायको गिरगांवांतल्या एका चाळींत रहात. आपण इन्शुरन्स एजंटचा धंदा करतों असं तो म्हणे, आणि अपटुडेट सुटांत नेहमीं हिंडे. खरोखर तो कसला धंदा करीत होता आणि कुठून कपडे आणीत होता तें त्याचें त्यालाच माहीत. त्याचें आणि त्याच्या बायकोचें मुळींच पटत नसे. निरनिराळ्या बायांबरोबर तो कुठें कुठें फिरतो हें त्याच्या बायकोच्या कानांवर येई; आणि मग आदळआपट करून सारं घर ती डोक्यावर घेई. जुनं नातं

हुडकून काढून गीताबाईशीं त्यानं खूपच गट्टी केली होती. अलीकडे तो नेहमीं त्यांच्याकडे येई. अधूनमधून अडीअडचणीला पांचदहा रुपयांची जरूर लागली, तर गीताबाईकडून ते त्याला सहज मिळत. दागिन्यांच्या दुकानांत, कपड्यांची खरेदी करायला किंवा सिनेमांत सोबत करायला तोही त्यांच्या उपयोगी पडे. बाकी या बाबतींत चाफळकरांविरुद्ध असलेली गीताबाईची तक्रार अगदीं खरी होती. त्यांना खरोखरच कसलीच हौस नव्हती. पूर्वीं पुस्तकं आणि कॉलेज या पलीकडे त्यांना जग नव्हतं. आतां पुस्तकं, कॉलेज आणि शरद् यांच्यापुढें त्यांना स्वर्गही नको होता. इतर प्रोफेसरांच्या बायका समाजांत पुढें पुढें मिरवतात त्याप्रमाणें आपणही पुढें गेलें असतें;— हुशारी, सौंदर्य, किंवा पैसा यांत यत्किंचितही आपण कमी नाहीं, पण आपला कुचकामी नवरा आपणाला पुढें आणावयाला कांहींच करीत नाहीं, या विचाराचा कांटा गीताबाईच्या मनांत सारखा सलत असे.

त्यांच्या मनांत धुमसत असलेल्या आगीचा भडका उडावयाला आणखी एक कारण होतं. कॉलेजमधल्या मुली चाफळकरांच्या घरीं नेहमी येत. अर्थात् तत्त्वज्ञानविषयांतल्या प्रश्नांचीच त्यांच्यांत चर्चा चाले. पण आपण विशेष सुशिक्षित नाहीं म्हणून आपला नवरा आपल्याबरोबर बोलत बसत नाहीं, इतर स्त्रियांच्या तांड्यांत मात्र तासान्तास तो रमूं शकतो, या कल्पनेनें गीताबाईचा संताप होई. विशेषतः सुलभा बापट आली,

कीं गीताबाईच्या तळपायाची आग मस्तकांत जाई. एम्. ए. झाल्यावर सुलभा तत्त्वज्ञानाची ॲसिस्टंट प्रोफेसर म्हणून कॉलेजांत होती. फिलॉसॉफी ॲसोसिएशनच्या कामांकरतां चाफळकरांकडे ती नेहमी यायची. एकदां रात्रीं साडेआठच्या सुमारास शरद्‌ला मध्यें घेऊन सुलभा आणि चाफळकर असंच कांहींतरी बोलत बसलीं होतीं. गीताबाई बाहेरून कुठूनशा आल्या. बरोबर यशवंत होताच. चाफळकरांकडे आणि सुलभेकडे मिस्किल नजरेनें पाहून यशवंतनें गीताबाईकडे एकदां पाहिलं. गीताबाई फणकाऱ्यानं पुढें गेल्या. सुलभा जरा चपापल्यासारखी झाली, आणि कांहीं वेळानें घरीं निघून गेली. ती गेल्यावर चाफळकरांवर गीताबाई तुटून पडल्या; "ही सटवी पुन्हां घरांत येणार असेल, तर मी घर सोडून निघून जाईन. एक ती तरी राहील, नाहीं तर मी तरी राहीन!", हे शब्द ऐकून चाफळकर हतबुद्ध झाले. त्यांना या अकांडतांडवाचा अर्थच कळेना. "काय, बोलतेस काय तूं?," ते म्हणाले, "ती ॲसोसिएशनच्या कामाकरीतां मशांशीं आली होती."

"माहीत आहेत कामं!" गीताबाई ओरडल्या.

"अग, लोक तिच्याशीं लग्न कर म्हणत होते तेव्हांसुद्धां मी तिच्याशीं लग्न केलं नाहीं. उगाच भलताच संशय काय घेतेस." चाफळकर गयावया करूं लागले.

"लग्न कशाला कराल?—असा फाजीलपणा करून मला छळायची होती ना!" गीताबाई तणतणल्या, "तें कांहीं

नाहीं. तिनं पुन्हां इथं मुळींच येता कामा नये. कॉलेजांत काय गोंधळ घालायचा तो घाला!"

"वरं आहे, सांगतों मी तिला," चाफळकर म्हणाले.

दुसऱ्या दिवशीं सुलभेला चाफळकरांनीं सर्व प्रकार सांगितला, आणि आपल्या घरीं न येण्याबद्दल हात जोडून विनंती केली. सुलभेला त्यांची दया आली. तिनें तें कबूल केलें.

आणि शेवटीं कडेलोट झाला.

यशवंतनें बायकोला माहेरीं पाठवून दिली होती. गीताबाई यशवंतकडे रोज संध्याकाळीं येतात ही गोष्ट कुणीतरी परोपकारी शेजारणीनें यशवंतच्या बायकोला पत्र लिहून कळविली. एक दिवशीं संध्याकाळीं साडेसात वाजतां यशवंतची वायको एक बॅग हातांत घेऊन अवचितपणें माहेराहून परत आली. दरवाजा आंतून बंद होता. तिची खात्री झाली. तिनें जोरानें दरवाजा ठोठावला. दरवाजा ठोठावणारी आपली बायको असेल असें यशवंतला स्वप्नांतही वाटलें नाहीं. तो दरवाजा उघडावयाला आला. त्यानं दरवाजा उघडला. दारांत आपली वायको पहातांच दचकून तो जागच्याजागीं थवकला. त्याच्या तोंडांतून शब्दही फुटेना. त्याच्यासारख्या दोघांना आपटून टाकील इतकी त्याची बायको दांडगी होती. आग ओकणाऱ्या डोळ्यानी तिनं त्याच्याकडे पाह्यलं आणि सरळ ती बाजूच्या खोलींत शिरली. गीताबाई त्या खोलींत अस्ताव्यस्त पडल्या होत्या. ती आंत आल्याबरोबर पदर सांवरून गीताबाईनीं उठण्याचा प्रयत्न केला.

यशवंतच्या बायकोची रागानें शुद्ध गेली होती. त्या खोलीच्या कोंपऱ्यांत पडलेली गांठीगांठीची एक लांब काठी होती ती तिनें उचलली, आणि एकाद्या ढोराला झोडपतात तसें गीताबाईला झोडपावयाला सुरूवात केली. यशवंतला मध्यें पडण्याची छाती होईना. गीताबाई ओरडत होत्या, पण आजूबाजूच्या ब्लॉक्समधील सर्व मंडळी कुठं बाहेर गेली होती; त्यामुळें त्यांच्या मदतीस कुणीच येणं शक्य नव्हतं. शेवटीं कशाबशा त्या तिच्या ताव-डींतून सुटल्या, आणि घरीं धेऊन पोहोचल्या.

त्या दिवशीं चाफळकरांच्या आईचं दुखणंही विकोपाला गेलं होतं. ती फार दिवस जगण्याचा संभव नाहीं, असं डॉक्टरनीं स्पष्ट सांगितलं होतं. चाफळकर बेचैन होते. शरद् झोंपेला येऊन रडत होता. त्याला थोपटून त्यांनीं निजवला. अशा वेळींही आपली बायको आठआठ वाजेपर्यंत घरीं परत येऊं नये याचा चाफळकरांना राग आला होता. अगदीं मनापासून असे ते बायकोवर पहिल्यांदाच रागावले होते. इतक्यांत दाणदाण पाय आपटीत झालेल्या अपमानामुळें चवताळलेल्या गीताबाई खोलींत शिरल्या. चाफळकर रागांतच होते. गीताबाईकडे न पहातांच ते मोठ्यांदा म्हणाले, "तुला कांहीं आहे कीं नाहीं? नेहमीचं सोड, पण आई ही अशी मरते कीं जगते अशा अवस्थेंत——"

"मग मी काय करूं? मरेना!", गीताबाई गरजल्या. चाफळकरांच्या हृदयाच्या अगदींच नाजूक गाभ्याला गीताबाईनीं

डिवंचलं. त्यांचा संताप अनावर झाला. "काय, काय म्हणतेस तूं?" ते ओरडले; दोन्ही हातांनीं तिचे दंड पकडून त्यांनीं तिला गदगदा हालवलं आणि दूर ढकलून दिलं. तोल सावरतां सावरतां जवळच्या कोचावर गीताबाई पडल्या. जोरानें पडल्या-मुळें त्यांच्या मांडीवर आणि पाठीवर उठलेले काठीचे वळ दुखावले, आणि कळवळून त्या ताडकन् उठून उभ्या राहिल्या, 'तुमच्या छळाची आतां इथवर मजल आली काय?, या घरांचं पुन्हां मी तोंड पहाणार नाहीं," असं म्हणत त्या तडक घराबाहेर पडल्या.

त्यानां घरापर्यंत पोहोंचवावयाला आलेला यशवंत रस्त्यावर थोडांच पावलं पुढें गेला होता. धांवत धांवत जाऊन गीताबाईनीं त्याला गांठला. दोघांची रस्त्यांतच बराच वेळ कुजबूज झाली. यशवंतच्या डोक्यांत कांहींतरी नवीनच योजना आली. त्याचे डोळे आनंदानें चमकले. गीताबाईंना घेऊन तो सरळ पोलीस स्टेशनवर गेला. नवऱ्यानं एक काठी घेऊन आपणाला बेदम मारलं म्हणून तिथं बसलेल्या पोलील इन्स्पेक्टरपुढें गीताबाईनीं तक्रार गुदरली. पोलीसांनीं सर्व हकीगत लिहून घेतली. त्यांच्या पाठीवरचे नी मांड्यांवरचे काळेनिळे वण पाहून पोलीस अधि-काऱ्यांनाही त्यांची दया आली. ताबडतोब त्यांना गाडींत घालून त्यांनीं पोलीससर्जनकडे नेलं, आणि सर्व जखमा तपासून घेऊन त्यांचं सर्टिफिकेट घेतलं. दुसऱ्या दिवशीं चाफळकरांना पोलिस-कोर्टाचं समन्स लागलं.

या फिर्यादीच्या मागोमाग पोटगीचा दावाही गीताबाईनीं चाफळकरांवर केला होता. दोन्ही दाव्यांचा निकाल एकदमच लागावयाचा होता. खटल्याचा दिवस उजाडला. कोर्टांत चिक्कार गर्दी झाली होती. दोन्ही बाजूचा साक्षीपुरावा ऐकून घेतल्यानंतर मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं आपला निकाल द्यायला सुरुवात केली. ते म्हणाले, "...आरोपी प्रोफेसर चाफळकर यानीं आपल्या बायकोला निर्दयपणें मारलं यांत शंकाच नाहीं. आरोपी तत्त्व-ज्ञानाचे प्रोफेसर आहेत–ते असं कसं करतील असं पुष्कळांना वाटतं, पण कोर्टांत आम्हाला हा नेहमीचाच अनुभव आहे. तोंडावरून सालस दिसणारा आणि नेहमी शांत म्हणून सम-जला जाणारा माणूसही केव्हां काय करील त्याचा नेम नाहीं. पण आरोपीचा सामाजिक दर्जा, त्यांचं वय आणि त्यांचं शिक्षण लक्षांत घेऊन मी त्यानां कैदेची शिक्षा देत नाहीं. एक हजार रुपये दंड, आणि कोर्ट उठेपर्यंत साधी कैद एवढीच शिक्षा त्यांनां देण्यांत येत आहे........."

पोटगीच्या दाव्याचाही लगेच निकाल लागून गीताबाईनां महिना पाऊणशें रुपयें चाफळकरांनीं द्यावे असा हुकूम देण्यांत आला. फिर्यादीची व्यभिचारी वर्तणूक सिद्ध केल्यास पोटगी द्यावी लागणार नाहीं, असें चाफळकरांचे वकील त्यानां सुच-वीत होते. चाफळकरानां ती कल्पनाही असह्य झाली. "छेः!" एवढंच म्हणून त्यांनीं डोकं हालवलं आणि ते स्तब्ध बसले.

कोर्ट उठलें. मंडळी बाहेर पडत होती. पोराला बापाचा

ळळा आहे हें पाहून शरद्‌ला चाफळकरांजवळ रहावयाची कोर्टानें परवानगी दिली होती. शरद्‌ला घेऊन चाफळकर कोर्टाच्या आवारांतून बाहेर पडत होते. त्यांच्या पुढेंच गीताबाई आणि यशवंत जात होतीं. घरबसल्या पाऊणशें रुपये पेन्शन मिळाल्याचा आनंद त्यांच्या तोंडावर दिसत होता. शरद्‌ला चाफळकर टॅक्सींत चढवीत होते. शरद् जवळ असल्याचं त्यांचं समाधानही गीताबाईंना पहावेना.

"न्या न्या त्याला," त्या कुचेष्टेच्या स्वरांत उद्गारल्या, "तो तरी कुठं तुमचा मुलगा आहे!". आधींच घायाळ झालेल्या चाफळकरांना हा शेवटचा वार होता. चाफळकरांच्या अंगाला झिणझिण्या आल्या, आणि जवळ बसलेल्या शरद्‌कडे त्यांनीं पाहलं. त्यांना एक प्रकारची शिसारी येऊन त्यांचं अंग शहारलं. त्यांनीं तोंड फिरवलं. "बाबा, मला आई नको—मी तुमच्याकलेच ल्हानाल!" शरद् त्यांना बिलगून लाडिकपणें म्हणाला. ते झट्‌दिशीं डोळे फिरवून त्याच्याकडे पाहूं लागले. शरद्‌चे विशाल, निर्मळ डोळे त्यांच्या तोंडावर लागले होते. चाफळकरांना अनावर हुंदका आला, आणि सर्व कांहीं विसरून जाऊन त्यांनीं शरद्‌ला पोटाशीं घट्ट दाबून धरला.

# कुमारिका

बंगल्याच्या व्हरांड्यांत एका खुर्चीवर उदासीन चेहरा करून आप्पासाहेब इंदापूरकर बसले होते. त्यांच्या तोंडाकडे टक लावून पहात जवळच जमिनीवर त्यांचा आवडता कुत्रा टॉमी बसला होता. समोरच्या टेबलावर चारपांच वर्तमानपत्रं पडलीं होतीं. पण त्यांचं कुठेंच लक्ष नव्हतं. छताकडे पहात ते आपल्याच विचारांत गुंग झाले होते. पायऱ्या चढून वर येत असलेल्या भाऊसाहेब सातपुत्यांकडे त्यांचं लक्षही गेलं नाहीं. त्यांचा तो विचारक्रांत उदासीन चेहरा पाहून भाऊसाहेबांना त्यांची दया आली.

"कसला एवढा विचार करतां, आप्पासाहेब?" त्यांच्या अगदीं जवळ गेल्यावर भाऊसाहेब म्हणाले.

"काय?" एकदम दचकून त्यांच्याकडे पहात आप्पा-साहेब म्हणाले, "ओ, हो, तुम्हीं कां? या, या, बसा, भाऊसाहेब. काय खबर आहे?"

"खबर कांहीं नाहीं," भाऊसाहेब म्हणाले, "रामेश्वर, मद्रास, म्हैसूर एवढा महिना दीड महिना प्रवास करून आलांत तुम्हीं आप्पासाहेब,— पण अजून बरं वाटलेलं दिसत नाहीं तुम्हांला."

"कपाळाचं बरं वाटायचंय् आतां." हंसत, पण जरा वैतागाच्याच सुरांत आप्पासाहेब म्हणाले, "आतां हें असंच चालायचं!"

आप्पासाहेबांच्या उदासीनपणाला कारण होतंच तसं. गेलं सबंध वर्ष ते असेच उदासीन होते. जिवाला मोकळं वाटावं म्हणून रामेश्वर, म्हैसूर वगैरे ठिकाणांचा दूरचा प्रवास करून ते नुकतेच परत आले होते. तरीही त्यांचा उदासपणा कांहीं कमी झाला नव्हता. कसा कमी होणार? बऱ्यावाईटांत,— दु:खांत—आनंदांत गेलीं अठ्ठावीस वर्षें जिच्या सहवासांत काढलीं ती त्यांची जन्माची सोबतीण,— त्यांची पत्नी गेल्याच वर्षीं कॅन्सरच्या विकारानें वारली होती. तेव्हांपासून त्यांच्या जिवाला हा जो उदासपणा जडला तो कायमचा जडला. त्यांना मूल नव्हतं याचं त्यांना कधींच वाईट वाटलं नव्हतं. आपल्या नशी-बींच मूल नाहीं, असं म्हणून ते आणि त्यांच्या पत्नी इतरांच्या मुलांचं कौतुक करीत, आणि आनंदांत रहात. पण आतां अगदीं घर त्यांना खायला येत होतं. त्यांना मित्र असा कुणी नव्हताच म्हटलं तरी चालेल. आपलं काम आणि घर यापलि-कडे आप्पासाहेबांनीं कधीं पाहिलंच नाहीं. बायकोपलीकडे त्यांचे

एकुलते एक स्नेही आणि सल्लागार म्हणजे भाऊसाहेब सातपुते. भाऊसाहेब सातपुते यांचा आणि आप्पासाहेबांचा मात्र गेल्या बारा वर्षांचा स्नेह होता. गेलीं बारा वर्षे ते शेजारीं शेजारीं रहात होते. भाऊसाहेबांचें घर त्या आळीतलं अत्यंत जुनं घर. त्यांच्या शेजारींच आप्पासाहेबांनीं घर बांधल्यापासून त्यांचा स्नेह जमला. भाऊसाहेब रिटायर्ड हेडमास्तर होते. त्यांना सरकारी पेन्शन मिळत असे. त्यांच्या घरांत सारीं तीन माणसं,– ते, त्यांची पत्नी आणि कॉलेजांत बी. ए. च्या वर्गांत असलेला त्यांचा एकुलता एक मुलगा, बाबू.

आप्पासाहेब श्रीमन्त झाल्यापासून त्यांच्याकडे अनेक नातेवाईक रहायला येत. पण त्यांना जवळचे असे नातेवाईक कुणी नव्हते. त्यांच्या दूरच्या एका चुलतभावाला दोन मुलगे होते. त्यांना आप्पासाहेब आपली सर्व इस्टेट देणार अशी गांवांत बातमी होती. पण आप्पासाहेबांचा कांहीं तसा विचार नव्हता. त्या दोन पुतण्यांना आपल्याजवळ ठेवावें आणि आपला धंदा त्यांच्या हवालीं करावा असा आप्पासाहेबांनीं एकदां विचार केला होता. पण ते दोघेही अगदींच उडाणटप्पू निघाले. शाळेंत जाण्याऐवजीं ते इकडे तिकडे भटकत, यथेच्छ खात आणि विड्या ओढीत फिरत. तेव्हां कंटाळून आप्पासाहेबांनीं त्यांना त्यांच्या बापाकडे सोलापुरास पाठवून दिलें. त्यांना आणि त्यांच्या बापाला दहापंधरा हजार रुपये द्यावे; आणि उरलेली साठसत्तर हजार रुपयांची इस्टेट एखाद्या चांगल्याशा लोकोपयोगी संस्थेला

धर्मार्थ देऊन टाकावी, असा स्तुत्य विचार त्यांनीं केला होता. दोन चार इंग्रजी इयत्ताइतकंच शिक्षण असूनही गेल्या तीस वर्षांत आप्पासाहेबांनीं चांगली लाख पाऊणलाख रुपयांची इस्टेट केली होती. वयाच्या विसाव्या वर्षीं एका बिल्डिंग कॉंट्रॅक्टरजवळ मुकादम म्हणून ते कामाला राहिले. उन्हातान्हांतून ते सारखे खपत असत. पुढें ते त्याचे मुख्य कारकून झाले. कांहीं दिवसांनीं त्यांनीं चुन्याचा स्वतंत्र व्यापार सुरू केला. आणि आज त्यांच्या त्रेपन्नाव्या वर्षीं तीस चाळीस हजार रुपये रोकड, एक स्वतःचा बंगला आणि एक चाळ एवढ्या इस्टेटीचे ते मालक झाले होते. अलिकडे त्यांना धंद्याकडे विशेष बघावं लागत नसे. आणि गेल्या वर्षापासून तर धंद्यावरचं त्यांचं लक्षच उडालं.

" आप्पासाहेब, तुम्हाला एक गोष्ट सांगूं ? " भाऊसाहेब अगदीं मित्रभावानें म्हणाले, " तुम्ही पुन्हा लग्न करा. त्याशिवाय तुमचं हे एकटं एकटं वाटणं, आणि तुमचा उदासीनपणा जायचा नाहीं ! "

" काय, म्हणतां काय, भाऊसाहेब तुम्हीं, ? " आप्पासाहेब उद्गारले, " आतां या वयांत लग्न करून एकाद्या कोवळ्या पोरीचा गळा कापूं कीं काय ?—छे ! "

" अहो तसं नाहीं म्हणत मी ! " भाऊसाहेब म्हणाले, " तरुण कुमारिकेशींच लग्न करा असं कांहीं म्हणत नाहीं मी.

एखादी तीस पस्तीस वर्षांची विधवा मिळाली तर काय वाईट आहे? तुम्ही इतके कांहीं म्हातारे दिसत नाहीं."

भाऊसाहेबांचं म्हणणं कांहीं खोटं नव्हतं. त्रेपन्न वर्षं झालीं तरी आप्पासाहेबांचे बरेच केंस काळे होते. वेळच्या वेळीं खाणं, पिणं आणि व्यायाम, यामुळं त्यांचं अंगही सुटलं नव्हतं. तुकतुकीत गोरा रंग, सुटसुटीत उंच बांधा,--यामुळें ते अजूनही रुबाबदार दिसत. भाऊसाहेबांनीं सारखा पिच्छा पुरवला, तेव्हां 'होय' 'नाहीं' म्हणतां म्हणतां कांहीं दिवसांनीं एखादी प्रौढ विधवा मिळाल्यास लग्न करण्याचं आप्पासाहेबांनीं कबूल केलं.

"पण असली बायको शोधायला जायचं कुठं?" आप्पासाहेब म्हणाले, "त्याची काळजी तुम्हाला नको," भाऊसाहेबांनीं सांगितलं, "त्या विधवाविवाह मंडळाचा चिटणीस आमच्या बाबूचा मित्र आहे. आमच्या बाबूकडून त्याला सर्व कांहीं सांगतों; आणि मी पुढली सर्व व्यवस्था करतों."

बाबूची आणि आप्पासाहेबांची चांगलीच गट्टी होती. बाबू त्यांना फार आवडे. पण आप्पासाहेब आतां पुन्हा या वयांत लग्न करूं पहात आहेत, याचं बाबूला जरा कसंसंच वाटलं. तरी पण त्यांतल्या त्यांत एखाद्या प्रौढ विधवेशीं लग्न करायचा त्यांचा विचार आहे, हें ऐकून त्याला बरं वाटलं.

विसू पळशीकर नांवाचा बाबूचा एक शाळेपासूनचा मित्र होता. त्याच्याकडे बाबू नेहमी जात येत असे. घरची अत्यंत

गरिबी असल्यामुळें विसूनें इंग्रजी तिसऱ्या इयत्तेंतच शाळा सोडली होती. कुठल्यातरी कारखान्यांत तो फिटरचें काम करीत असे. अवघा तीस रुपये त्याला पगार होता. विसूचे तीस रुपये आणि त्याचा म्हातारा बाप कोर्टाजवळ बसून कुठं अर्ज लिहून दे, कुठं काय कर, असं करून काय पंधरा वीस रुपये मिळवीत असे ते मिळून पंचेचाळीस पन्नास रुपयांत विसू, त्याचे म्हातारे आईबाप, सव्वीससत्तावीस वर्षें झालीं तरी लग्नाशिवाय असलेली त्याची बहीण वत्सला, आणि आणखी तीनचार भावंडं एवढ्या कुटुंबाला गुजराण करावी लागे. कधीं पोटभर अन्न नाहीं, कीं अंगावर धड वस्त्र नाहीं, अशी त्या कुटुंबाची स्थिती होती. दुर्गाक्का,—म्हणजे विसूची आई—, विसूला आप्पासाहेबांच्या कारखान्यांत, नाहींतर दुसरीकडे कुठंतरी जरा ज्यास्त पगाराची नोकरी बघून दे, म्हणून बाबूला नेहमी म्हणे. पण अजून तें कांहीं जमलं नव्हतं. विसूशीं बोलतां बोलतां एकदां बाबू सहज म्हणाला, "हल्लीं एक लग्न जमवण्याच्या धांदलींत आहे, बुवा!"

"कुणाचं?—स्वतःचंच कीं काय?"

"छे रे, मी कुठलं करतों. आमच्या आप्पासाहेबांना पुनर्विवाह करायचा आहे. त्यांच्यासाठीं एखाद्या विधवेच्या शोधांत आहे. आपला तो विधवाविवाहमंडळाचा कात्रे आहे ना, त्याला सांगून ठेवलंय्. पण, इतके दिवस झाले तरी चांगलीशी विधवाच सांपडत नाहीं कुठं!"

विसूच्या आणि बाबूच्या या गोष्टी दुर्गाक्का आंतून ऐकत

होत्या. त्या बाहेर येऊन म्हणाल्या, " खरंच आप्पासाहेब लग्न करतायत् कीं काय ?"

" हो. कां करूं नये ?" बाबू म्हणाला.

"नाहीं नाहीं. मी तसं कुठें म्हणतें, " दुर्गाक्का म्हणाल्या, " घरदार आहे. चांगला पैसाअडका आहे. आणि पन्नास वर्षं उलटून गेलीं, तरी तसे वाईट दिसत नाहींत आप्पासाहेब,—चांगले टणटणीत आहेत."

हें बोलणं झाल्यावर दोनतीन दिवसांनीं आपल्या आईशीं बोलत असतां बाबूला आश्चर्याचा धक्काच बसला. आदलेच दिवशीं दुर्गाक्का आईला भेटून गेल्या होत्या. कसंही करून आप्पासाहेबांना आमची वत्सला पदरांत घ्यायला सांगा, म्हणून आईकडे त्या धरणें धरून बसल्या होत्या. " आप्पासाहेब करतील वत्सलेशीं लग्न तर बरं होईल गरीबांचं. सदाच्या दारिद्र्यानं अगदीं मेटाकुटीला आलीं आहेत बिचारीं !" आई म्हणाली.

" काय, बोलतेस काय आई तूं" बाबू उद्गारला, "बाकीच्यांचं हित तूं पहातेस, पण वत्सलेला काय वाटेल ? इतरांसाठीं तिचा बळी द्यायचा कीं काय ?"

" बळी कसला आलाय रे ? काय वाईट आहे आप्पासाहेबांचं स्थळ ?" आई म्हणाली, " चांगली सत्तावीस वर्षांची झाली वत्सला. कोण करणार आहे तिच्याशीं लग्न आतां ?—बरं, दिसायला तरी काय आहे ?—मला वाटतं एखादेवेळीं ती

तयार होईल; पण आप्पासाहेब कबूल होतील कीं नाहीं कुणाला ठाऊक ! ”

“ तें कांहीं नाहीं, ” बाबू सात्त्विक संतापानें म्हणाला, “ मी हें लग्न होऊं देणार नाहीं.–आहे काय ?—बिचाऱ्या वत्सलेच्या जन्माचं वाटोळं मी मुळींच होऊं देणार नाहीं—हो, तुम्हाला काय ?— हें पाप थोडंबहूत तरी माझ्या डोक्यावर येतं—मी चुकून विसूजवळ बोललों–दुर्गाक्कानीं तें कुठूनसं ऐकलं–आणि त्यामुळं हें सर्व झालं. ”

या बाबतींत विसूजवळसुद्धां बोलायचं नाहीं—सरळ वत्सलेला जाऊन काय तें विचारायचं असं बाबूनें ठरवलं. तो अगदीं आवेशांतच वत्सलेच्या घरीं गेला.

“ वत्सला, दुर्गाक्कानीं–बाबांनीं तुझ्यावर जबरदस्ती चालवली असेल.–आमच्याकडे,—भावंडांकडे बघ, म्हणून तुझ्यापुढें डोकं धरून बसत असतील–पण असल्या जबरदस्तीला भिवून, नाहीं तर दुसऱ्यासाठीं स्वतःचा बळी देण्याच्या भलत्याच कल्पनेला बळीं पडून तूं मुळींच ‘ हो ’ म्हणूं नकोस. तुला घर सोडावं लागलं तरी बेहेत्तर–तूं कांहीं घाबरूं नकोस–मी आणि विसू तुझं वाटेल तसं संरक्षण करूं !—” बाबू बोलत होता.

त्याला मध्येंच थांबवून वत्सला म्हणाली, “ काय, बोलतोयस् काय तूं बाबू ?–सांगितलं कुणी तुला, दुर्गाक्कानीं नी बाबानीं माझ्यावर जबरदस्ती चालविली आहे म्हणून ?–‘ आप्पा-

साहेबांशीं लग्न करतेस का?' म्हणून त्यांनीं मला विचारलं, तेव्हां मला इतका आनंद झालाय् म्हणून सांगू—मी ताबडतोब 'हो' म्हणालें—सुटेन एकदांची. कंटाळा आलाय् मला हें असंच रहायचा!"

"चल, कांहींतरी बोलतेस," तिच्याकडे डोळे विस्फारून पहात बाबू म्हणाला, "मी असा उघड्या डोळ्यानीं तुझा सर्व-नाश मुळींच होऊं देणार नाहीं."

"बाब्या, तुला कुणी उठाठेवी सांगीतल्यात या?" वत्सला ओरडली, "माझं चांगलं जमतंय्, त्यांत तूं उगाच का मोडता घालतोस?—काय बाई, नशीब तरी! जरा कुठें चांगलं व्हायची वेळ आली, तर हा घरातलाच माणूस उलटला!"

"अग तुला काय वेड लागलंय्?" बाबूनें विचारलं, "जाणून बुजून विधवेचं जिणं कां ओढून घेतेस अंगावर?"

"वेड मला नाहीं, तुला लागलंय." वत्सला चिडून म्हणाली, "विधवा केव्हां होईन तेव्हां होईन. पण आतां विधवे-पेक्षां वाईट जिणं जगतेंय् त्याचं काय? आप्पासाहेबांशीं लग्न केलं तर कांहीं वर्षं तरी सवाष्ण म्हणून मिरवेन. नाहीं तरी कोण करणार आहे लग्न आतां माझ्याशीं?—मी काय आतां खुळी पोर राहलें काय रे?—माझं रूप मला काय दिसत नाहीं?—मला भीती वाटते आप्पासाहेबच माझ्याशीं लग्न करायला कबूल होतात कीं नाहीं!". बाबू जागच्याजागीं थंडच पडला.

बाकी वत्सलेच्या बोलण्यांत कांहींच चूक नव्हती. रुपानें खरोखरच ती सामान्याहूनही वाईट होती. ताडाच्या झाडासारखी उंच,—त्यामुळें पाठीला किंचित् पोक आलेलं, गालफडं बसलेलीं, छाती आंत गेलेली,—रस्त्यावरल्या वत्तीच्या खांबावर कांहींतरी वस्त्र टांगावं तसं तिच्या अंगावर लुगडं दिसे. खरोखरच आप्पा-साहेब तिला पसंत करतील कीं नाहीं, याची शंका होती. आप्पा-साहेबांची पन्नाशी उलटली होती तरी ते तसे रुबाबदार दिसत; आणि त्यांची पहिली बायकोही सुंदर होती. पण बायकोबरोबर तीस वर्षं काढल्यानंतर आतां एकलकोंडं रहाणं त्यांनां कससंच वाटत होतं. विधवाविवाहमंडळातर्फे एकही चांगलीशी विधवा सांगून आली नव्हती. भाऊसाहेबांनीं आणि आईनीं तर वत्सले-साठीं त्यांची पाठच धरली होती. शेवटीं त्यांनीं रुकार दिला. त्यांनीं विचार केला, 'घर अगदीं खायला येतं, घरांत कुणीतरी माणूस पाहिजे. प्रौढ विधवा नाहीं तर नाहीं. वत्सला चांगली सत्तावीस वर्षांची आहे. आतां दिसायला ती अगदींच अशी तशी आहे, पण या वयांत सुंदर बायको मिळणार कुठें—आणि सुंदर हवी तरी कशाला.'

वत्सलेचं लग्न झालं. लग्नानंतर वर्षांतच वत्सलेला मुलगा झाला. आप्पासाहेबांचा आनंद गगनांत मावेना. आपल्या मुलाच्या बारशानिमित्त एक टोलेजंग समारंभ करायचं त्यांनीं ठरवलं. सारा बंगला लतापल्लवानीं सुशोभित करून असंख्य रंगीबेरंगी विजेच्या दिव्यांची त्यावर रोषनाई केली होती. जरीची

जरीची लुगडीं नेसलेल्या आणि हिऱ्यामोत्यांचे दागिने अंगावर घातलेल्या गावांतल्या श्रीमन्तांच्या बायका येत जात होत्या. मोठ्या थोरल्या जरीच्या पदराची एक पैठणी दुर्गाक्का नेसल्या होत्या, आणि आपल्या चार केसांच्या गांठीवर त्यांनीं एक मोठी थोरली फुलांची वेणी घातली होती. बाहेर बागेंत मांडलेल्या टेबलांवरच्या पदार्थांवर पुरुषमंडळी ताव मारीत होती. आप्पासाहेब रंगांत येऊन भाऊसाहेबांशीं कांहीं तरी बोलत होते. बाबू वत्सलेला भेटायला सहज आंत गेला. वत्सलेचं डोकं फुलानीं नुसतं मढवून काढलं होतं. पोपटी रंगाचं सोनसळ्याचं भारी किंमतीचं पातळ ती नेसली होती. अंगाखांद्यावर हिरेमोती चमकत होते. पहिल्यापेक्षां ती कितीतरी चांगली दिसत होती. ती लठ्ठ झाली होती, इतकंच नव्हे, तर तिच्या चेहऱ्यावरही एक नवीनच कांती आली होती. तिचा मुलगा तिच्या मांडीवर होता. चांगला गोरापान, आणि गुटगुटीत दिसत होता तो. एकप्रकारच्या अपूर्व आनंदानें वत्सलेचे डोळे चमकत होते. सर्वत्र आनंदी आनंद दिसत होता. बाबूही त्याच आनंदांत बाहेर आला, आणि एका वर्षापूर्वीची आपलीं मतं अजिबात विसरून टेबलावरल्या केक्सवर आणि आईस्क्रीमवर व्यवस्थित हात मारूं लागला !

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र.
शाखा

# कामकरीण

संध्याकाळचा भोंगा 'भों' 'भों' 'भों' 'भों' करून बराच वेळ वाजला, आणि गिरणीच्या आवारांतून माणसांच्या झुंडीच्या झुंडी बाहेर पडूं लागल्या. पहिल्यांदा बायका बाहेर आल्या. त्यांच्या मागून अर्ध्या तासानें पुरुष सुटत. म्हाताऱ्या, तरण्या, लहान, मोठ्या, नानाप्रकारच्या त्या बायका होत्या. पण सहज पहाणाराला, पलटणींतल्या माणसांसारख्या त्या जवळ जवळ सगळ्या सारख्याच दिसत. हिरव्या, पिवळ्या, लाल रंगाची सर्वांचीं सारखींच जाडीभरडीं मळकट लुगडीं; प्रत्येकीच्या डोक्यावरून पदर, नाकांत एखादं दुसरं भरपूर मळानं भरलेलं सोन्याचं मुंकलं, आणि प्रत्येकीच्या काखेंत सकाळीं घरून निघतांना घेतलेला दुपारच्या जेवणाचा पितळेचा डबा. सहज पहाणाराला सगळ्याच सारख्या दिसत, ह्मणून सगळ्याच सारख्या होत्या असं नाहीं. उदाहरणार्थ, पिरताचं पिवळ्या रंगाचं लुगडं

जाडभरडं आणि मळकट होतं. तिच्या नाकांतही सोन्याचं खुंकलं होतं. पण पिरता डोक्यावरून पदर कधींच घेत नसे. आवारांतून बाहेर भडतांना सखू वांवकरणीशीं ती कांहींतरी बोलत होती. रडून रडून तिचे डोळे लाल झाले होते.

"ह्यां गो काय, पिरत्या? असां रडतस कित्याक?," सखू मालवणी भाषेंत म्हणाली.

"तो शंको माकां थारो देवचों नाय हंय! माझो काय निभाव लागाचों नाय्.", पिरता डोळे पुशीत म्हणाली.

शंकर जॉबर तिला त्रासच तसा देत होता. खरोखरच त्या गिरणींत फार दिवस तिचा निभाव लागेल, असं तिला वाटत नव्हतं. त्या गिरणींतल्या बऱ्याचशा इतर बायकांप्रमाणेंच पिरताही मालवणजवळच्याच एका खेड्यांतली होती. तिचा म्हातारा बाप शेती करून वंशपरंपरा चालत आलेलं सावकारांचं कर्ज फेडीत होता. तुक्या नांवाचा तिचा मोठा भाऊ होता. तोही गांवींच होता. क्षयरोगानं तो अंथरुणाला खिळला होता. पिरताचं अकराव्यांच वर्षी एका तरुण शेतकऱ्याशीं लग्न झालं होतं. पण लग्न झाल्यावर एक वर्षाच्या आंतच तो वारला, आणि पिरता विधवा झाली. तिची आई लहानपणींच वारली होती. आईची एक वहीण—आवडामावशी मुंबईच्या गिरणींत काम करीत असे. तिच्याच सांगण्यावरून बापाला कांहीं मदत होईल ह्मणून पिरता गिरणींत काम करायला मुंबईत आली. गिरणीजवळच्याच सिमिटाच्या चाळींतल्या एका खोलींत आवडा-

मावशीबरोबर ती रहात असे. विधवा झाल्यापासून चार पांच वर्षं बापाबरोबर तिनं शेतांत काम केलं. पण तिच्यासारख्या सतराअठरा वर्षांच्या तरण्याताठ्या मुलीला मुंबईच्या गिरणींत चांगले पंधरासोळा रुपये मिळतील, असं आवडामावशीनं सांगितलं. आणि ती मुंबईत आली. बोकडगल्लींतल्या गिरणींतला शंकर जॉबर त्यांच्याच गांवचा होता. बायकांच्या खात्यावरील मुकादमीण गिरजा नायकीण हिचं आणि शंकरचं चांगलं होतं. शंकरच्या ओळखीनं सुरवातीपासूनच पिरताला पंधरा रुपये पगार मिळूं लागला. दोन तीन महिने सर्व ठीक चाललं होतं. पण थोड्याच दिवसांनीं शंकर आणि गिरजा आपलं खरं स्वरूप दाखवूं लागलं. पिरताच्या खात्यांत कांहींतरी साठपाऊणशें बायका होत्या. त्यांपैकीं पंधरावीस तरण्या पोरी होत्या. गिरणीच्या मालकाचा शामजीशेट नांवाचा तीस बत्तीस वर्षांचा तरुण पुतण्या होता. तो नेहमीं गिरणींत जात येत असे. शामजीशेट मोठा रंगेल गडी होता. त्याची बायको मरून दोन तीन वर्षं झालीं होतीं; पण त्यानें पुन्हां लग्न केलं नव्हतं. गिरजा आणि शंकरशीं त्यानें संधान बांधलं होतं. आपल्या खात्यांतल्या तरण्या पोरींना गिरजा फूस लावी, आणि शंकरच्या सहाय्यानें त्यांना शामजीकडे पाठवी. शामजीशेटची एखाद्या पोरीवर नजर गेली, कीं शंकरला तो ती दाखवून देई. पुढलें सर्व माझ्याकडे लागले, शंकर म्हणे. गिरजाच्या सहाय्यानें शंकर त्या पोरीला दोनचार आठवड्यांत बरोबर वळणावर

आणी; आणि शामजीशेटची मर्जी संपादन करी. काम झालें, कीं पंचवीस तीस रुपये शंकरला सहज मिळत. अर्थात् त्यापैकीं दहा रुपये गिरजेला जात.

एकदां दुपारच्या सुटींत गिरणीच्या आवारांतून कुठेशीं जातांना पिरता शामजीच्या दृष्टीला पडली. तिचा भरदार उरोभाग, पुष्ट नितंब, आणि भोकरासारखे मोठे पाणीदार डोळे पाहून शामजीच्या तोंडाला पाणी सुटलें. त्यानें आपली इच्छा शंकरच्या कानावर घातली. हात्तिच्या, पिरता तर आपली गांववाली—हें काम आपण चुटकीसरसं करून टाकूं, शंकरला मनांत वाटलं. त्यानं मोठ्या खुबीनं पिरताजवळ गोष्ट काढली. शामजीशेटला खूष केला, तर अधूनमधून पगारांतून कापले जाणारे दंडाचे पैसे तर कापले जाणार नाहींतच, पण महिना काठीं असे ना तसे आणखी पंधरावीस रुपये सहज हातांत पडतील. त्याशिवाय जादा खुषीत येऊन शामजीशेट कपडालत्ता देईल तो वेगळाच. पहिल्या प्रथम शंकर काय बोलतो आहे हें पिरताला समजेचना. त्याच्या बोलण्याचा अर्थ जेव्हां तिच्या ध्यानांत आला, तेव्हां तिला धक्काच बसला. ती बावरल्यासारखी झाली आणि तिथून निघून गेली. पण शंकरनं धीर सोडला नाहीं. तो पुन्हां पुन्हां तिच्याकडे विषय काढीत होता. ती त्याला उडवून देत होती. शेवटीं शामजीशेट अगदीं हट्टालाच पेटला. शंभर रुपये तुला घे—शंभर रुपये तिला देईन; पण कांहीं झालं तरी तिला तूं आणलीच पाहिजेस असें शंकरला

त्यानें निक्षून सांगितलं. महिन्याला मिळणारा हा जादा मलिदा जायचाच, पण एखादवेळीं नोकरीसुद्धां जायची, शंकरला वाटलें. त्यानें अगदीं शेवटचा निकराचा प्रयत्न करावयाचें ठरविलें. अलिकडे पिरतानें त्याच्याशीं बोलणें सोडलेंच होतें. शक्य तितकें त्याला ती टाळीत असे. पण त्या दिवशीं पिरताची तो पाठच सोडीना. तिची कुरेबाज उत्तरें ऐकून तो म्हणाला, "म्हायत आसस, मोठां पतिवरता आसस तां—गांवाक काय करीत होतस तां माकां काय म्हायत नाय्..." तो आणखीही कांहीं वेडेवांकडे शब्द बोलला. त्याची भलतीच दुरुत्तरं ऐकून पिरता चवताळून त्याच्यावर उलटली, आणि मालवणी भाषेंतल्या शेलक्या शब्दांची फैर झाडून त्याच्या आई-बहिणीचा आणि बेचाळीस पिढ्यांचा तिनं उद्धार केला. ! अगदीं आपल्या हातांत आहे असे वाटणारें सावज सुटून गेल्यामुळें शंकरचा संताप अनावर झाला आणि दांत ओठ खात तो तिथून निघून गेला.

तेव्हांपासून पिरताच्या छळाला सुरवात झाली. गिरजा नायकीणही चिडली होती. जरा कुठं चूक झाली नी धागा तुटला, कीं पिरताच्या नांवावर दंड चढूं लागला. त्या महिन्याला तर तिच्या हातीं पंधरा रुपयापैकीं आठच रुपये आले. दर महिन्याला पंधरा रुपयापैकीं जेवणाचे आणि जागेचे मिळून नऊ रुपये आवडामावशीला द्यायचे. चार रुपये कर्जफेडीसाठीं म्हणून बापाला धाडायचे. आणि उरलेल्या दोन रुपयांत आपला

बाकीचा खर्च चालवावयाचा, असा पिरताचा ठोकळ हिशोब होता. पंधराही रुपये पिरताला क्वचितच मिळत. दंड वगैरे वजा जातां बारा ते चौदा रुपये तिच्या हातांत पडत. त्यापैकीं आवडामावशी नऊ रुपये चोपून घेत असे; एक पैही कमी करीत नसे. पैसे घेऊन वर आणखी तीं छळवाद करी तो वेगळाच. पिरताला सगळं घरांतलं काम करायला ती लावी, आणि पुन्हा वाटेल तसं टाकून बोले. मुंबईला आणून आपण तिला कामाला लावली म्हणून वाटेल तें काम तिच्याकडून करून घ्यायचा आणि वाटेल तसं बोलायचा आपला हक्क आहे, असं तिला वाटे. महिनाभर काबाडकष्ट करून हातीं आलेले आठही रुपये आवडामावशी घेणार आणि अर्धपोटीं शेतांत खपणाऱ्या आपल्या म्हाताऱ्या बापाला, नी खोकून खोकून अस्थिपंजर झालेल्या तुक्याला या महिन्याला आपण एक पैही पाठवूं शकणार नाहीं, या विचारानें आज सारा दिवस पिरताला भडभडून येत होतें. तिच्या हातून कितीदां तरी धागा तुटला. असंच तूं काम करणार असशील तर तुला काढून टाकूं, म्हणून गिरजा नायकिणीनें तिला दरडावून सांगितलं. या महिन्याला आठ रुपये तरी हातीं आले, पण जर कां नोकरीच गेली तर पुन्हां गांवाला जाऊन बाबाच्या नी तुक्याच्या तोंडांतल्या भाकरीच्या तुकड्यांत आपण आणखी वाटेकरी व्हायचं आणि सगळ्यांनींच उपाशीं मरायचं, हें चित्र डोळ्यापुढें उभं राहल्यावरोबर तिला रडूंच कोसळलं. गिरणीच्या आवारांतून बाहेर पडतांना सखू बांवकर-

र्णीनं मायेचा एक शब्द बोलून तिच्या पाठीवरून हात फिरविल्याबरोबर तिला हुंदका आवरेना तो यामुळेंच.

घरीं आल्यावर पिरतानें आठच रुपये हातांत ठेवल्याबरोबर आवडामावशीनं थयथयाट केला. "आठ नी नव रुपयांत आमकां काय बाये, होवंचां नाय—तूं आपलां सवतंत्र रवान् काय करूंचां तां कर!" आवडामावशी या कानापासून त्या कानापर्यंत तोंड पसरीत गरजली. पुढल्या महिन्यापासून या घरांत तुला थारा मिळणार नाहीं,—तूं आपली कुठंतरी स्वतंत्र सोय पहा, असं आवडामावशीनं पिरताला स्वच्छ सांगितलं. पुढल्या महिन्यापासून सखू बांवकरणीकडे भागींत रहावयाला पिरता गेली. सखू बांवकरणीला एक बारा वर्षांचा मुलगा होता; आणखी कुणीच नव्हतं. पिरताबद्दल तिला सहानुभूतीही वाटे.

असाच आणखी एक महिना गेला. गिरिजानं आणि शंकरनं पिरताला अगदीं धारेवर धरली होती. शामजीशेट त्यांना सतावीत होता, म्हणून तीं दोघंही पिरताला नको जीव करीत होती. वर्ष वर्ष होऊन लुगड्याच्या चिंध्या झाल्या तरी नवी लुगडीं घ्यायला तिच्याकडे पैसे नव्हते. त्या तशाच पुन्हां पुन्हां शिवून तिला अब्रू झांकावी लागे. पोटभर अन्न नाहीं, अंगभर वस्त्र नाहीं, असे दिवस ती काढीत होतीच. पण तुक्यासाठीं कसला तरी काढा पाठवायला बापानं लिहिलं होतं त्याच्यासाठीं दोन रुपये सुद्धां आपल्याकडे उरत नाहींत याचा

तिला राहून राहून वैताग येई. आपल्याबरोबरच काम करणाऱ्या, आपल्या इतकाच पंधरा रुपये पगार असलेल्या काऊकडे पाह्यलं, कीं तिचं हृदय अमर्याद हेव्यानं भरून येई. पिरतापेक्षां काऊ दिसायला किती तरी वाईट होती. पण महिन्या महिन्याला ती नवी पातळं विकत घेई. तिची ती चापून चोपून बसवलेली कांसेची पट्टी, तिचे ते कानावर फुगे काढलेले केंस,—तिचा एकंदर थाट पंचेचाळीस पये पगार मिळवणाऱ्या गिरजा नायकिणीपेक्षां और होता. पिरतापेक्षां कामांतही ती कितीतरी चुका करी, आणि कसं तरी आळसत जांभया देत काम करी. पण गिरजा तिच्या चुकांकडे लक्षच देत नसे. गिरजानें तिला त्रास दिला असता तर शामजीशेटनें गिरजालाच काढून टाकली असती.

एक दिवशीं दुपारच्या सुटींत आपापले डवे सोडून सर्व बायका खात बसल्या होत्या. पिरताच्या समोरच काऊ बसली होती. सोन्याच्या चार पुतळ्यांची एक नवी कोरी माळ गळ्यांत घालून आज काऊ आली होती. आपल्या गळ्यांत एक फुटका मणीसुद्धां नाहीं,—या काऊनं ही माळ कुठून आणली, असा विचार करीत पिरता तिच्या माळेकडे टक लावून पहात होती. गिरजाचं तिच्याकडे लक्ष गेलं. "वघतस काय," ती म्हणाली, "तूं मनांत हाडशीत तर असले दोन माळो करशींत,—पन दारांत इल्ली लक्षूमी तुकां नको झाली तेंका कोनी काय करूंचा!" पिरतानं तिच्याकडे पाह्यलं आणि

आपला डबा गुंडाळून ती तिथून निघून गेली. अशावेळीं ती नेहमी बोले त्याप्रमाणें यावेळीं गिरजाला ती उलटून कांहींच बोलली नाहीं.

महिना संपत आला होता. पगाराला अजून दहाबारा दिवस होते. बाबाचं पत्र आलं, कीं तुक्या आतां अगदीं थकला आहे. फार दिवस जगणार नाहीं. पोराची कोबीच्या भाजीवर इच्छा गेली आहे. कसंही करून कुणाबरोबर तरी एक कोबीचा कांदा पाठवून दे. गांवचा एक माणूस गांवाला जात होता. पण कोबीचा कांदा घ्यायला पिरताच्या कनवटीला एक खोटा पैसाही नव्हता. सखूचे तिनें चार रुपये आधींच उसने घेतले होते. तिच्याकडेही या वेळेला पैसे नव्हते. त्या दिवसांत कांहीं पैसे उभे करतां आले नाहींत. तो गांववाला त्याच दिवशीं निघून गेला. पिरताला तुक्यासाठीं कोबीचा कांदा पाठवतां आला नाहीं. पगार झाल्यावर कांहीं करून कोबीचा कांदा पाठवायचा तिनें विचार केला. पगाराला तीन दिवस उरले होते.

बाबाचं गांवाहून पत्र आलं, कीं तुक्यानें तडफडून प्राण सोडले. पत्र वाचल्यावरोबर पिरताला घेरी आली. दुसऱ्या दिवसापासून ती नेहमींप्रमाणें कामावर जात होती. पण तिच्या डोक्यांत एकच विचार सारखा भणभणत होता, कीं पैसा— पैशाशिवाय सर्व व्यर्थ आहे,—पैसा जवळ नसल्यामुळें तुक्याची मरतानांची इच्छा सुद्धां आपण पुरी करूं शकलें नाहीं. आणखी

दोन दिवसांनीं ती गिरिजाजवळ गेली, आणि तिच्या कानांत कांहींसं पुटपुटली. गिरिजाचे डोळे आनंदानें चमकले. तिनं ती गोष्ट शंकरच्या कानांत सांगितली. शंकरला पहिल्यांदा खरंच वाटेना. पण पिरतानं हंसून 'होय' म्हणून जेव्हां मान हालवली, तेव्हां छाती पुढें काढून त्या दिवशीं संध्याकाळीं तो तिला शामजीशेटच्या बंगल्यावर घेऊन गेला.

आधीं फार दिवस ओढून धरल्यामुळेंच कीं काय पिरतावर जी शामजीशेटची मर्जी बसली ती कायमचीच बसली. तो तिच्या भजनी लागला. बाकी इतर बायकांचा नाद त्यानें सोडून दिला. गिरणींतली नोकरी त्यानें तिला सोडावयास लावली; आणि गिरगांवांत पस्तीस रुपयांचा एक सुंदर ब्लॉक तिला घेऊन दिला. भाडें वगैरे सर्व खर्च जाऊन महिन्याचे शंभर रुपये तो तिला देई. पिरताच्या सगळ्या चिंता दूर झाल्या. बापाचं सर्व कर्ज तिनं फेडून टाकलं. एक दिवशीं एक सुंदर, तलम रेशमी पांढरं पातळ नेसून कपाटाच्या आरशासमोर पदर नीट करीत ती उभी होती. इतक्यांत मागून तिची मोलकरीण आंत आली. पिवळ्या रंगाचं कसलं तरी जाडंभरडं, मळकट लुगडं ती नेसली होती. तिला आरशांत पाह्यल्याबरोबर पिरता एकदम दचकली. आपलंच भूत पाह्यल्यासारखा तिला भास झाला. दोन वर्षांपूर्वी ती असलंच लुगडं नेसत होती; आणि अगदीं अशीच दिसत होती. "घाबरलांव काय, बाई?", मोलकरीण म्हणाली. पिरता तिच्याकडे पाहून नुसती हंसली.

उन्हाळयाच्या दिवसांत आंबेगरे खायला म्हणून तीनचार वर्षांनीं ती आपल्या गांवीं गेली होती. आपल्या बापाचं पूर्वीचं शेणमातीचं चंद्रमौळी घर पाडून विटाचुन्याचं सुंदर घर तिनं बांधलं होतं. त्या गांवांत तसलीं दोन तीनच घरं होतीं. एक फणस फोडून ओट्यावर ती गरे खात बसली होती. असल्या चालीच्या बाईच्या घरीं जाऊं नये म्हणून म्हणा, किंवा तिच्या वैभवाचा मत्सर वाटत असल्यामुळें म्हणा, पहिल्यांदा पहिल्यांदा गावांतलं तिच्या घरीं फारसं कुणी येत नसे. पण कांहीं दिवसांनीं सगळीं तिच्याकडे जाऊं येऊं लागलीं होतीं. आज ओट्यावर ती गरे खात बसली असतां शेजारची एक बाई तिच्याकडे येऊन तिच्याबरोबर बोलत बसली होती. जुन्या गोष्टींच्या आठवणी होऊन पिरता म्हणाली, " काय खुळां होतंय मी!—पहिल्यान् तो शंक्रो सांगा होतो तेवां आयकलंय नाय—नाय तर असलीं दोन घरां मियां बांधलीं आसतीं ! "

" झालां तां झालां—आतां तर मोठी शेटाळीण झालसस मा ? ", ती दुसरी बाई हसून म्हणाली.

त्यावर समाधानपूर्वक तिच्याकडे पहात पिरता ' हूं ' म्हणाली, आणि पुढ्यांतल्या फणसाच्या तुकड्यातल्या एक एक गरा काढून तोंडांत घालूं लागली.

म. ग्रं. संग्रहालय, ...
वा. क्र. ...१५५... नों. दि ...
वि. ...

# नीतिमत्ता

भांग्यासुद्धां तसा थोडासा तत्त्वज्ञानी होता. हिरव्या गल्लीच्या नाक्यावर उभा राहून विडीचे झुरके मारतां मारतां आपले तारवटलेले तांबडेलाल डोळे आकाशाकडे लावून तो विचार करीत होता, "काय जग आहे! काळे झगे घालून पोलीस कोर्टांत–स्मॉलकॉज कोर्टांत फिरणारे वकीलसुद्धां मला साठसाठ टक्के कमिशन देतात,— आणि या हिरव्या गल्लींतल्या यःकश्चित् वेश्या मात्र वीस टक्क्यावर एक छदाम देत नाहींत–पांच रुपयांचं गिऱ्हाईक आणून दिलं तर एक रुपया माझ्या हातावर ठेवतात!– पोरगेलासा एखादा नवा वकील असला, कीं दहा रुपायांची त्याला मी केस दिली, तर रस्त्यांत झगा धरून त्याच्याकडून मी सहा रुपये घेतों–पण या लेकाच्या–जाऊं द्या. आहे खरं असं जग!......"

भांग्याला वाटत होतं तें खरंच होतं. पिकेट रोडवरल्या आपल्या ऑफिसांतून कोर्टाकडे जातांनां कमिशनसंबंधीं रस्त्यांत वाचाबाची करून दोन तीन वकीलांचे झगे त्यानं खरोखरच फाडले होते. दिवसा दहा वाजल्यापासून सहा वाजेपर्यंत पिकेट-रोडवरच्या नाक्यावर तो घिरट्या घालायचा, आणि पोलीस-कोर्टाच्या, नाहींतर स्मॉलकॉजच्या वकीलांना एकटीं दुकटीं सांपडलेलीं अशीलं पकडून द्यायचा. रात्रीं नऊच्या पुढें हिरव्या गल्लीच्या नाक्यावर त्याची गस्त सुरू व्हायची. रात्रींचे नऊ आणि सकाळचे दहा त्याला सारखेच होते. दिवसाचे बारा आणि रात्रींचे बारा, मिळून चोवीस तास तो बेवडा पिऊन तर्र असायचा. रात्रीच्या वेळीं हिरव्या गल्लीच्या नाक्यावरून एखादा रंगेल गडी इकडे तिकडे पहात जातांना त्याच्या दृष्टीला पडला, कीं कुठें आजूबाजूला पोलिस नाहींत हें पहाण्यासाठीं वहिरी-ससाण्यासारखी त्याची तांबडी नजर झर्कन् सर्व बाजूंना फिरा-यची, आणि त्या माणसाच्या मागें मागें जात तो आपली वटवट सुरू करायचा; "......साह्यब—फस्स् कलास् छोकरी आहे—कोण पाहिजे तुमाला, वाणीन्?—पार्शीण?—कास्मीरी पाह्यजे?—एकदम विलायतेहून आलेली मड्डम पाह्यजे?—फक्त पांच रुपया......" केव्हां केव्हां वरून रंगेल दिसणाऱ्या पण आंतून अत्यंत सभ्य असलेल्या माणसाकडून तो एखादी झण-झणीत थोबाडींत खायचा, नी गाल चोळीत निघून जायचा; केव्हां केव्हां त्याचा लग्गा साधायचा. त्याच्या तें आंगवळणींच

पडलं होतं. दारूला कुठूनही पैसे मिळाले कीं झालं. कपड्याची त्याला शुद्धही नसे. सदान्कदा तो तसाच दिसे,—एक मळकट फाटकें धोतर, त्यावर पन्नास भोकं पडलेला एक गंजीफ्रॉक् आणि ठिगळं मारलेला एक काळा कोट.—दाढी वाढलेली आणि डोक्यावर वांकडी ठेवलेली एक फाटकी टोपी.

आज सकाळीं दहाच्या सुमाराला हिरव्या गल्लीच्या नाक्यावर भांग्या जो एवढ्या तात्विक विचारांत चूर झाला होता त्याचं कारण या एक आणि दोन रुपये कमिशनचा त्याला कंटाळा आला होता. आज पांचदहा तरी रुपये त्याला कमवायचे होते. हिरव्या गल्लींतल्या सोळा नंबरच्या खोलींत रहाणाऱ्या व्यंकीनं त्याला आज सकाळींच बोलावलं होतं. तिला कसलं तरी पोलीस कोर्टाचं समन्स लागल्यामुळें ती भेदरून गेली होती. एक महिन्यापूर्वींच हुबळीहून ती मुंबईला आली होती. आधींच ती भोळसट होती. त्यांत आणखी मुंबईत नवखी. तिच्या ज्यास्त ओळखीचा असा काय तो एक भांग्यादलालच. पोलीसांचं समन्स पाहून तिच्या काळजानें ठावच सोडला. "भांग्यादादा," ती म्हणाली, "मी काय बी केलं नाय्—मला तुरुंगांत टाकतील काय रे?" तिच्या हातांतलं समन्स घेऊन तें खालींवर पहात भांग्या म्हणाला, "आतां तें मी काय सांगूं. पण मोठ्या वकीलाकडे जाऊन तीस चाळीस रुपये खर्च केले पाहिजेत; तर सुटशील एखादवेळीं.—"

"तें काय बी असो. चल तूं वकीलाकडे," ती म्हणाली.

"थांब, जरा बाहेर जाऊन येतो मी," असं म्हणून भांग्या तिथून बाहेर पडला. जवळच्या गुत्त्यांत एक बेवड्याचा ग्लास त्यानं मारला; आणि कुठल्या वकीलाकडे जावं याचा विचार करीत तो नाक्यावर उभा राहिला. व्यंकी भोळसट आहे. मुंबईत नवीनच आहे. पोलीसांची कांहीं तरी भानगड आहे, या भीतीनें ती घाबरून गेली आहे. जवळचं काय असेल नसेल तें विकून पंचवीस तीस रुपये ती सहज उभे करील, याबद्दल त्याची खात्री होती. एकाद्या नवीन वकीलाकडे गेलं तर तो पांच रुपये फी सांगेल, आणि आपणाला सारे तीन रुपये मिळतील, भांग्यानें विचार केला. त्यापेक्षां जुने आणि मोठे प्रसिद्ध वकील दादासाहेब काळेखे यांच्याकडे जावं. व्यंकी-सारख्या बावळट कुळानां कसं बनवावं हें दादासाहेबांनांच माहीत. दादासाहेब वीस टक्केच कमिशन देतात. पण दादा-साहेब फीच उकळतील पंचवीसतीस रुपये. पांच रुपये फीवाल्या-कडून साठ टक्यांनी तीन रुपये मिळविण्यापेक्षां, दादासाहेबां-कडून वीस टक्यांनीं पांचसहा रुपये मिळवलेले काय वाईट? आणि पुन्हां नवीन वकील व्यंकीला बनवतांनां एखादेवेळीं गडबडायचा; आणि व्यंकीला संशय यायचा. मग सगळाच घोटाळा. दादासाहेबच हें सावज बरोबर सांभाळतील. समन्स कसलं होतं, त्याची भांग्याला मुळींच कल्पना नव्हती. पण कसलंही असलं तरी व्यंकीसारख्या नवख्या अशीलाची बरोबर पारख करून दादासाहेब कमींत कमी पंचवीस रुपये काढतील,

याबद्दल भांग्याची खात्री होती.

पिकेटरोडवरल्या दादासाहेब काळोख्यांच्या ऑफिसांत व्यंकीला घेऊन भांग्या गेला. दादासाहेब एवढे मोठे वकील आहेत, कीं फासावर चढवलेल्या माणसालासुद्धां शेवटच्या घटकेला ते खालीं उतरवूं शकतात, वगैरे थापा व्यंकीला भांग्यानें रस्त्यांत ऐकवल्या होत्या. दादासाहेब पगडी टेबलावर ठेवून हजामत केलेल्या आपल्या तुळतुळीत डोक्यावरला घाम हातरुमालानें पुशीत नुकतेच ऑफिसांत येऊन बसले होते. ऑफिसचा काचेचा ढकलदरवाजा भांग्यानें लोटल्यावरोबर झट्दिशीं त्यांनीं पगडी डोक्यावर ठेवली, आणि येणाऱ्या अशीलाला तोंड देण्यासाठीं ते सज्ज होऊन बसले. अशा वेळीं ते अधिकच भव्य आणि रुबाबदार दिसत.

चष्म्याच्या कांचेंतूनही समोरच्या माणसाला थिजवून टाकणारी भेदक नजर, बहुतेक पांढऱ्या झालेल्या पिळदार मिशा, भरीव डोक्यावर तांबडीलाल पगडी, लांब काळा कोट आणि पांढरी विजार;—त्यांचं हें रुप पाहून कुठलंही अशील त्यांच्या समोर वचकूनच राही. व्यंकी तर थरथर कांपतच त्यांनीं दाखवलेल्या समोरच्या खुर्चीवर बसली. भांग्याची आणि आपली मुळींच ओळख नाहीं, असा चेहेरा करून भांग्याकडे पहात दादासाहेब म्हणाले, "हं. काय आहे काम?"

"या बाईला पोलीसांचं हें समन्स लागलंय, साहेब," भांग्या समन्स पुढें करीत अदबीनें म्हणाला.

"ठीक आहे. विचारतो तिला मी सर्व. तूं बाहेर जा." दादासाहेब म्हणाले.

व्यंकीच्या बाजूलाच रहाणाऱ्या दुसऱ्या बाईच्या खोली-समोर चारपांच दिवसांपूर्वी कांहीं मारामारी झाली होती. त्याबाब-तींत पोलीसांनीं धरपकड केली होती. कुणीतरी व्यंकीचें नांव मध्येंच काढलं म्हणून पोलीसांनीं व्यंकीला साक्षीसमन्स काढलं होतं. केवळ साक्ष द्यायला म्हणून तिला कोर्टानं बोलावलं होतं. वकीलाची कांहींएक जरूर नव्हती. पण व्यंकीचा एकंदर रागरंग पाहून दादासाहेबांनीं तसं मुळींच दाखवलं नाहीं. गंभीर चेहेरा करून ते स्वतःशींच मोठ्यानं पुटपुटले, "मोठं कठीण काम दिसतंय."

व्यंकी घाबरून म्हणाली, "साहेब, पोलीस मला तुरुंगांत टाकतील कीं काय?"

"कांहीं नेम नाहीं," दादासाहेब म्हणाले, "पण खटपट केली तर सुटशील."

"साह्यब, काय बी करा, पन,—" व्यंकी गयावया करीत बोलूं लागली.

"अग पण त्याला पन्नास पाऊणशें रुपये खर्च होईल. तूं देणार कुठून? आतां तूं गरीब आहेस म्हणून पंचवीस–तीस रुपयांत केलं असतं आम्हीं काम,—पण तेवढे तरी तूं कुठून—" दादासाहेब शांतपणें बोलत होते.

"पंचवीस रुपये हायत् माझ्याजवळ, साहेब" असं म्हणत व्यंकी कनवटीच्या नोटा काढूं लागली. आपल्या जवळचं

सर्व खिडूकमिडूक मारवाड्याकडे ठेवून येतानां तिनें भांग्याच्या सांगण्यावरून तीस रुपये बरोबर आणले होते.

" बरं आहे. तूं आलीच आहेस. करूं तुझं काम,—पण", असं कांहींतरी ह्मणत कुरकुरत दादासाहेबांनीं ते पैसे घेतले. पैसे टेबलाच्या खणांत ठेवीत ते ह्मणाले, " तूं बाहेर जाऊन बस. तुझ्याबरोबर तो आलाय् त्याला आंत पाठव. त्याला मी सर्व कांहीं सांगतो, आणि पुढची व्यवस्था करतो.—जा, जा, अशी घाबरू नकोस मी सगळं बरोबर करतो". भांग्या आंत आल्याबरोबर बराच वेळ दादासाहेबनीं त्याच्याशीं कुजबुज केली, आणि शेवटीं पांच रुपयांची एक नोट काढून त्याच्या हातावर ठेवली.थोड्या वेळानें व्यंकीला त्यांनीं आंत बोलावली.

" याला मी सगळं कांहीं सांगितलं आहे," ते ह्मणाले, " तो सांगेल तसं करायचं. मग कांहीं काळजी करायचं कारण नाहीं. काय समजलीस ?"

" हां," व्यंकी ह्मणाली.

" ती मारामारी झाली तेव्हां ताबडतोब तूं दार लावून घेऊन आंत बसलीस. होय ना? तुला कांहींएक माहिती नाहीं ?" त्यानीं विचारलं.

"हो," व्यंकीनं जबाब दिला.

"झालं तर मग.," ते म्हणाले, "एवढंच कोर्टांत सांग. मात्र लक्षांत ठेव, वकिलाकडे गेलें होतें, नी वकीलांचा सल्ला घेतला—फीचे पंचवीस दिले—कांहीं एक पोलीसांना, नाहींतर

पोलीसांच्या वकीलाला सांगू नको हं. विचारतील तेवढ्या प्रश्नांचीं उत्तरं दे.—पोलीसांना कळलं तूं वकीलाकडे गेली होतीस तर सगळंच गाडं तुझ्यावर उलटेल.— मला कोर्टांत यायची कांहीं जरूर नाहीं. मी सगळी व्यवस्था करून ठेवीन. हा भांग्या येईल तुझ्याबरोबर. सगळं ठीक होईल. आपोआप सुटून जाशील.—पण जर का इकडे आली होतीस ह्मणून बोललिस तर मग मात्र आपल्याला काहीं माहित नाहीं!"

"नाय—नाय साव," व्यंकी म्हणाली, "परान् गेला तरी कुणाजवळ बोलणार नाय्!"

"हां! मग कांहीं नाहीं," खूष होऊन दादासाहेब म्हणाले, "जा तूं आतां."

व्यंकीचे डोळे कृतज्ञतेनें भरून आले होते. "आमच्या-कडे या केवां बी साह्यब!", जातां जातां ती म्हणाली.

"आँ!", भुंवया वर करून दादासाहेब उद्गारले पण ती निघून गेल्यावर थोडीशी जिज्ञासा त्यांच्या मनाला चाटून गेली, 'या बाया रहातात तरी कशा–एकदां पाह्यलं तरी पाह्यजे!' अर्थात् त्यानां नुसती पहाण्याची इच्छा होती. तसं दारूचं व्यसन त्यानां होतं. आणि संध्याकाळीं कोर्ट सुटल्यावर ते दररोज नियमितपणें पीत असत. पण स्त्रीविषयाच्या बाबतींत मात्र गेल्या एकावन्न वर्षांत त्यांचं एकदांही वांकडं पाऊल पडलं नव्हतं. त्यानां त्या व्यसनाची कल्पनाही नव्हती. म्हणूनच त्यांच्या मनांत अशी बालिश जिज्ञासा उत्पन्न झाली.

त्या दिवशीं संध्याकाळीं घरीं गेल्यावर आपल्या पत्नीबरोबर बोलतां बोलतां सकाळीं आपण कांहीं न करतां पंचवीस रुपये कसे कमावले, ही हकीगत दादासाहेब अगदीं रंगांत येऊन सांगत होते. "इश्श !," पार्वतीबाई म्हणाल्या, "गरीब बिचारी! कशाला तिचे रुपये घेतलेत?— वकीलीचा धंदा झाला म्हणून काय झालं—त्यांतही कांहीं नीतिमत्ता पाहिजे!"

"हो हो तर," वेडावण्याच्या स्वरांत दादासाहेब म्हणाले. "नीतिमत्ता पाहिजे!—असली नीतिमत्ता पाळीत बसलों असतों, तर तुझ्या हातांत या गोटपाटल्या नी राहिला हा स्वतःचा बंगला तुला मिळाला नसता. एखाद्या चाळींतल्या एका खोलींत राहून स्वयंपाक नी धुणीभांडीं तुला स्वतःच्या हातांनीं करावीं लागलीं असतीं!—नीतिमत्ता! ऊंः!" त्यानीं पार्वतीबाईनां उडवून लावलं खरं; पण तो शब्द त्यांना डांचत होता, फिरायाला जाण्यासाठीं पुन्हां कपडे चढवतांना 'नीतिमत्ता! ऊं!' म्हणून स्वतःशींच ते तिरसटपणें दोनतीनदां जोरानें पुटपुटले.

केसच्या तारखेच्या दिवशीं व्यंकिला घेऊन भाग्या कोर्टांत गेला. जाताना वकीलाकडे गेल्याची गोष्ट चुकूनसुद्धां बोलावयाची नाहीं, म्हणून त्यानें तिला बजावून सांगितलें. वकिलाकडे मॅजिस्ट्रेटचे दोस्त आहेत. त्यांनी आदले दिवशीं मॅजिस्ट्रेटच्या कानांत सगळं सांगून ठेवलं आहे. ते तुला सोडून देतील, तो म्हणाला. व्यंकीची साक्ष झाली. तुला पुन्हां यायचं कारण नाहीं, म्हणून

पोलीसांनीं तिला सांगितलं. वकिलांनीं सांगितल्यामुळेंच आपण सुटलें, असं व्यंकीला वाटलं. दादासाहेबाच्या ऑफिसांत जाऊन तिनें त्यांचे पाय धरले आणि मनापासून त्यांचे आभार मानले. जातांना ती पुन्हां म्हणाली, "आम्हा गरीबाकडे एकदां या ना, वकीलसाहेब?" तिचे ते शब्द ऐकून दादासाहेबाच्या मनांत पुन्हां ती पोरकट जिज्ञासा उत्पन्न झाली.

त्या दिवशीं रात्रीं हिरव्या गल्लीं जायचें त्यानीं ठरवलें. जेवण झाल्यावर नऊ वाजतां एका बंद टॅक्सींतून ते बाहेर पडले. व्यंकीची खोली त्यांना सांपडली. आंत शिरल्याबरोबर त्यांना कसंसंच वाटलं. खोलीचा प्रत्येक कोनाडा पानाच्या पिचकाऱ्यांनीं तांबडालाल होऊन गेला होता. एक पलंग होता, मध्यें एक जुनाट टेबल आणि त्याच्या भोंवतीं चार खुर्च्या होत्या. जिवाचा धडा करून नाक धरून ते खालीं बसले. ते आलेले पाहून व्यंकीला अतिशय आनंद झाला होता. त्यांचं आदरातिथ्य करण्याकरतां काय करूं नी काय नको असं तिला झालं होतं. "सोडा मागवूं—लिंबू मागवूं—कीं बीर मागवूं, साहेब?" तिनं विचारलं.

आजूबाजूचा देखावा पाहून दादासाहेब अगदीं गुदमरून गेले होते. ते उठत म्हणाले, "मला कांहीं नको. मी जातों!" व्यंकी त्यांच्याकडे पहातच राहिली. आपण जातो, हें पाहून तिला वाईट वाटेल असा विचार करून दादासाहेबांनीं आपल्या पाकिटांतून एक पांच रुपयांची नोट काढली. आणि ती ते तिला

देऊं लागले, "छे छे, साहेब हें काय?," ती म्हणाली, "आमचा आपला असला धंदा झाला म्हणून काय झालं—उगाच कुनाचा पैसा कसा घ्यावा?—काम दिल्याबगर दाम कसा घेयाचा साहेब?"

तिचे ते शब्द ऐकून दादासाहेबांना मनस्वी राग आला. यःकश्चित् दुकान मांडून बसलेली वेसवा आणि मला धंद्यांतल्या नीतिमत्तेच्या गोष्टी सांगते काय, त्यांना वाटलं. हातांतली नोट त्यांनीं तशीच रागानें तुमानीच्या खिशांत कोंबली, आणि धाडधाड पायऱ्या उतरून ते निघून गेले.

# कम्यूनिस्ट

लंडन आणि लेनिनग्राडमध्यें फेऱ्या करणाऱ्या एस. एस. कॉलिनिन्नें या खेपेला लेनिनग्राड सोडल्यापासून त्या जहाजावरल्या लहानमोठ्या खलाशांना फुरसतीच्या वेळीं चर्चेचा आणि वादविवादाचा असा एकच विषय झाला होता;—अकिम् कापिन्स्कीनें केलेला आपल्या बायकोचा खून आणि लेनिनग्राडच्या सुप्रीम कोर्टानें त्याला दिलेली शिक्षा. दुसऱ्या एखाद्या खलाशाच्या बाबतींत असा प्रकार घडला असता, तर त्याचं त्यांना इतकं आश्चर्य वाटलं नसतं, पण तोऱ्हारिश अकिम्च्या हातून असें कृत्य व्हावें यामुळें मात्र त्यांचीं भाबडीं मनें गोंधळून गेलीं होतीं. म्हातारा अकिम् हा त्यांचा अत्यंत आवडता सोबती होता. तो सर्वांनाच हवासा वाटे. १९१७ च्या क्रांतींत अकिम् चांगला बत्तीस तेहतीस वर्षांचा होता. लेनिनग्राडचे खलाशी बंडांत सामील झाले त्यावेळच्या रोमांचकारी गोष्टींचें रंगदार वर्णन तो

करूं लागला, कीं त्याचे आधींच लालबुंद असलेले गाल अधिकच लाल व्हायचे. क्रांतीच्या वेळीं त्यांच्यापैकीं बहुतेकचा जन्मही झाला नव्हता. त्याच्या गोष्टी ऐकायला त्यांना मोठी मौज वाटे. स्वभावानेंही तो मोठा गमत्या होता; आणि त्याचे पाणीदार निळे डोळे नेहमीं मिस्किलपणें चमकत. म्हणूनच सर्व सोडून अकिम्‌वर असा प्रसंग यावा, याचा प्रत्येकजण विचार करीत होता.

लंडनला 'कॅलिनिन्' पोहोंचणार होतें. त्या दिवशीं सकाळीं प्रातरुपहाराच्या वेळीं तर या विषयावर खलाशांत जोराचा वादविवाद चालू होता. अकिनूची आतांपर्यंतची वर्तणूक लक्षांत घेतां लेनिनग्राड कोर्टानें इतकी कडक शिक्षा त्याला द्यायला नको होती, असें बऱ्याच जणांचें मत होतें. कुणीसा म्हणाला, "तोव्हारिश् ॲन्ड्री, कांहींच कां बोलत नाहीं? काय, ॲन्ड्री तुला काय वाटतं?"

"दिली ही शिक्षा अगदीं योग्य दिली असं मला वाटतं!," शांतपणें ॲन्ड्री म्हणाला.

"काय!" सर्वजण ओरडले. अकिम्‌चें ॲन्ड्रीवर अत्यंत प्रेम होतें. आणि ॲन्ड्रीलाही अकिमबद्दल किती अकृत्रिम स्नेह वाटे याची प्रत्येकाला कल्पना असल्यामुळें ॲन्ड्रीच्या या उद्गारांचें साहाजिकच सर्वांना आश्चर्य वाटलें.

"होय," ॲन्ड्री बोलूं लागला. "त्याच्या बायकोनं दुसऱ्याशीं व्यभिचार केला ही गोष्ट अत्यंत वाईट झाली. पण

म्हणून असूयेच्या आहारीं जाऊन संतापाच्या भरांत कां होईना, अकिमूनें तिचा खून करावा, ही अक्षम्य गोष्ट आहे. एखाद्या 'बूर्ज्वा'नें असं केलं असतं तर ती गोष्ट वेगळी होती. त्यांना आपल्या बायका म्हणजे आपली हक्काची मालमत्ताच वाटते. पण आपण सोव्हियेट नागरीक 'बूर्ज्वा'प्रमाणें आपल्या स्त्रियांना आपल्या मालकीची गुरं समजत नाहीं. आपल्याकडे पुरुषा-प्रमाणेंच स्त्रीलाही स्वतंत्र व्यक्तित्व आहे. क्रांतींत रक्त सांडून आणि इतकीं वर्षं आपल्या सोव्हियेट मायभूमींत घालवूनही तोव्हारिश् अकिमूच्या अंतःकरणाच्या गम्यांत कुठं तरी खोल दडून राहिलेल्या मालकी हक्काची जाणीव अजूनही पूर्णपणें नाहींशी झाली नव्हती, आणि म्हणूनच तो असूयेसारख्या 'बूर्ज्वा' विकाराच्या आहारीं गेला, हेंच यावरून सिद्ध होतें. अकिम् माझा जिवलग दोस्त होता, पण—" आपल्या नेहेमींच्या पद्धतीला अनुसरून ॲन्ड्रीनें आपल्या सोबत्यानां एक लहानसें व्याख्यान ऐकवलें.

ॲन्ड्री बोलल्यानंतर सर्वच तिथून गुपचूप उठून गेले. ॲन्ड्री सॉकॉलॉव्ह् चोवीस पंचवीस वर्षांचा असला, तरी सर्वच लहानमोठ्या खलाशांनां त्याच्याविषयीं आदर वाटे. ते त्याला आदर्श कम्युनिस्ट समजत. मद्याला तो स्पर्श करीत नसे. तंबाखूलाही तो हात लावीत नसे. 'कॅलिनिन्' जहाजावर तो 'थर्ड इंजिनियर'च्या जागेवर होता. कॅप्टन् वावीलॉव्हही त्याला अत्यंत आदरानें वागवी. 'कॅलिनिन्'वर नोकरी धरण्यापूर्वी

लेनिनग्राडमधल्या नेव्हल ॲकेडेमींत असतांनां तो तिथल्या 'कॉम्सॉमॉल'चा एक प्रमुख सभासद आणि हुषार पुढारी होता. दिसायला जरी तों सडपातळ होता, तरी. त्याचें शरीर दणकट आणि पिळदार होतें. त्याचं भव्य कपाळ, पिवळ्या रंगाचे कुरळे केंस आणि पिंगट, करारी डोळे पाहुले, कीं त्याचे कपडे जरी इतर खलाशांसारखेच मळकट—निळी तुमान आणि तसल्याच रंगाचा एक शर्ट असे असले, तरी हा त्यांच्यापेक्षां कुणी तरी निराळा आहे, याची ताबडतोब खात्री पटे.

लंडनमधल्या 'हेज व्हार्फ'ला एस्. एस्. कॅलिनिन् जहाज लागलें. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं ८ वाजतां लंडनचे उतारू घेऊन लेनिनग्राडला जावयासाठीं (कॅलिनिन्) निघावयाचें होतें. संध्याकाळीं सहा—साडे सहाचा सुमार झाला होता. एक एक उतारू आपली बॅग घेऊन 'कॅलिनिन्'वर येत होता. उतारूंचे पासपोर्ट पहाणें, त्याना खोल्या दाखवणें वगैरे कामावर देखरेख करण्याकरतां आज ॲन्ड्री होता. सातचा सुमार झाला असेल. ॲन्ड्री इकडे तिकडे पहात होता. इतक्यांत शिडी चढून वर येणाऱ्या दोन चमत्कारिक उतारूंकडे त्याचें लक्ष गेलें. त्यापैकीं एक तरुण युरोपियन स्त्री होती, आणि दुसरा कुणीतरी एक एशियाटिक तरुण होता. तो तरुण तिचा दंड धरून शिडी चढायला तिला मदत करीत होता. तपकिरी रंगाचा डबल ब्रेस्टचा सुंदर कोट त्यानें घातला होता. त्याच रंगाची त्याची विजार होती. भडक लाल रंगाची फेज टोपी एका

बाजूला तिरपी करून मोठ्या ऐटींत त्यानें डोक्यावर ठेवली होती. आणि लाल रंगाचीच त्याची टाय वाऱ्यावर फडफड उडत होती. त्या युरोपियन तरुणीचं सौंदर्य पाहून मात्र ॲन्ड्री क्षणभर स्तिमित झाला. दुधांत गुलाबकळ्या कुस्करल्यासारखा तिच्या कातडीचा वर्ण होता. सरळ नाक, नीलमण्यासारखे चमकणारे विशाल डोळे, आणि सोन्यासारखे पिवळे केंस,—इतकी गोंडस आणि रेखीव स्त्री ॲन्ड्रीनें अजूनपर्यंत पाहिलीच नव्हती. कसल्या-तरी हिरव्यापिवळ्या कापडाचे गबाळ झगे घालणाऱ्या, नी कपाळाला लाल फडका बांधणाऱ्या राकट रशियन स्त्रिया त्यानें आतांपर्यंत पाह्यल्या होत्या. ही स्त्री त्याला समुद्रांतून वर आलेली सौंदर्यदेवताच वाटली. तिच्या कपड्यांच्या रंगसंगतीनेंही त्याला मोहून टाकलें. गुढग्यापर्यंत लांब असलेल्या आकाशी रंगाच्या 'स्कर्ट'वर लाल ठिपके असलेला पांढरा 'ब्लाऊझ' तिनें घातला होता. त्यावर आकाशी रंगाचाच कोट आणि आकाशी रंगाची टोपी तिनें चढवली होती. टोपींत एक लाल रंगाचें लांब पीस तिनें खोवून दिलें होतें. ॲन्ड्रीनं हंसतमुखानें त्या दोघांचें स्वागत केलें, आणि त्यांचे पासपोर्ट पहावयाला मागितले. ॲन्ड्रीला थोडेंबहुत इंग्लिश लिहितां वाचतां येत होतें, आणि लंडन—लेनिनग्राड लाईनवर असल्यापासून इंग्रजीमधून तो संभाषणही करूं शकत असे. पासपोर्ट उघडून त्यांचीं नांवें त्यानें वाचलीं. रिटा पामर, न्यूयॉर्क, अमेरिका, वय वर्षे २३. अली अझीझ, कैरो, इजिप्त, वय वर्षे २७. इतर उतारूंप्रमाणें या

उतारूना त्यांच्या केबीन् दाखवण्याकरतां हाताखालच्या खलाशांना न सांगतां ॲन्ड्री स्वतः, रिटा आणि अलीबरोबर त्यांच्या केबीन दाखवायला गेला.

रिटा आणि अली हीं दोघेंही कट्टर कम्युनिस्ट होतीं. तीन आठवड्यांपूर्वीच पॅरीसमध्यें दोघांची गांठ पडली होती. रशिया पहावयाला जाण्याकरतां म्हणूनच दोघेंही–अली कैरोहून, रिटा न्यूयॉर्कहून,–यूरोपांत आलीं होतीं. लॅटीन् क्वार्टर्समधल्या जवळ-जवळ असलेल्याच दोन हॉटेलांत दोघं रहात होतीं. पण त्यांची ओळख तिथें झाली नाहीं. स्पेनमधल्या लोकसत्ताक सरकारासाठीं फंड जमविण्याकरतां पॅरीसमधल्या कम्युनिस्टांनीं त्या आठवड्यांत कांहीं करमणुकीचे कार्यक्रम आंखले होते. त्या कार्यक्रमांत रिटा आणि अलीनेंही उत्साहानें भाग घेतला होता. त्याच वेळीं त्यांची दाट ओळख झाली. पॅरीसमध्यें थोडे दिवस राहून रशियाची बोट पकडण्याकरतां लंडनला जावें, असें दोघांनीं ठरवलें होतें.

त्या रात्रीं बिछान्यांत पडून 'प्रवदा'च्या अंकांतलें कॉमरेड स्टालीनचें एक ताजें भाषण ॲन्ड्री वाचीत होता. आज रात्रीं दोन वाजल्यापासून त्याला इंजिनरूममध्यें कामावर जायचें होतें. भाषणाकडे त्याचें लक्षच लागेना. पूर्वीं कॉ.स्टालीनचें भाषण वाचावयाला घेतलें, कीं शेवटचा शब्द पुरा करीपर्यंत त्याला तें खालीं ठेववत नसे. आज एक परिच्छेद वाचून झाला नाहीं तोंच कॉमरेड रिटा पामराचा तेजस्वी चेहरा त्याला कागदावर दिसूं लागला. डोकें हालवून त्यानें तो विचार झाडून टाकण्याचा प्रयत्न

केला. पुन्हां दुसरा परिच्छेद संपला नाहीं तो पुन्हां तेंच. ही काय भलतीच पीडा, त्याच्या शिस्तशील कम्युनिस्ट मनाला वाटलें. दोन वाजेपर्यंत त्यानें कसातरी वेळ काढला. बरोबर दोनच्या ठोक्याला तो इंजिनरूममध्यें गेला. इंजिनच्या घरघरींत आणि खटखटींत आपण उभे राहिलों कीं मन उगाच कुठेंतरी भरकटण्याचा हा त्रास होणार नाहीं, असें त्याला वाटलें. पण इंजिनचे खटके दाबतांनासुद्धां मध्येंच एखाद्या चाकावरून लाल पीस असलेली एक निळी टोपी सर्कन् निसटून गेलेली त्याला दिसे! कंटाळा येण्याऐवजीं शेवटीं मनाच्या या खेळाची त्याला गंमतच वाटूं लागली!

दुसऱ्या दिवशीं दुपारीं कांहीं काम नसल्यामुळें बोटीच्या कोंपऱ्यांत असलेल्या दोरखंडाच्या ढिगावर ॲन्ड्री एकटाच बसला होता. रिटा आणि अली सहज फिरत फिरत तिथें आलीं. त्यांना पाहिल्यावर ॲन्ड्रीला अतिशय आनंद झाला. त्या दोघांना बोटीवरला लेनिनची प्रतिमा ठेवतात तो 'रेड् कॉर्नर' पहावयाचा होता. ॲन्ड्री मोठ्या आनंदानें त्यानां 'रेड् कॉर्नर' कडे घेऊन गेला. तिथून परत येतांनां ॲन्ड्रीनें त्या दोघांनां आपल्या खोलींत आणलें. मोठ्या आग्रहानें आपल्या खोलींत बसवून घेऊन त्यानां तो आपल्या घरांतल्या मंडळींचे फोटो, आपलीं पुस्तकं, आपले कपडे वगैरे दाखवूं लागला. थोड्याच वेळांत त्यांची गट्टी जमली. रिटा आणि अलीलाही ॲन्ड्री अतिशय आवडला.

तिसरा दिवस उजाडला. जेव्हां जेव्हां काम नसे तेव्हां

तेव्हां ॲन्ड्री डेकवर येई, आणि घारीप्रमाणें त्याची नजर कॉमरेड रिटा कुठें दिसते कां न्याहाळून पाही. शेवटीं दुपारीं चारच्या सुमाराला डेकच्या एका कोपऱ्यांत एकटीच उभी असलेली कॉमरेड रिटा त्याच्या दृष्टीला पडली. त्याचा चेहेरा आनंदानें खुलून आला. तो तिच्याकडे गेला, आणि अगदीं तिला बिलगून उभा राहिला. नानातऱ्हेच्या गोष्टी तो तिला सांगत होता. गोष्टी संपल्या तर ती निघून जाईल म्हणून नव्या नव्या गोष्टी तो आठवीत होता. शेवटीं अकिम्‌नें असूयेच्या भरांत केलेल्या आपल्या वायकोच्या खूनाची हकीगतही त्यानें तिला सांगितली. "आमचा तोव्हारिश अकिम् एवढा कसलेला कामगार वीर, पण त्याच्यामधलेही 'बूर्ज्वा' अवशेष अजून गेले नव्हते !", तो हंसून म्हणाला.

रिटाचा सुखद सहवास त्या दिवशीं त्याला भरपूर लाभला खरा; पण दुसऱ्या दिवशीं पहावं तेव्हां त्याला अली रिटाबरोबर दिसे. सकाळीं अगदीं वरच्या डेकवर तो गेला, तों तिथं पडलेल्या दोर-खंडांच्या भेंडोळ्यांत एका एकान्त कोंपऱ्यांत बसून रिटा आणि अली कांहींतरी हितगुज करण्यात गुंतलीं होतीं. दुपारीं जरा वेळ मिळाला म्हणून तो डेकवर आला तों हातांत हात घालून अली आणि रिटा डेकवरून फिरत होतीं. 'या लेकाला कांहीं उद्योग आहे, कीं नाहीं ?,' अकारण राग येऊन ॲन्ड्रीच्या मनाला वाटलें. तो अगदीं चिडल्यासारखा झाला.

त्या दिवशीं रात्रीं डेकवर ग्रामोफोन लावून बोटीवरले तरुण

स्त्रीपुरुष उतारू मजेनें नाच करीत होते. मोकळे असलेले बोटीवरले अंमलदारही नाचांत भाग घेत होते. ॲन्ड्री मोकळाच होता. रिटाबरोबर नाच करावयाला मिळेल तर काय मजा होईल, त्याला वाटलें. तो इकडे तिकडे पाहूं लागला. रिटा आणि अली म्युझिकरूममध्यें पत्ते खेळतबसलीं होतीं. ॲन्ड्री तिथें गेला.

"कॉमरेड अली, तूं तर अगदीं कॉमरेड रिटाच्या सहवासाचा मक्ताच घेऊन बसलायस् !", तो हंसत हंसत थट्टेनें म्हणाला, पण त्यांत थोडासा रागाचा कडवटपणाही होता.

"छे छे," अली हसत म्हणाला, "मी भांडवलशाही मक्तेदारीच्या अजिबात विरुद्ध आहे. घेऊन जा ना कॉमरेड रिटाला तूं, पाहिजे तर." ॲन्ड्री रिटाकडे पाहून हंसला. अलीही हंसत होता. रिटाला ॲन्ड्रीच्या मोकळ्या मनाचें कौतुक वाटलें. पत्ते टाकून ती उठली आणि त्याच्याबरोबर डेकवर नाचावयाला गेली. एक नाच संपला; आणि कांहीं वेळानें दुसरा नाच पुन्हां रिटाबरोबरच नाचावयाची ॲन्ड्रीची इच्छा होती. इतक्यांत रिटा एकदम म्हणाली, "आतां हा नाच मात्र मी अलीबरोबर नाचणार !" ती म्युझिक रूमच्या खिडकीकडे गेली आणि लाडिकपणें तिनें "ये ना, अली" म्हणून अलीला हाक मारली. ॲन्ड्रीचा चेहरा एकदम पडला. त्याला मनस्वी राग आला. त्याच्या अंतःकरणाला सहस्र विंचू डसल्यासारख्या वेदना झाल्या. तिथून तो तडक आपल्या खोलींत निघून गेला.

कील कालवा ओलांडून त्या रात्रीं एस्. एस्. कॅलिनिन् बॅल्टिक समुद्रांत शिरली होती. बॉल्टिक प्रदेशांत सूर्य रात्रीं दीड दोन वाजतां मावळतो,– पश्चिम क्षितिजावर मावळतें सूर्यबिंब आणि पूर्व क्षितिजावर उगवतें चंद्रबिंब एकदम पहावयाला सांपडते, भूगोलांत वाचलेल्या 'पांढऱ्या रात्रीं' आतां आपणाला पहावयाला मिळणार, या विचारांनीं उतारूंचीं अंतःकरणें थरारून गेलीं होतीं. रात्रीं बारा एक वाजेपर्यंत सर्व उतारू पांढऱ्या रात्रीची गंमत पहात डेकवरच होते. दीडच्या सुमाराला सर्व उतारू आपापल्या केबिनमध्यें गेले होते. बोटीवर सर्वत्र सामसूम झालें होतें. समुद्रावरल्या वातावरणांतही चमत्कारिक स्तब्धता पसरली होती. वारा पडला होता. बोट इतक्या संथपणें पाणी कापीत पुढें जात होती, कीं ती चालते आहे असा भाससुद्धां होत नव्हता. सूर्य अस्ताला गेला होता. दुसऱ्या बाजूने चंद्रबिंब वर येत होतें. त्याचा आकार गोल मुळींच नव्हता. कांहींतरीच वाकडा तिकडा आकार, रक्तासारखा तांबडालाल रंग, मध्येंच कुठेंतरी हिरव्या पिवळ्या प्रकाशाच्या छटा,–आधींच चमत्कारिक झालेल्या त्या वातावरणाला या वेड्या बगड्या चंद्रबिंबामुळें एक निराळीच रम्यभीषण विकटता आली होती. आकाशांत चित्रविचित्र रंगांचा पूर उसळला होता. सूर्य अस्ताला गेला होता, त्या बाजूच्या क्षितिजावर समुद्राला लागून एक लाल प्रकाशाचा पट्टा दिसत होता. त्यावर पिंवळट, हिरवट, जांभळ्या प्रकाशाचे एकावर एक धूसर पट्टे दिसत होते. एखादी दुसरी

फिकट चांदणी या रंगीबेरंगी प्रकाशांतून डोकावून पहात होती. सर्व उतारू आपापल्या केबिनमध्यें जाऊन झोंपी गेले होते. पण रिटा आणि अली मात्र वेडावल्यासारखीं होऊन डेकच्या एका कडेला एकमेकांना बिलगून उभीं राहून हा अपूर्व रंगोत्सव अनिमिष नेत्रांनीं पहात होतीं.

ॲन्ड्रीला रात्रीं तीन वाजेपर्यंत इंजिनरूममध्यें काम होतें. जरा हवा खायला म्हणून इंजिनरूमचा लोखंडी जिना चढून तो वरच्या डेकवर आला. जिना अर्धा चढून तो वर आला असेल नसेल, तों डेकच्या कडेला एकमेकांना बिलगून उभीं असलेलीं तीं दोघें त्याच्या दृष्टीला पडलीं. तो जागच्या जागीं खिळल्यासारखा होऊन त्यांच्याकडे पहात राहिला. रिटानें अलीच्या खांद्यावर मान टाकली होती. अलीनें हळूच तिला आपल्या बाहुपाशांत घेतली आणि तिच्या ओठावर ओठ ठेवून तो कितीतरी वेळ तसाच राहिला. ॲन्ड्रीचा चेहरा एकदम काळवंडला. त्याच्या काळजांत कांहींतरी चमत्कारिक कालवा-कालव होऊन त्यानें इकडे तिकडे पाहिलें. तों वेडाबगडा बॉल्टिक चंद्र त्याच्या दृष्टीला पडला. ॲन्ड्रीचें सर्वांग कसल्या-तरी चमत्कारिक उन्मादानें थरारलें. जिन्याचा कठडा घट्ट धरून तो तसाच तिथें उभा राहिला.

दोन तीन क्षण असेच गेले. थंड वाऱ्याची एक झुळूक आली. रिटानें डोकं वर करून अंग झटकलं. ती एकदम भानावर आली. "ऊः", ती उद्गारली, "मला माझं लेदर

जॅकेट् तरी वर आणायला पाहिजे होतं!"

"तूं बस इथंच, मी आणतों," अली प्रेमळ नजरेनें तिच्याकडे पहात म्हणाला, "तुझ्या केबिनची किल्ली आण इकडे."

तिनं आपल्या केबिनची किल्ली ब्लाऊझच्या खिशातून काढली, आणि त्याच्या हातांत दिली. तो खालीं जायला निघाला.

जिन्याकडे वळतांच कठड्याला धरून निश्चल पुतळ्यासारखा उभा असलेला ॲन्ड्री त्याच्या दृष्टीला पडला. "हलो ॲन्ड्री" तो म्हणाला, "यावेळीं इथं एकटाच काय करतोस?"

ॲन्डी त्याच्यावर नजर रोखून ओंठातल्या ओंठात म्हणाला, "जरा खालीं ये माझ्याबरोबर, म्हणजे सांगतों."

ॲन्ड्रीच्या डोळ्यांत एक चमत्कारिक चमक अलीला दिसली; आणि तो दचकला. पण नागानें आपल्या नजरेनें भारून टाकलेल्या पक्ष्याप्रमाणें अली ॲन्ड्रीबरोबर खालीं इंजिन-रूममध्यें गेला. धड्धड् धड्धड् आवाज करीत तें प्रचंड इंजिन फिरत होतें. समोरच बॉयलरच्या भट्टीच्या तांबड्या पिवळ्या अक्राळ विक्राळ ज्वाळा धडकत होत्या. त्या इंजिनसमोर एखाद्या मंत्रमुग्ध माणसासारखा ॲन्ड्रीकडे पहात अली उभा राहला.

"कॉमरेड रिटाचा नाद तूं सोडलाच पाहिजेस," ओंठ चावत ॲन्ड्री बोलूं लागला, "ती मला पाहिजे!"

" म्हणजे ? " अली उद्गारला.

" म्हणजे तेंच. " ॲन्ड्री म्हणाला, " आतांच्या आतां ही गोष्ट कबूल कर; नाहीं तर—"

" नाहीं तर काय ?", अलीलाही राग येऊं लागला होता.

" नाहींतर या समोरच्या भडकलेल्या आगींत तुला फेंकून देऊन होता कीं नव्हता करून टाकीन. " ॲन्ड्री म्हणाला, "तुझा कोळसा होऊन जाईल—कुणाला कांहीं समजणार नाहीं. "

" चूप बस मूर्खा, तुला वेड लागलय्, " अली ओरडला, आणि परत जायला वळला.

त्याचा दंड झट्दिशीं पकडून ॲन्ड्रीनें त्याला मागें ओढला, " बोल, आहेस कीं नाहीं कबूल ? " तो ओरडला.

" मुळींच नाहीं ! ", संतापानें थरथरत अली म्हणाला.

" असं काय ! मग दाखवतोंच तुला. ", असं म्हणून क्षणार्धांत लहान पोरासारखा ॲन्ड्रीनें त्याला वर उचलला. समोर रसरसणाऱ्या आगीचे लाल पिवळे लोळ पाहून अलीचे डोळेच दिपले. भीतीनें तो पांढराफटींक झाला, आणि एक लहानशी किंकाळी त्याच्या तोंडांतून बाहेर पडली.

त्याच क्षणाला रिटा जिन्यावरून खालीं उतरत होती. अलीला जॅकेट् आणायला इतका उशीर कां झाला म्हणून ती खालीं जायला निघाली होती. ती किंकाळी तिच्या कानावर पडल्याबरोबर समोरचें दृश्य पाहून ती क्षणभर स्तिमितच झाली.

ॲन्ड्रीनें अलीला वर उचलला होता. बंगणाचे जिकडे तिकडे डाग पडलेला इंजिनरूममध्यें घालावयाचा मळकट निळा झगा ॲन्ड्रीच्या अंगावर होता. त्याच्या तोंडावर भट्टीतला पिवळा तांबडा प्रकाश खेळत होता. एखाद्या पिसाट राक्षसासारखा तिला तो दिसला. कांहींतरी भयंकर प्रकार आहे, याची तत्क्षणीं तिची खात्री झाली. ॲन्ड्रीची दाराकडे पाठ होती. ती सरळ धांवत गेली आणि सर्व बळ एकवटून तिनें ॲन्ड्रीच्या कानशिलावर एक ठोसा मारला. त्यासरशीं त्यानें अलीला खालीं टाकला आणि तिरमिरून बाजूला पाहिलें. समोर रिटा उभी होती. त्या ठोशामुळें त्याच्या डोळ्यावरची धुंदी खाडकन् उतरली होती. तो खालीं मान घालून उभा राहिला.

"उचल त्याला, आणि वर डेकवर घेऊन चल," अलीकडे बोट दाखवून ती म्हणाली.

एखाद्या आज्ञाधारक मुलाप्रमाणें ॲन्ड्रीनें अलीला उचललं, आणि तीं दोघंही डेकवर आलीं. थंड पाण्याचा थोडासा शिडकाव डोक्यावर केल्यावरोबर अली शुद्धीवर आला. ॲन्ड्रीकडे वळून रिटा म्हणाली, "काय, झालं होतं काय तुला?"

"मलाही तें समजत नाहीं," खालीं मान घालून ॲन्ड्री बोलत होता, "मला कसल्यातरी वेडाचा झटका आला—तो वेडाविद्रा बाल्टिक चंद्र पाहिल्याबरोबर—छे:!—" त्यानें मान हालवली, आणि तो सरळ इंजिनरूममध्यें निघून गेला. रिटानी अला त्याच्याकडे पहातच राहिलीं.

धड्धड्, धड्धड्, धड्धड् इंजिन चाललेंच होतें. त्या चकचकीत, अजस्र इंजिनाकडे भक्तिभावानें पहात ॲन्ड्री उभा राह्यला. त्याला इंजिनाचा हेवा वाटला. रात्र असो वा दिवस असो, कुणी येवो, कुणी जावो, कुणी जगो कुणी मरो,—न चुकतां, न चळतां आपलं युक्त कार्य तें करीतच रहातें. जवळच पडलेला मळका फडका त्यानें घेतला, आणि आई आपल्या मुलाला जितक्या प्रेमळतेनें पुसते तितक्या प्रेमळतेनें तो इंजिन पुसूं लागला.



# सृष्टिमाता

बाप्पा नुसते बोलके देशभक्त नव्हते. ज्या तत्वज्ञानावर त्यांची अढळ श्रद्धा होती त्याकरितां गेल्या वीस वर्षांत त्यांनीं उदंड हालअपेष्टा सोसल्या होत्या. तीन वेळां खडतर तुरुंगवास भोगल्यामुळें त्यांचें शरीर कृश झालें होतें आणि डोळेही खोल गेले होते. पण कमरेला नुसती लुंगी गुंडाळलेल्या त्यांच्या त्या कृश देहयष्टीकडे आणि त्या खोल गेलेल्या पण तेजस्वी डोळ्यांकडे पाहिल्याबरोबर कुणाही माणसाला आदरच वाटे. दिवसांतून ते फक्त एक वेळां जेवत आणि जमिनीवर टाकलेल्या एका चटईवर झोंपत. त्यांची वाणीही-अत्यंत रसाळ होती. उद्योगधंदे आणि शेतकी, किंवा सैतानी शहरी सुधारणा विरुद्ध निर्व्याज ग्रामीण जीवन यासारख्या आपल्या आवडत्या विषयावर ते बोलूं लागले, कीं त्यांच्या तत्त्वज्ञानाला सक्त विरोध असलेले श्रोतेही

त्यांच्या जिव्हाळ्यानें मोहून जात आणि क्षणभर त्याचें अंतःकरण विरघळे. श्रोत्यांत कांहीं कोंकणी लोक असले तर त्यांच्यावर बाप्पांच्या वाणीचा विशेषच प्रभाव पडे, कारण बाप्पांच्या भाषणांत चटकदार कोंकणी म्हणी मधूनमधून सहज येऊन जात. बाप्पा मूळचे कोंकणातले होते.

त्या दिवशीं संध्याकाळीं लाल मैदानावर कामगारांसाठीं त्यांचें खास भाषण होतें. मुंबईतील कोंकणी कामगार बाप्पांना चांगलेच ओळखत. त्या दिवशीं गिरण्या सुटल्यावर बाप्पांच्या व्याख्यानाला कामगारांची चिक्कार गर्दी झाली होती. बाप्पांनीं भाषण सुरू केल्यावरोबर एकदम शांतता झाली. बाप्पा बोलूं लागले. या शहरी यांत्रीक सुधारणेमुळें माणसांचा आत्मा कसा कोळपून चालला आहे,— फार काय, आपणाला आत्मा आहे याचासुद्धां माणसाला कसा विसर पडत चालला आहे याचें त्यांनीं विदारक, हृदयद्रावक चित्र रेखाटलें. खेड्यांतल्या शांत, सोज्वळ, साध्याभोळ्या जीवनाचा देखावा ते रंगवूं लागले. "......आपल्या कोंकणांतल्या खेड्याची आठवण करा. माडांच्या झावळ्या सळसळताहेत, हिरवींगार शेतें पसरलीं आहेत. तांबड्या पायवाटा मधून मधून गेल्या आहेत. स्फटिकासारख्या स्वच्छ पाण्याचे झरे डोंगरांतून झुळुझुळू वाहताहेत. मोटारींची घरघर, खडखड नाहीं.—गिरणीचा भोंगा नाहीं—धूर नाहीं. ......तुमच्या खाटा नकोत नी बिछाने नकोत. थंड, हिरव्यागार हिरवळीवर,—सृष्टिमातेच्या मांडीवर पडून स्वस्थ

झोंप घ्यावी. पिठासारख्या चांदण्यांत बसून गोष्टी कराव्या. हिरवींपिवळीं शेतं स्वतःच्या हातानीं पिकवावीं नी स्वतः खावं......धडपड नाहीं, गडबड नाहीं......नाहीं तर तुमच्या या शिमिटच्या चाळी ! कबुतराच्या खुराड्यांसारखीं कोंदट, काळोखीं भोकं—आणि त्यांत राहिलीं आहेत शेंकडों माणसं ! निळं सावळं आकाश कधीं पाह्यलंय तुम्हीं ?...... नळावर खरकट्याचे ढीग पडले आहेत. तिथेंच सकाळीं उजाडायच्या आंत—काळोखांत आंघोळ करायची—डबा घ्यायचा नी धांवायचं गिरणींत......झाडं बघायचीं म्हणजे खिडकींत तारेच्या जाळींत ठेवलेल्या कुंडींतल्या खुरट्या, सुकलेल्या तुळशीच्या काड्या !—ना खायला फुरसद ना झोंपायला फुरसद... बारा महिने तेरा मास तोच रगाडा...स्वतःच्या बायका—पोरांशीं-सुद्धां बोलायला वेळ नाहीं..."

सर्व कामगार तटस्थपणें बाप्पांचें भाषण ऐकत होते. पण भिवा कणकवलीकर अगदीं बेहोष झाला होता. त्याचे पंचप्राण त्याच्या कानांत आणि डोळ्यांत उभे राहिले होते. बाप्पा अगदीं त्याच्या मनातलें बोलत होते. इतके दिवस त्याच्या मनांत उसळत असलेल्या अस्पष्ट, अस्फुट भावनांना बाप्पांनीं वाचा फोडली होती. काय जादू आहे या माणसाजवळ;—अगदीं आपल्या मनांतल्या गोष्टी एकामागून एक कसा बोलतो आहे हा, भिवाला वाटलें. त्रासनखात्यांत संबंध दिवस काम करून नाकातोंडांत गेलेल्या कापसानें घुसमटून तो गिरणीच्या बाहेर

पडला होता. बाप्पांचा शब्दन् शब्द त्याला पटत होता. त्यांच्या शब्दाशब्दाबरोबर त्याच्या डोळयांत अश्रू उभे रहात होते. तरुण उमदा कामगार होता तो. आपल्या खेडयावरून,—कणकवलीहून मुंबईत येऊन त्याला सारें एकच वर्ष झालें होतें. कणकवलींतला एक एक देखावा त्याच्या डोळ्यासमोर उभा राहूं लागला. चांदण्यांत रुप्यासारखा चमकणारा तो कणकवलीच्या डोंगराजवळून वहाणारा चिमुकला झरा, हिरव्यागार शेतांतल्या त्या तांबडया पायवाटा, शेतांतून मधून मधून दिसणारे चिखलमातीच्या, टुमदार घरांचे पुंजके, संध्याकाळच्या पिवळ्या उनांत सळसळणारीं शेतें,—त्याच्या डोळयांतून पाणी वाहूं लागलें. त्या शिमिटच्या चाळींचें भेसूर चित्र त्याच्या डोळ्यासमोर उभें राहिलें. एक, दोन, तीन, चार,—तीस, चाळीस त्या मळकट, धुरकट शिमिटच्या चाळी,—त्यांत किडयासारखे लवलवणारे ते तरुण, म्हातारे कामगार, त्यांच्या त्या बायका, त्यांचीं खरूज झालेलीं पोरं, जागोजाग पडलेले ते शेणींचे थापे, खिडक्यांतून लोंबणारे ते फाटक्या, मळकट लुगडयांचे पडदे; नळावर पाण्यासाठीं चाललेले ते बायकांचे झगडे—छे, छे, त्याच्या अंगावर शहारे आले.— आणि श्वास घ्यायला तरी फुरसद? बाप्पा किती खरं बोलले. आपलीं साजू काळी सांवळी असली, तरी नाकीं डोळीं इतकी नीटस म्हणून सगळे नांवाजतात; पण वर्षांतून दोनचारदांसुद्धां दिवसाउजेडीं डोक्यापासून पायापर्यंत तिला डोळे भरून पाहिल्याचें त्याला आठवेना. जळलं हें

शहर ! प्राण गेला तरी यापुढें आपण या शहरांत रहायचें नाहीं, त्यानें ठरविलें.

तो आठ वाजतां घरीं परत आला, तेव्हां साजू गिरणींतून येऊन कपडेलत्ते धुवून टाकून भाकरी करीत चुलीजवळ बसली होती.

" आयकलस काय गो साजग्या ? " काखेंतला जेवणाचा डबा खालीं ठेवीत तो म्हणाला, " फुडच्या म्हयन्यांत आपुन आपलीं कणकवलेक जांवयां,—माकां आतां ह्या शेरांत रवांचां नाय् ! "

" ह्यां काय खूळ आज हाडलास ? " साजू भाकरी तव्यावर टाकीत म्हणाली, " कोनी मेल्यान् ह्यां नयां खूळ भरल्यान् तुमच्या कपळांत ? "

" गप वस, " मिवा ओरडला, " मेल्या कोनाकू म्हनतस ? आमचो बाप्पा तो. मोटो फुडारी आसा – तो भारीच शाणो मागूस. माकां इतके दीस जां वाटां होतां तां भडाभडा बोलान् दाखवल्यान् तेनां आज. देवमानूस हा तो ! कसलो बोलता हूनान सांगू ? तुमच्या सगळ्या देवापेक्षां शिरीष्टी देयीच खरी !"

" ही कसली देवी हाडलास ?" साजू उद्गारली, " माका एक म्हालक्षुमी म्हायत् आसा. ही शिरीष्टी कोन ? "

" अगो बाये, " मिवा तिला समजावून सांगूं लागला; " शिराष्टी हूनान् काय दुसरां ? भायेर हीं हिरयी चार झाडां दिसतत. अकाशांत चंद्रम येता. भायर पिटासारख्या चांदणां

पडतां. आपल्या कणकवलेक् कसां, सगळां हिरयां चार नी तांबडी माती दिसता ? तीच शिरीष्टी. आभाळांत सांजचे हिरये तांबडे रंग दिसतत थयंच जावून् रवांक् होयां !"

" नी खांवक् काय मेळतालां थंय ? गुंडे ?, " साजू शांतपणें बोलत होती, " त्या मेल्याकनी सांगांक् काय ? दिवाळीचे चार दीस येतत गांवाक, नी शेरांत येवून् गांव वरो म्हून नाचतत् ! "

साजूचे हे अरसिक उद्गार भिवाला ऐकवेनात. तो तिच्या अंगावर खेंकसला आणि त्यानें तिला गप्प केली. साजूनें परोपरीनें केलेल्या विनवण्या न ऐकतां स्वतःची नोकरी सोडून देऊन आणि तिची नोकरी तिला सोडायला लावून तो पुढल्या महिन्यांत सर्व संसार गुंडाळून कणकवलीला निघून गेला.

कणकवलींतल्या आपल्या मोडक्या तोडक्या चिखल—मातीच्या घरांत पाऊल टाकल्याबरोबर भिवाचें अंतःकरण आनंदानें थरारून आलें. संध्याकाळची वेळ होती. पिवळें ऊन पडलें होतें. बाप्पांनीं वर्णन केल्याप्रमाणें मखमलीसारखी हिरवळ आजूबाजूला पसरली होती. डोक्यावरचीं, काखेंतलीं बोचकीं घरांत टाकून देऊन भिवा एखाद्या लहान पोरासारखा त्या हिरवळीवर पडून मनसोक्त लोळूं लागला. पांच दहा मिनिटें तो तसा लोळला नसेल, तोंच त्याच्या पायाला कसल्या तरी जिवाणूनें कडकडून चावा घेतला, आणि बेंबीच्या देंठापासून तो कळवळून ओरडला. हिरवळींतल्या एका फुरशानें त्याला दंश

केला होता. साजू बाहेर धांवत आली. आजूबाजूचे शेजारी गोळा झाले आणि त्यांनीं त्याला घरांत नेला. गांवांतल्या मांत्रिकांनीं दोन चार दिवस उपाय केल्यावर त्याचे विष उतरलें, आणि थोड्या दिवसांनीं तो हिंडूं फिरूं लागला. पण त्या विषाची थोडी कसर त्याच्या अंगांत राहिलीच आणि ज्यास्त श्रम केले, कीं अधूनमधून त्याला ताप येऊं लागला. तो शेतांत जाई. काम करी. सर्व कांहीं नेहमींचे उद्योग करी. पण त्या दिवसापासून त्याची पहिल्यासारखी सुदृढ, कणखर प्रकृति राहिली नाहीं. त्याचा स्वभावहि चिरचिऱ्या, तापट झाला. मात्र संध्याकाळच्या वेळेला माडांच्या सळसळणाऱ्या झावळ्या पहात बसण्यांत त्याला अजूनही मजा वाटे.

एके दिवशीं संध्याकाळीं तो असाच माडाच्या झावळ्या पहात आपल्या घराच्या ओट्यावर बसला होता. एकाएकीं सोसाट्याचा वारा आला. आणि एका माडाची झावळी तुटून ती घराच्या छपरावर पडली. घराचें छप्पर मोडून चक्काचूर झालें. सजू घरांत नव्हती आणि तो चट्‌दिशीं बाजूला पळाला म्हणून, बरें; नाहींतर त्या छपराबरोबर कोसळलेल्या भिंतीखालीं त्यांच्यापैकीं कुणीतरी सांपडलें असतें. घर नीट करण्यासाठीं पंचवीस रुपयांचा तरी खर्च होता. भिवाजवळ पांच रुपयेही नव्हते. गांवांतल्या साळपेकर सावकाराकडून त्याला २५ रुपये सहज आणतां आले असते. पण साळपेकराकडे जायचें शक्य तों भिवा टाळी. साळपेकर सावकारानें कर्ज आनंदानें दिलें असतें.

तो कर्ज देण्याच्या संधीची वाटच पहात बसलेला असे. आणि भिवाला तो एका पायावर कर्ज द्यायला तयार असे. साजूवर त्याचा पहिल्यापासून डोळा होता आणि साजूला वश करून घेण्यासाठीं ती मुंबईला जाण्यापूर्वी त्यानें हरप्रयत्न केले होते. त्याच्या त्रासाच्या भीतीनेंच गांवाला परत यायला साजू नाकबूल होती, आणि विनवण्या–आळवण्या करून गांवाला जाण्याविरुद्ध भिवाचें मन वळवण्याचा प्रयत्न करीत होती. भिवाचें घर आणि शेत साळपेकराकडे गहाण होतींच. तो दर आठवड्याला त्यांचीं मडकींगाडगीं जप्त करण्याची धमकी देऊन जाईच. मात्र साजू त्याला वश झाली असती, तर त्यानें सगळें कर्ज माफ केलें असतें. भिवाला तो धमक्या देई. पण साजूकडे मात्र तो डोळा टाकून स्मित करी.

भिवानें कर्ज न काढतां दोन रुपये खर्च करून कसें तरी स्वतःच्या हातानें छप्पर नीट केलें. पण पावसाळा सुरू झाल्यावर घराच्या भिंतीवरून पाण्याचे लोट आंत येऊं लागले. घरांत सर्व चिखलच चिखल झाला. भिवाला शिमिटाच्या चाळींची आठवण झाली. त्या कशाही मळकट, धुरकट, घाणेरड्या असल्या तरी छपरांतून तरी पाण्याचा एक थेंबही येत नसे. निदान झोंपायला तरी सुकी जमीन मिळत असे. शेवटीं साजूच्याच आग्रहानें त्यानें साळपेकर सावकाराकडे जाऊन त्याचे पाय धरले, आणि त्याच्याकडून पंचवीस रुपये मागून आणले.

उन्हातान्हांतून चिखलपावसांतून अर्धपोटी दिवस काढून

काढून साजू टेकीला आली होती. त्यांत आणखी चिरचिऱ्या, तापट झालेला भिवा हजार चिंतांनीं कावून गेला कीं, सर्व राग तिच्यावर काढी आणि तिला यथेच्छ झोडपी. शेवटीं सर्व त्रासांतून मुक्त होण्याकरतां एके दिवशीं ती स्वतः होऊन साळपेकर सावकाराकडे गेली. आणि नंतर ती भिवाला नकळत अधूनमधून नेहमीं जात असे. गांवांत कुजबुज सुरू झाली होतीच. पण भिवाचा त्यावर विश्वास नव्हता.

एके दिवशीं संध्याकाळीं जवळच्याच गांवांत असलेल्या आपल्या भावाकडे जातें म्हणून सांगून साजू बाहेर गेली होती. शेतावरून रात्रीच्या वेळीं भिवा एकटाच घरीं परत येत होता. बाप्पांनी ज्या पिठासारख्या चांदण्याचें वर्णन केल्याबरोबर भिवाच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले होते, तसें स्वच्छ पांढरें चांदणें सभोवार पडलें होतें. कणकवलीच्या त्या डोंगराजवळून वहाणारा तो चिमुकला झरा उड्या मारीत पुढें जाणाऱ्या रुपेरी सर्पासारखा दिसत होता. इतक्यांत झऱ्याजवळच्या खबदडींत कुणी तरी खाकरल्याचा आवाज झाला, म्हणून भिवानें त्या बाजूच्या झाडींत डोकावून पाहिलें. त्याचा स्वतःच्या डोळ्यावर विश्वास बसेना. डोक्यावर वीज कडाडल्यासारखा तो स्तंभित झाला. साळपेकर आणि साजू एकमेकांच्या गळ्यांत हात घालून तिथें अस्ताव्यस्त पडलीं होतीं. त्याच्या डोळ्यांत खून चढला. जवळच पडलेला एक दगड त्यानें उचलला, आणि जोरानें त्या दोघांकडे तो फेंकला. दगडाचा नेम चुकला. साळपेकराच्या

डोक्यावर तो बसला असता, तर साळपेकराची कवटी फुटून तो जागच्या जागीं गतप्राण झाला असता. दगड ओझरता त्याच्या कपाळाला लागला, आणि भोंक पडून रक्त भळभळा वाहूं लागलें. तो ताडकन् उठून उभा राहिला आणि मित्राकडे धांवला. कपडे सावरून साजूही उठून उभी राहिली. साळपे-कराची आणि मित्राची झटपट सुरू झाली. दांडग्या साळपे-करानें त्या तिरीमिरीच्या भरांत रोडावलेल्या मित्राला बेशुद्ध पडेपर्यंत मारला. त्याला तिकडेच टाकून तो घरीं निघून गेला. साजू भावाच्या घरीं पळाली. सावध झाल्यावर मित्रा कसाबसा घरीं आला.

दुसऱ्या दिवशीं साळपेकरानें मित्राला पोलीसांच्या हवालीं केलें. कर्ज चुकवण्याकरतां आपणाला ठार मारण्याचा मित्रानें प्रयत्न केला, असा साळपेकराचा आरोप होता. आपल्या बायकोशीं जारकर्म करतांना आपण त्याला मारण्याचा प्रयत्न केला, असा चांगला बचाव मित्राला देतां आला असता. पण खरी गोष्टसुद्धां कोर्टांत सिद्ध करावयला भरपूर पैसे लागतात. आणि सत्य पुढें मांडण्याकरतां आणावे लागणारे बडे वकील गरीबांना आणतां येत नाहींत. गंभीर इजा करण्याच्या आरोपावरून कोर्टानें मित्राला सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा दिली.

रात्रीच्या शांत वेळीं तुरुंगाच्या कोठडींत पडल्या पडल्या मित्राच्या डोक्यांत केव्हां केव्हां विचार येई, "...त्या खेड्या-

पेक्षां शिमिटाच्या चाळींत राहिलों असतों तर किती बरं झालं असतं...साजूनं मनांत आणलं असतं तरी बदकर्म करायला तिथें सकाळपासून रात्रीपर्यंत गिरणींत भरपूर काम असल्यामुळें वेळहि नव्हता; आणि फावल्या वेळांत वाकडं पाऊल टाकीन म्हटल्यास आजूबाजूला गर्दी करून असलेल्या शेंकडो कुटुंबांचे डोळे तिच्यावर असल्यामुळें तिथें तिला जागाहि नव्हती... ती नको नको म्हणत असतां शहर सोडून तिला अफाट मोकळी जागा आणि भरपूर रिकामा वेळ असलेल्या खेड्यांत नेली ह्मणून हें सगळं झालं..."

हे विचार मनांत आले, कीं त्याला बाप्पाची आठवण होई आणि काय करूं नी काय नको असें होऊन संतापानें तो दांत ओठ खाई.

# कविवर्य

हीं हिरव्या पिवळया, लालनिळया पंखाचीं फुलपांखरं, म्हणजे जगूं काय सृष्टिदेवीच्या डोळयावर तरळणारीं तिची रंगी-बेरंगीं सुखस्वप्नंच, ही कल्पना डोक्यांत आल्याबरोबर 'ललिता-नुजां'चे डोळे आनंदातिशयानें चमकले; आणि त्यांचं सारं शरीर क्षणभर पुलकित झालं. 'फुलपाखरं' नांवाची एक नवीन कविता आज सकाळपासून त्यांच्या डोक्यांत घोळत होती. नऊ वाजून गेले तरी त्यानां स्नान करण्याची शुद्ध नव्हती. स्फूर्तीच्या नशेंत आजूबाजूचं सारं जग ते विसरून गेले होते. पेन्सिल आणि चोपडी घेऊन कविता लिहावयाला सुरवात करण्याकरतां ते टेबलाजवळ बसले होते. पण सुरवात कशी करावी तें अजून नीटसं ठरत नव्हतं. मध्येंच ते बसत. पुन्हां उठत. पुन्हां बसत. पुन्हां एकदां धोतराचा सोगा खांद्यावर

टाकून येरझाऱ्या घालीत. इतक्यांत, ती सृष्टिदेवीच्या रंगीबेरंगी स्वप्नांची कल्पना त्यांच्या डोक्यांत आली; आणि ते पेन्सिल सरसावून लिहावयाला बसले. कागदाला ते पेन्सिल लावतात न लावतात तोंच रेणुकाबाई धाड्दिशीं खोलीचा दरवाजा उघडून फणफणतच आंत आल्या. कडेवर दोन वर्षांचा शशी होता. अंगांत ताप असल्यामुळें तो सारखी किरकिर करीत होता.

"संभाळा जरा याला; मेला चुलीकडे इकडचं तिकडे करायला देत नाहीं," रेणुकाबाई ओरडल्या.

"आतां मला मुळींच वेळ नाहीं. घेऊन जा बघूं त्याला इथून. मला कधीं लिहायची इच्छा झाली कीं अगदीं त्याच क्षणाला तुझं कांहींतरी उपटतं!", लिहिण्यांत व्यत्यय आल्यामुळें माथं फिरलेले ललितानुज खेंकसले.

"पुरे, पुरे. तें रोजचंच आहे. बायको मेली; पोर तापानें फडफडला तरी त्याचं कांहीं नाहीं. खूप लिहिलंत! काय मेलं मिळतंय लिहून तरी. एक दागिना नाहीं, कीं मेला आंगभर कधीं कपडा नाहीं मिळायचा!"

"अग पण वैरिणी, याच वेळेला तूं—" दांतओंठ खात ललितानुज बोलूं लागले.

"मी वैरिण,—मी वैरिण?", रडव्या आवाजांत रेणुकाबाई म्हणाल्या, "दहा वाजतां जेवायला वाढ म्हणाल. आणि जेवण जरा तयार नसलं तर आकाश पाताळ एक कराल.

तुझ्यामुळं मला रोज शाळेंत उशीर होतो, नी हेडमास्तरांचीं बोलणी खावीं लागतात म्हणून मलाच शिव्याशाप घाल!"

"मला आज जेवायलाच नको आहे,–तूं जा बघूं इथून आधीं!", ललितानुज ओरडले.

"जेवायला नको आहे!—शाळा नाहीं वाटतं आज? सव्वानऊ वाजून गेले.—मला आणखी जेवण आटपून सुमित्राबाईच्याकडे जायचं आहे. वासुदेवरावांचं आज जास्तच आहे म्हणे!"

"तूं जा—नाहीं तर नको जाऊं—पण—राक्षसणी, माझ्या फुलपांखरांचा चुरडून–कुस्करून चोळामोळा केलास!"

"आग लावा तुमच्या फुलपांखरांना? लाज नाहीं वाटत? पोर तापानं फणफणलाय—जिवश्चकंठश्च मित्र तिकडे आतां मरतो, कीं उद्या मरतो असा होऊन बिछान्यावर पडलाय, आणि तुह्मी इथं कविता लिहिताय?— संभाळा याला—जाऊंदे मला चुलीकडे!", असं ह्मणून शशीला थबकन् त्यांनी ललितानुजांच्या पुढ्यांत ठेवला, आणि स्वयंपाकघराकडे जायला त्या वळल्या. जातां जातां त्या म्हणाल्या, "आणि संध्याकाळी जेवणाला जर उशीर झाला तर घर डोक्यावर घेऊं नका. तुमचाच मित्र आजारी आहे म्हणून सुमित्राबाईच्या मदतीला मी जातेय. जास्त आहे म्हणे त्यांचं;–वेळ होईल मला यायला कदाचित्"

शशी रडतच होता. कपाळावर हात घेऊन ललितानुज टेबलाजवळ बसले होते. या आरडाओरडींत त्यांची स्फूर्ति केव्हांच

उडून गेली होती. कल्पनेचा धागा तुटून त्याचे तुकडे तुकडे झाले होते. समोरच्या जमिनीकडे ते शून्यपणें पहात होते. जणूं काय मातीला मिळालेलीं त्यांचीं फूलपांखरंच त्यांना तिथं दिसत होतीं. ती कविता आतां पुन्हां लिहिणं शक्यच नव्हतं. आणि वेळहि नव्हता. घड्याळांत दहाचे टोले पडले. दचकून त्यांनीं वर पाहिलं आणि चटकन् उठून शून्यमनस्कपणें ते आंघोळीच्या खोलीकडे गेले.

'ललितानुजां'चं खरं नांव विश्वनाथ विष्णू शेलवणकर; पण सारा महाराष्ट्र त्यांना 'ललितानुज' याच नांवानें ओळखे. बालकवीनंतर निसर्गवर्णनपर इतक्या गोड आणि गोंडस कविता लिहिणारा दुसरा कवि झालाच नाहीं, अशी सबंध महाराष्ट्रांत त्यांची ख्याती होती. त्यांच्या काव्याइतकाच त्यांचा आवाज गोड होता. आणि या आवाजाच्या जोडीला—लालसर गोरा वर्ण, लांब सरळ नाक, भव्य कपाळ आणि विलक्षण आकर्षक असे स्वप्नाळू डोळे यांची भर पडल्यामुळें तरुणतरुणींत ते अतिशय लोकप्रिय होते. वासुदेवराव दंडवते हे त्यांचे बालपणापासूनचे मित्र. ललितानुजापेक्षां वयानें ते चार पांच वर्षांनीं मोठे होते. त्यांचं वय असेल चाळिस एकेचाळिस वर्षं. पण चाळीशी उलटायच्या आंतच एक मोठे कवी म्हणूनच नव्हे, तर एक चतुरस्र विद्वान् म्हणून महाराष्ट्रसाहित्यांत त्यांनीं मानाचं स्थान मिळवलं होतं. साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना लवकरच मिळणार हें जवळ जवळ ठरल्यासारखं झालं होतं. त्यांचं टोपणनांव

'वाग्विलास.' 'ललितानुज' आणि 'वाग्विलास' यांची अनन्यसाधारण मैत्री हा मराठी साहित्यिकांत एक सादर कौतुकाचा विषय होता. 'ललितवाणी' या नांवाच्या दोघांच्या कांहीं कवितांच्या एका संयुक्त संग्रहानें मराठी वाङ्मयांत त्यांची मैत्री अजरामर करून टाकली होती.

'ललितानुज' मुंबईतल्या न्यू व्हिस्ता हायस्कूलमध्यें शिक्षक होते. 'वाग्विलासही' दादर येथील सरकारी हायस्कूलांत असिस्टंट हेडमास्तरच्या जागेवर होते. मात्र वासुदेवरावांचा संसार जितका सुखी होता तितका विश्वनाथरावांचा नव्हता, ही गोष्ट जगजाहीर झाली होती. तशा रेणुकाबाई वाईट नव्हत्या दिसायला त्या वाईट नव्हत्याच,– चांगल्या गोऱ्या, सडपातळ, भरदार केशकलाप असलेल्या त्या होत्या; पण तसं पाहूं गेल्यास वागणूकीलाही त्या चांगल्या होत्या. घरातलं काम करावं, घरांतल्या माणसांनां खाऊ घालावं, लोकांना खाऊ घालावं, असं त्यानां वाटे. आणि स्वतःच्या घरांतल्या माणसांसाठींच नव्हे, तर दुसऱ्यासाठींसुद्धां स्वतःच्या खाण्यापिण्याची किंवा प्रकृतीची पर्वा न करतां त्या खपत असत. मात्र विश्वनाथरावांचं तें लिहिणं आणि त्यांच्या लहरी, यामुळें अगदीं कावून जाऊन उठल्यासुठल्या त्या नवऱ्याशीं कडाक्याचं भांडण करीत. अर्थात् भांडण झाल्यावर रागानें त्या स्वतः उपाशी रहात, पण नवऱ्याला मात्र पोटभर जेऊं घातल्याशिवाय उठूं देत नसत. त्यांच्या अरसिकपणामुळें विश्वनाथराव घरीं आले कीं सदा

दुर्मुखलेले असत. संसारांत यापुढं कधीं आपणाला सुख मिळेल ही आशाच त्यांनी सोडून दिली होती. त्यांची विषण्णता पाहून त्यांच्या मित्रांना आणि शेजाऱ्यांनासुद्धां त्यांची दया येई. या हळव्या कलावंताचं मनच रेणुकाबाईना कळलं नाहीं, आणि कळणं शक्य नाहीं, असं त्यांना वाटे. त्यांच्या काव्यावर आणि रूपगुणांवर लुब्ध असलेल्या अनेक रसज्ञ तरुणींपैकीं एकादीशीं त्यांनीं दुसरं लग्न केलं तर ते सुखी होतीलच, पण रेणुकाबाई-नाही योग्य शिक्षा होईल असंही त्यांच्या कांहीं मित्रांना वाटे. घरीं इतका त्रास होत असतां, आणि बाहेर असली मोहाचीं जाळीं तयार असतां ते तसं कांहीं करीत नाहींत, हा त्यांच्या मनाचा केवढा मोठेपणा असं लोक समजत; आणि मग विश्वनाथ-राव अधिकच विषण्ण होत. एवढ्या मोठ्या प्रथितयश कवीची बायको म्हणून धन्यता मानून घेण्याऐवजीं आपली बायको दागिने आणि लुगडीं मिळत नाहींत, असल्या क्षुद्र कारणांसाठीं चरफडत रहाते याचें त्यांना जितकें वाईट वाटे तितकाच संतापही येई. एकदां ते तसं रेणुकाबाईना म्हणाले सुद्धां; तेव्हां त्या उसळून म्हणाल्या, "तुमच्या कीर्तीनं माझं अंग नाहीं झांकत. एक चांगलंसं लुगडं घेऊन द्या.--चार बायकांत जायची सोय नाहीं उरलेली मला!" तेव्हांपासून त्यांच्याशीं वादविवाद करण्याचंच विश्वनाथरावांनीं सोडून दिलं होतं. आज त्यांच्या 'फुलपाखरां'नां रेणुकाबाईनीं धुळीला मिळविल्यानंतर ते असेच विषण्ण होऊन शाळेंत निघून गेले. ते शाळेंत गेल्यावर रेणुका-

बाईनीं कसे तरी चार घांस तोंडांत टाकले आणि स्वयंपाकघराचं घुणंसारवणं करून त्या सुमित्राबाईकडे जायला निघाल्या. वासुदेवराव कित्येक दिवस विषमज्वरानें आजारी होते; आणि गेले दोन तीन दिवस तर ते अत्यवस्थच होते. सुमित्राबाईनां मदत आणि सोबत करायला रेणुकाबाई रोज त्यांच्याकडे जात.

रेणुकाबाई सुमित्राबाईच्या घरांत गेल्या तेव्हां सुमित्राबाई मुलांना जेवूं घालण्याच्या धांदलींत होत्या. रेणुकाबाईनीं त्यांच्या हातांतलं सर्व काढून घेतलं, आणि वासुदेवरावांना काय पाहिजे नको तें तुम्ही पहा, म्हणून त्याना त्यानीं तिथं पिटाळलं. "तुम्ही तिथं बसा, मी सर्व करतें," त्या म्हणाल्या. दोन्ही-तिन्ही मुलांनां त्यानीं भरवून काढलं, स्वयंपाकघरांतलीं भांडीं एका बाजूला करून ठेवलीं, स्वयंपाकघर धुतलं, आणि शेण-सारवण करून कपाळावरचा घाम पदरानें पुशीत रेणुकाबाई बाहेर आल्या. वासुदेवरावांचा किंचित् डोळा लागला होता म्हणून सुमित्राबाई बाहेर येऊन बसल्या होत्या. रेणुकाबाईचं आणि सुमित्राबाईचं चांगलच सख्य होतं. बोलतां बोलतां रेणुकाबाई म्हणाल्या, "माझा जीव अगदीं विटलाय्, बाई!— कुठेंतरी जाऊन विहिरींत उडी टाकावी, नी जीव द्यावासा वाटतो. हें घर नी संसार अगदीं नकोसा झालाय्!"

"असं काय करता, रेणुकाबाई," सुमित्राबाई म्हणाल्या, "विश्वनाथराव तसे मनानें अगदीं चांगले आहेत. तुम्ही जरा सांभाळून घेतलं पाह्यजे इतकंच."

" खूप घेतें हो सांभाळून. पण मला नाहीं, बाई, सहन होत मेलं. आम्हां माणसांना मन आहे कीं नाहीं ? यांच्या त्या कवितेंतल्या फुलपांखरांना धक्का लागला तर यांचा जीव खालींवर होतो; पण आमचं काळीज करपून कोळसा झाला तरी त्याचं यांना कांहीं नाहीं वाटत ! आज सकाळीं काय काय म्हणून बोलले मला," डोळ्यांना पदर लावून रेणुकाबाई म्हणाल्या.

" भलतंच काय मनाला लावून घेतां—जाऊं द्या विसरा तें," सुमित्राबाई त्यांना शांत करूं लागल्या, " आपला बायकांचा जन्मच असा !"

" अहो पण मी सगळं त्यांच्यासाठींच करतें ना ?सकाळीं जेवायला उशीर झाला तर शाळेंत कसं वेळेवर जातां येणार ?—आणि मेलं लिहिणं झालं म्हणून काय झालं—घरांत पोराला ताप भरला, तिकडे मित्र कण्हत पडलाय्, तरी लिहिणं कसलं ?"

" त्यानां आवडतं तें ते करतात. त्यांत आपण मोडता घालून कसं चालेल ? आज सगळं जग त्यांची स्तुती करतं आणि आपण असं म्हणायचं ?"

" मलाहि अभिमान वाटतो हो लोक त्यांची स्तुती करतात तें बघून. पण माणसाला वर्षांतून एकदां कधीतरी चांगलंस लुगडं, नाहीं तर पातळ हवंस वाटलं मग त्यांत चुकलं कुठें हो ? कधीं चुकून कांहीं मागितलं तर एवढी डोक्यांत राख घालून चिडायला काय झालं ? आम्हीही माणसंच आहोंत. आम्हांला कांहीं मन आहे कीं नाहीं ?"

" तें खरं आहे. पण हे लेखक आणि कवी असेच चमत्कारिक नी चिडखोर असतात. इकडचं तंत्र संभाळतांना मला काय कमी त्रास होतो ? पण यांचीं मनं फार हळवी असतात."

" मी नाहीं कुठें म्हणतें ? पण, मला वर्षातून एकदां चांगलं लुगडं घ्यायला पैसे नाहींत, आणि त्या दिवशीं मुलींच्या कॉलेजांत काव्यगायनाला जायचं होतं तर जुनी धोतरजोडी जरा कुठं चुरल्यासारखी झाली होती तेंव्हां ताबडतोब नवी तलम धोतरजोडी आणायला मात्र पैसे उभे राहले !"

" तुम्ही असं कांहीं तरी बोलतां आणि मग लोक वाटेल तें बडबडूं लागतात. अलिकडे आपण फार संभाळून वागलं पाहिजे. प्रसिद्ध लोकांची पहिली बायको जिवंत असली तरी त्यांच्याशीं लग्न करण्याचं खूळ हल्ली सुशिक्षित मुलींच्या डोक्यांत शिरलं आहे. आणि विश्वनाथरावहि तसे दिसायला चांगले आहेत. मी आपलं सांगून ठेवतें तुम्हांला. त्यांची चूक असली तरी आपण चिडतां कामा नये;—पोटांत घातली पाहिजे चूक. कांहीं झालें तरी आपण बायका !"

वासुदेवरावांच्या खोलीतून आवाज आला, म्हणून बोलणं ता[illegible]च टाकून सुमित्राबाई आंत जायला उठल्या. रेणुकाबाईही त[illegible]या मागोमाग वासुदेवरावांच्या खोलींत गेल्या. वासुदेवराव [illegible]ल्यासारखे झाले होते. सुमित्राबाईनीं डॉक्टरनां बोलावणं [illegible]लं. डॉक्टर आले, आणि कांहीं इंजेक्शन देऊन गेले. [illegible]देवरावांची प्रकृति अधिकच चिंताजनक झाली होती. रेणुका-

बाई संध्याकाळपर्यंत सुमित्राबाईंच्या सोबतीला राहून घरांतलं सर्व काम करीत होत्या. संध्याकाळीं आपलं घरचं जेवण केलंच पाहिजे म्हणून वाईभाईनें त्या घरीं परत आल्या.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं विश्वनाथराव शाळेंत जायला निघाले तेव्हां रेणुकाबाई अगदीं काकुळतीला येऊन म्हणाल्या, "आज नका जाऊं गडे, शाळेंत. वासुदेवरावांची चिन्हं कांहीं ठीक नाहींत. माझ्याबरोबर आज तुम्ही चला तिथं; आणि सारा दिवस तिथंच रहा. दिवसांतून एकदोनदा नुसतं पांचदहां मिनिटं तुम्हीं तिथं बसून 'कसं आहे' म्हणून विचारून जातां तें बरं नाहीं दिसत. आज रहाच घरीं. तुम्हाला कांहीं काम करायला नको, पण तुम्ही तिथं असलेलं बरं."

"रहायला कांहीं हरकत नाहीं ग. वासुदेवरावासाठीं मी वाटेल तें करीन. पण मला तें बघवत नाहीं. तुम्हां बायकांना बरं जमतं तें." विश्वनाथराव म्हणाले.

"काय बघवत नाहीं?"

"रोग्याच्या त्या वेदना,—तें विव्हळणं, रोग्याच्या खोलीतलं तें रक्त, मलमूत्र, कफाचं कसंसच वातावरण—मला अगदीं सहन होत नाहीं—माझं अंतःकरण दुभंगून जातं. मला वासुदेवराव[illegible]ल वाटतं पुष्कळ, पण तिथं बसवत नाहीं, हें खरं आहे, [illegible]वा. तुम्ही बायका तशा उलट्या काळजाच्या. तुम्हांला कांहीं [illegible]टत नाहीं—सारा दिवस डोळ्यासमोर तें सर्व दिसत अर[illegible]ना तुम्ही घट्ट मनानं सर्व कांहीं करीत असतां!"

"हें बरं, बाई बोलणं! कांहीं वाटत नसलं, आणि कांहीं करायचं नसलं तरी आम्हाला खूपखूप वाटतं, पण तें सर्व बघवत नाहीं म्हणून खुशाल बसायचं, आणि वर आणखी आम्ही मरेमरेतों राबतों त्यांना उलट्या काळजाच्या म्हणायचं!"

"मला काय वाटतं नी किती वाटतं तें तुला नाहीं कळायचं!" विश्वनाथराव उद्गारला.

"नाहींच बाई, कळत!" असं म्हणून रेणुकाबाई सुमित्राबाईकडे जायला निघाल्या; आणि विश्वनाथराव शाळेंत निघून गेले.

सुमित्राबाई 'नको नको' म्हणत असतां रेणुकाबाई पडेल तें काम करीत होत्या. थुंकीचीं भांडीं उचलणं, घाणेरडे कपडे बदलून टाकणं, गरम पाण्याच्या पिशव्या भरणं—सर्व कांहीं घाणेरडीं कामें आपण कांहींच करीत नाहीं असं दाखवीत त्या करीत असतांना पाहून, सुमित्राबाईनां कृतज्ञता वाटेच, पण आपण त्यांना असलीं कामं करूं देणं बरं नाहीं असं वाटून त्या सारख्या 'नको' 'नको' म्हणत. रेणुकाबाईंचे उपकार आपण कधींतरी फेडूं शकूं का, असं मनांतल्या मनांत वाटून त्यांना लाज वाटे.

शाळेमध्यें विश्वनाथरावही वासुदेवरावांच्या विचारानं सारा दिवसभर बेचैन होते. मधल्या सुटीनंतर त्यांना मोकळे तास होते म्हणून सहज ते शाळेच्या लायब्ररींत गेले. हाताला लागलं तें पुस्तक त्यांनीं बाहेर काढलं. टेनिसनचं, 'In Memorium'

निघालं. ते एकदम दचकले. पण वाचतां वाचतां त्यांचं मन रमलं. वासुदेवराव आपणाला सोडून गेले, तर आपणही असं एखादं काव्य लिहूं शकूं का? त्यांच्या डोक्यांत विचार आला. लहानपणापासूनच्या सर्व स्मृती आपण त्या काव्यांत घालूं, मंदाक्रान्तासारख्या वृत्तांतच हें काव्य चांगलं होईल, मराठींत तर तें अद्वितीयच ठरेल, इत्यादि विचारांत ते गुंगले असतां त्यांच्या जिवाला लागलेला घोर ते विसरून गेले.

त्यादिवशीं रात्रीं जेवण आटोपून विश्वनाथराव आणि रेणुकाबाई बोलत बसलीं होतीं. इतक्यांत सुमित्राबाईकडचा नोकर बोलवायला आला. वासुदेवरावांचं प्राणोत्क्रमण झालं होतं.

'वाग्विलासां'च्या अकालीं मृत्यूच्या बातमीनें अखिल महाराष्ट्रांत हाहा:कार उडाला. गावोगांव मोठमोठ्या दुखवट्याच्या सभा झाल्या. मुंबईतली सभा फारच मोठी झाली. त्या सभेंत मुख्य वक्ते म्हणून अर्थातच 'ललितानुज' भाषण करणार होते. पण व्यासपीठावर उभे राहून ते दोन चार शब्द बोलले नसतील तोंच त्यांचा कंठ दाटून आला. त्यांच्या तोंडांतून शब्द बाहेर फुटेनासे झाले. त्यांच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहूं लागले; आणि ते मटकन् खालीं बसले. श्रोतृसमुदायामध्येंसुद्धां शेंकडों लोकांनीं डोळ्यांना रुमाल लावले. या प्रसंगामुळें मुंबईतल्या सभेचा फारच बोलबाला झाला.

या सभेनंतर दोनचार दिवसांनीं आपल्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें रेणुकाबाई सुमित्राबाईकडे बसायाला म्हणून गेल्या

होत्या. बोलतां बोलतां रेणुकाबाई कळवळून म्हणाल्या, "ह्या संसार आतां चालवायचा म्हणजे तुमचं नी मुलाबाळांचं कसं होणार कांहीं कळत नाहीं. आह्मी हीं अशी गरीब,--माझ्याकडे कांहीं पैसे असते तर खरंच मी तुम्हाला ते सर्व देऊन टाकले असते. पण बोलतेंय काय मी?—माझ्या कनवटीला कधीं एक पैसा तरी असतो कां?—खरंच सांगतें, सुमित्राबाई, मीही अशी दरिद्री–म्हणून नाही तर—"

"तुम्ही थोडं कां करतां, रेणुकाबाई? आणखी पैसे कशाला हवेत? काय व्हायचं तें होईल" सुमित्राबाई विरघळून म्हणाल्या.

याच वेळेला विश्वनाथराव शाळा सुटल्यानंतर सहज मास्तरांच्या खोलींत वर्तमानपत्रं चाळीत बसले होते. एका बातमीवर त्यांचें लक्ष गेलं. कुणा एका संस्थानिकानें 'वाग्विलासां'च्या पत्नीला सहाय्य म्हणून पांचशेंएक रुपयांचा एक चेक धाडला होता, आणि ते काम करीत असलेल्या शाळेच्या अधिकाऱ्यांनीही 'वाग्विलासां'च्या विधवेला महिना पंचवीस रुपये पेन्शन द्यावयाचें ठरविलें होतें. 'वाग्विलासां'चा अकालीं मृत्यू झाला तरी त्यांच्या मागें राहिलेल्यांची बरी सोय झाली म्हणायची, विश्वनाथरावांच्य मनांत एक विचार चमकून गेला. त्याच क्षणाला दुसरा कांहीं विचार त्यांच्या मनांत आला. त्यानीं एक कागद घेतला आणि त्यावर कांहीं लिहून त्याची घडी करून तो पाकिटांत घातला. शाळेच्या शिपायाला त्यांनीं बोलावलें आणि त्याच्याबरोबर तें पत्र

त्यानीं सुमित्राबाईच्याकडे पाठवून दिलें.

रेणुकाबाई आणि सुमित्राबाई बोलत बसल्या होत्या तिथेंच शिपाई पत्र घेऊन आला. सुमित्राबाईच्या हातांत त्यानें तें पत्र दिलें. कांहीं उत्तर द्यायचं असेल म्हणून तो तिथंच बाहेर उभा राहिला. सुमित्राबाई पाकीट उघडून पत्र वाचूं लागल्या. पत्र वाचतां वाचतां त्यांचा चेहरा एकदम गोरामोरा झाला. त्या सुन्न झाल्यासारख्या दिसल्या. रेणुकाबाई त्यांच्याकडे पहातच होत्या.

"काय झालं ?— कुणाचं पत्र सुमित्राबाई ?" रेणुकाबाईनीं विचारलं.

"कांहीं नाहीं." म्हणून यांत्रिक बाहुलीसारख्या सुमित्राबाई उठल्या आणि कपाटाजवळ जाऊन त्यानीं कपाट उघडलं. कपाटांतून एक दहा रुपयांची नोट त्यानीं बाहेर काढली. कपाट बंद करतांना बाजूलाच भिंतीवर असलेल्या एका फोटोकडे त्यांचं लक्ष गेलं. त्या फोटोंत 'ललितानुज' आणि 'वाग्विलास' एकमेकांच्या गळ्यांत हात घालून हंसत उभे होते. सुमित्राबाईच्या डोळ्यांतून घळघळा अश्रुधारा वाहूं लागल्या. डोळे पुशीत त्या पुढें आल्या, आणि ती दहा रुपयांची नोट त्यानीं शिपायाच्या हातांत दिली. तो निघून गेला. रेणुकाबाई हतबुद्ध होऊन त्यांच्याकडे पहात होत्या. "कुणाचं पत्र ? काय झालं, सुमित्राबाई ?" अधीरपणें रेणुकाबाई ओरडल्या.

"कांहीं नाहीं", म्हणून सुमित्राबाईनीं मान हालवली, आणि खालीं मान घालून त्या बसल्या.

"पाहूं द्या मला काय तें." म्हणून रेणुकाबाईनीं त्यांच्या हातांतल्या पत्राला हात घातला. सुमित्राबाई 'नको' 'नको' म्हणून पत्र सोडीत नव्हत्या. पण रेणुकाबाईनीं जवळ जवळ जबरदस्तीनें तें घेतलंच. सुमित्राबाईनीं पलीकडे मान फिरवली.

रेणुकाबाई पत्र वाचूं लागल्या. पत्रांत पुढील मजकूर होता.

"......परवां दुखवट्याच्या सभेकरतां जो हॉल घेतला होता. तो चालकांनीं फुकट दिला होता, पण दिवाबत्तीचा वगैरे एकंदर खर्च आठ रुपये सहा आणे झाला. तो मी दिला. आतां शिपायाबरोबर किंवा सवडीनें केव्हांतरी तो पाठवून देण्याची कृपा करावी......

विश्वनाथराव."

पत्र वाचतां वाचतां रेणुकाबाईचा चेहरा लज्जा, संताप तिरस्कार या विकारांच्या गर्दीनें निळाकाळा झाला. त्यांचे ओंठ थरथर कापूं लागले. काय बोलावं, काय करावं, त्यांना सुचेना. डोळा वर करून सुमित्राबाईकडे पहाण्याचा त्यांना धीरच होईना. जमीन, आकाश, आजूबाजूचं सारं जग, सर्व—सर्व कांहीं धडधड कोसळून आपल्याभोंवती पडत आहे असं त्यांना वाटलं. त्यांनीं खालीं मान घातली, आणि असहाय्यपणें त्या ढसाढसा रडूं लागल्या.

---

# क्रांतिकारक

लालबावटा मिलमजूर संघाचे सरचिटणीस आणि प्रख्यात कामगार पुढारी भाई ठकार संघाच्या कचेरींत कागदपत्र चाळ-ण्यांत गढून गेले होते. 'चांदतारा' मिलमधल्या संपानें भलतेंच उग्र स्वरूप धारण केलें होतें. पुढाऱ्यांनीं हुकूम द्यायच्या आधींच वायंडिंग खात्यांतल्या बायका बाहेर पडल्या होत्या, आणि गिरणीच्या दारावर त्यांनीं पिकेटिंगलाही सुरवात केली होती. नुकत्याच झालेल्या धरपकडींत बहुतेक कामगार पुढारी पकडले गेले होते. कॉमरेड ठकारच काय ते बाहेर राहले होते. आणि तेही केव्हां पकडले जातील त्याचा नेम नव्हता. त्यांना पक-डायला पोलीस कांहींतरी कारण पहातच होते. ते मोकळे रहाणें 'पार्टी'च्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचे होते, आणि शक्य तों स्वत:ला पकडूं देण्याची संधी पोलिसांना द्यायची नाहीं अस

'पार्टी'चा त्यांना आदेश होता. त्यांनी कागदपत्र बाजूला सारले आणि बाजूच्या बाकावर बसलेल्या विठू गिरवणकर या तरुण कामगाराला त्यांनीं जवळ बोलावलें. गिरवणकर चारसहा महिन्या-पूर्वीच चळवळींत आला होता. पण ठकारना त्याच्याविषयीं खूपच आशा वाटत होत्या.

"विठू," आपले निखाऱ्यासारखे धगधगणारे डोळे त्याच्यावर रोखून ठकार बोलूं लागले, "आतां या संपाची नी सगळ्याच चळवळीची जबाबदारी तुम्हां तरुण कामगारांवर आहे. मला बाहेर पडतां येत नाहीं. पोलीसांना तें हवंच आहे. 'चांदताऱ्या'चा संप तुम्हालाच चालवला पाहिजे. आतां नऊ वाजले आहेत. ताबडतोब तूं तिकडे जा. बायकांनीं सकाळीं सातलाच पिकेटिंगला सुरुवात केली असेल. काय काय करायचं तें काल मी तुला सांगितलंच आहे. आहे ना लक्षांत?"

"हो." विठूनें मान हालवली.

"सांभाळून वागायचं. संध्याकाळीं मला सगळा रिपोर्ट मिळाला पाहिजे. आणि 'पार्टी'ची गुप्त कामं विसरूं नको. कुणा-कडे चकार शब्द फुटतां कामा नये तोंडांतून त्या कामासंबंधीं. काय होईल तें माहीत आहे तुला. जा पळ." त्याच्या खांद्याला हात लावून ठकार म्हणाले.

ठकारांनींच दिलेली आपली फाटकी कातड्याची बॅग विठूनें उचलली आणि संपासंबंधींची पत्रकें, इतर सटरफटर कागद वगैरे आंत भरून तो जायला उठला. आज त्याला केवढा अभि-

मान वाटत होता. ठकारसाहेबांनीं आपणाला विश्वासांत घेऊन एवढी मोठी कामगिरी आपणावर सोंपवलेली पाहून त्याला मोठे-पणा वाटत होता; आणि मनांतल्या मनांत गुदगुल्या होत होत्या. बॅग काखेंत मारून तो डौलांत बाहेर पडला.

विठू गिरवणकराचं वय फार तर अठरा एकोणीस वर्षांचं असेल. कामगार वस्तींतल्या भुसाऱ्याच्या चाळींत आपल्या आई-बरोबर,–जनामावशी म्हणून तिला सर्व शेजारी ओळखत–तो रहात असे. त्याचा बाप सात आठ वर्षांपूर्वीच वारला होता. बाप गिरणींतच कामाला होता. पण त्याला पगार चांगला होता. बाप जिवंत असतांना त्याची आई कांहीं काम करीत नव्हती. त्याच्या मृत्यूनंतर कांहीं तरी काम करणं तिला भाग पडलं. गिरणींतलं काम झेंपण्यासारखं तिचं वय नव्हतं. नवरा मेला तेव्हांच ती अडतीस एकूणचाळीस वर्षांची होती. आतां तर पन्नाशीच्या जवळ ती आली होती. तिचीं पहिलीं तीनचार मुलं मेलीं होतीं. शेवटचा विठूच काय तो जगला होता. विठूनें गिरणींत जाऊं नये, त्यानं चार पुस्तकं शिकावीं, आणि कांहींतरी चांगली नोकरी करावी, अशी म्हातारीची फार इच्छा होती. म्हणूनच नवरा मेल्यावर तिनं विठूला शाळेंतून काढला नाहीं. आजूबाजूला श्रीमंत मराठ्यांचीं घरं होतीं त्यांच्याकडे स्वयंपाक कर, धुणीं भांडीं कर, असे काबाडकष्ट करून ती चार पैसे मिळवी, आणि विठूचं शिक्षण चालवी. विठूनं जेमतेम इंग्रजी चार इयत्तांपर्यंत मजल गांठली होती. पुढें कामगार चळवळीसंबंधींची पुस्तकं,–

पत्रकं वाचण्याचा त्याला नाद लागला. रशियन क्रांतीपूर्वी आणि क्रांतीनंतर तिथल्या तरुण कामगारांनीं केलेल्या कार्याचीं रसभरित वर्णनं वाचून त्याच्या मनांत नवीन स्फूर्ती संचरूं लागली. कामगार पुढाऱ्यांनीं चालवलेल्या अभ्यासमंडळांत तो नियमानं जाऊं लागला. कॉमरेड ठकार जेव्हां तरुण कामगारांच्या कर्तबगारीचं आणि त्यांच्यापुढं उभ्या असलेल्या महान् कार्याचं आपल्या अमोघ वाणीनं वर्णन करीत, तेव्हां विठूच्या आंगावर रोमांच उभे राहात. आईनें मोजलेल्या नाहीं नाहीं त्या शिव्या सहन करून त्यानं शाळा सोडली, आणि तो चळवळींत सामील झाला.

"मेल्या खातलस काय?...त्या फुडाऱ्यांच्या आवशीबापाशींचो डबोलां आसां—तुझ्याकडे काय हा मेल्या?...मी आतां ठकलेंय, माझ्यान् काय होवंचा नाय—", असं जेव्हां त्याची आई दांत ओठ खात म्हणाली तेव्हां क्षणभर तो गोंधळल्यासारखा झाला. पण भरेल कसं तरी पोट असा विचार करून त्यानं तिच्याशीं कांहीं वादच केला नाहीं. नाहींतरी, सध्यां म्हातारी काम करीत होती आणि तिच्या कितीहि शिव्या ऐकाव्या लागल्या तरी दोन वेळां कसंबसं त्याला अन्न मिळतच होतं. तुसत्या पोटाचा आणि पगाराचा सदान्‌कदा विचार करणारे आजूबाजूचे कामगार पाहिले कीं त्याला कींव येई. पगाराला काट बसून संप करण्याची वेळ आली म्हणजे मग या लोकांनां कामगार चळवळीची आणि लालबावट्याची आठवण होते,—नाहींतर लाल क्रांती, कामगारवर्गाचं ऐतिहासिक कार्य—इत्यादि गोष्टींचा

हे लोक विचारसुद्धां करीत नाहींत, त्याला वाटे. त्यानं गिरणींत कधीं काम केलं नव्हतं आणि भांडवलशाही जुलुमाची त्याला विशेषशी आंचही लागली नव्हती. तरीपण काम आणि पगार यापलीकडे पाहूं न शकणाऱ्या कामगारांचा त्याला मनापासून राग येई.

संघाच्या कचेरींतून बाहेर पडून रस्त्यावर कांहीं पावलं विठू पुढे गेला नसेल तोंच समोरून भिकू येत असलेला त्याच्या दृष्टींस पडला. भिकू विठूचा मित्र होता. तोही संघाचं मधून मधून कांहींतरी काम करी; पण बहुतेक वेळ लांब केंस वाढवून कामगार वस्तींत उगाच फाक्या मारण्यांतच तो घालवी. काखेंत बॅग घेऊन डौलांत चाललेल्या विठूला बघून भिकू थांबला आणि हंसत हंसत उद्गारला, "काय, फुडाऱ्यानूं, इतक्या घायन् खंय चललास?"

त्याची थट्टा विठूला विशेष आवडली नाहीं, पण आपणाला पुढारी म्हटलेलं ऐकून त्याला जरा बरं वाटलं.

"चांदताऱ्यार चललंय" तो म्हणाला, "आतां सगळी जबाबदारी माझ्यारच आसा,--ठकारसाहेब भायर पडाचे नाय्-माकांच हो संप चालंवक् होयो."

"खरांच की काय?" भिकू गंभीर होऊन म्हणाला.

"खरां म्हणजे?" आपल्या मोठेपणाच्या जाणिवेनें विठू बोलूं लागला, "अरे बाबा, आमच्या 'पार्टी'ची तीं—" 'पार्टी'च्या कामासंबंधी कुठं चकारशब्द बोलायचा नाहीं या ठकारसाहेबांच्या

हुकमाची त्याला आठवण झाली आणि त्यानं जीभ चावली. विषय बदलून तो म्हणाला, "चल, जावंदे बाबा. आतां आख्या दिवसांत फुरसद मेळाची नाय्."

'चांदताऱ्या'च्या दरवाजाजवळ तो गेला तेव्हां तिकडे एकच दंगल उडालेली त्याला दिसली. शेंकडो कामगार स्त्रिया हातांत हात घालून कडं करून दरवाजासमोर उभ्या होत्या. मालकांनीं लॉऱ्या भरून संपफोडे आणले होते. लॉऱ्या बाजूला उभ्या होत्या. आणि बायकांचं कडं तोडून संपफोड्यांना आंत कसें घुसवावें या विचारांत शावकशा पार्शी मॅनेजर आणि इतर कांहीं जॉबर बाजूला उभे होते. लाठीबंद पोलीसांची एक पार्टी सार्जंट लेनॉक्सच्या नेतृत्वाखालीं नुकतीच येऊन थडकली होती.

"आतां इलास?—मघांपासून हंय काय चललांसा—", विठूला बघून पुढें उभ्या असलेल्या दोन तीन बाया म्हणाल्या.

"थोडो उशीर झालो—" विठू म्हणाला आणि त्यांचं पुढारीपण घेऊन बाजूला उभा राह्यला.

शावकशा मॅनेजरचें आणि लेनॉक्सचें कांहीं तरी बोलणें झालें. पोलीसांची तुकडी घेऊन लेनॉक्स पुढें येऊं लागला. 'येवंदे मेल्याकनीं—काय करतत तां तरी बगूंया!', बायका म्हणत होत्या. आपण पुढारी म्हणून विठूला मोठेपणा वाटत होता; पण पहिलाच प्रसंग असल्यामुळें कीं काय त्याच्या छातींत भीतीचा गोळा आला होता. बायकांचा बेडरपणा पाहून त्याला धीर वाटत होता, तरी पण—लाठीमार होऊन रक्तपात

झाला—सार्जंटनें पिस्तूल झाडायला सुरवात केली तर—छाती घट्ट करून तो बेफिकीर दिसण्याचा प्रयत्न करीत होता. उगाच खोटं हास्य त्यानं तोंडावर आणलं होतं. लेनॉक्स बायकांच्या समोर येऊन उभा राहिला.

"चलो, हटो." तो ओरडला.

"नाय हालांचंव—काय करतल्स रे तूं?" पुढें उभ्या असलेल्या नकू साळगांवकरीण आणि साजू मसूरकरीण उद्गारल्या.

मागें उभ्या असलेल्या मालवणी पोलीसांच्या चेहऱ्यावर हास्याची छटा आली; पण त्यांनीं ती दाबून टाकली. त्या काय म्हणाल्या तें लेनॉक्सला कळलें नाहीं; पण आपलें त्या ऐकत नाहींत एवढें मात्र त्याला समजलें.

"हट् जाव," म्हणून तो पुढें झाला आणि नकूला बाजूला ढकलूं लागला.

"हटतंय्—थांब तूं!" म्हणून नकूनें त्याच्या टोपीवरती हात मारला. टोपी खाली पडणार होती, पण डाव्या हातानें त्यानें ती सावरली. उजवा हात कमरेच्या पिस्तुलाला घालून तो ओरडला, "शूट् करेंगा!". त्याचा हात पिस्तुलाकडे जातो न जातो तोंच साजूनें त्याचं मनगट पकडलं. तिचा हात हिसडून तो मागें झाला. क्षणभर तो खजील झाल्यासारखा झाला. पण त्या बायकांचं त्याला कौतुक वाटलं. पोरगेलासाच

तो होता. नुकताच तो पोलीसांत लागला होता. बायकांच्या अंगावर हात टाकणं त्याला मनापासून आवडत नव्हतं. पिस्तुलाला त्याने खरोखरच थट्टेने हात घातला होता. त्याने पिस्तुलाला हात घातला तेव्हां विठूचा थरकांप झाला आणि दोन पावलं तो मागेंच हटला. पण साजूनें त्याचं मनगट पकडल्या-बरोबर तो जेव्हां मागें सरला तेव्हां विठूला चुकचुक वाटली. साजूनें जें केलं तें पुढारी म्हणून आपण करायला पाहिजे होतं, त्याला वाटलं. क्रांतिकारकाच्या कसोटीची ती वेळ होती. पण ती वेळ गेली होती. दुसऱ्या क्षणाला धीर करून तो पुढें सरला. पण त्या क्षणाला लेनॉक्स मागें सरून स्वतःची फजिती झांकण्याकरतां म्हणा किंवा त्या बायकांचं खरोखरच कौतुक वाटून म्हणा, बायकांकडे बघून मोठ्यांदा हंसत होता.

"हुप्यो वांदर खंयचो—हंसता आणीक–" बायकांपैकीं कांहीं हंसत उद्गारल्या.

लेनॉक्स विठूजवळ आला आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवून 'बायकांना तूं समजावून सांग' म्हणून त्याला सांगूं लागला.

"तेंका सांगून काय होवचां नाय." बायका म्हणाल्या.

त्या ऐकणार नाहींत म्हणून विठूनें त्याला सांगितलें. लाठीहल्ला करण्याचा हुकूम त्याला देववेना. तास दीडतास बायकांना समजावण्याचे त्यानें खूप प्रयत्न केले. पण ते सगळे निष्फळ झाले. तोंपर्यंत संपफोड्यांपैकीं बरेचसे लाजेनें किंवा

भीतीनें निघूनही गेले होते. शावकशाला लेनॉक्सच्या नरमपणाचा राग आला होता. पण त्याचा कांहीं इलाज नव्हता. बरेचसे संपफोडे निघून गेल्यामुळें त्यादिवशीं बायकांना पांगून टाकण्याची आवश्यकताही उरली नव्हती. संपफोडे गेले होते. पण बायका संध्याकाळपर्यंत तिथें बसून होत्या. सहा वाजतां गिरणीचीं फाटकें लागलीं आणि त्या घरोघर जाऊं लागल्या. त्या गेल्यानंतर पोलीसांची तुकडीही निघून गेली. लेनॉक्स मात्र विठूबरोबर बोलत बराच वेळ उभा होता. त्याच्यासारख्या मुलांनीं या प्राणघातक चळवळीच्या भानगडींत कशाला पडावं, वगैरे वगैरे कांहींतरी चांगलीशी नोकरी करावी बऱ्याच उपदेशाच्या गोष्टी त्याला तो सांगत होता. विठूला तो उपदेश कांहीं पटत नव्हता. दण साहेब आपल्याशीं बरोबरीच्या नात्यानें बोलतो याचा त्याला अभिमान वाटत होता, आणि आनंदहि होत होता. संध्याकाळीं तो संघाच्या कचेरींत आला तेव्हा आपण आणि बायकानीं किती यशस्वीपणें आजचे पिकेटिंग केलें याचा सर्व रिपोर्ट त्यानें भाई ठकारनां दिला; आणि लेनॉक्स आपल्यापुढें किती नरम आला हेंहीं त्यानें सांगितलें.

त्यादिवशीं रात्रीं घरीं यायला त्याला चांगले नऊ साडे नऊ वाजले. त्याच्या आधींच सात वाजतां चाळींतल्या पिकेटिंग करायला गेलेल्या बायका परत आल्या होत्या. त्यानां पाहल्या—बरोबर जनामावशी कडाडली, "तुमचो फुडारी खंय गेलो गो? मेलो उंडग्यासारखो फिरता—सकाळपासून् पोटांत अन्नाचो घास

नाय–ह्यां असां उपाशी बसलसंय वाट बघीत मेल्याची.!" पोर जेवायला आला नाहीं म्हणून खरोखरच ती उपाशी राहली होती.

" तूं उपाशी कित्याक रवलस? तेनां खाल्लयान् आसात् खंय तरी," नकू साळगाकवरीण जनामावशीचं समाधान करीत म्हणाली.

" मेल्याचा तोंड बगूचंय नाय हूनान् रोज म्हनतंय, पन् जीव रवना नाय जळ्ळो!" जनामावशी उद्गारली.

संपाच्या आणि पिकेटिंगच्या गमती नकू मावशीला सांगूं लागली. आज सार्जंटची कशी गंमत केली तीहि तिनें सांगितली; पण जनामावशीला त्यांचे ते संप नि त्या लाल बावट्यांच्या मिरवणुकी यांचा मनापासून संताप येई.

" सुक्षेमपणान् अन् खांवचा सोडून भांडणां कसलीं करतास धन्याबरोबर," ती नकूला म्हणाली, " लालबावटो काय देतलो तुमकां?—–धोंडे?"

" बाये, धोंडेसुद्धां सुखान् खांवक् देनत नाय हूनान संप करूंचो लागता–बायल मानसाच्या आंगार हात टाकूनसुद्धां मागें सरनत् नाय ते मेले मास्तर. जीव नकोसो करतत हुनान् भायर पडाचां लागता," नकू सांगूं लागली.

" आसागो म्हायत्. मेळांत तां खांवचा नी गप बसाचां—होये कित्यांक हे ढंग? शेट लोक ते शेट लोक–तेंच्या बरोबर भांडान् कसो निभाव लागात?"

जनामावशीचं हे तत्वज्ञान नकूनें पुष्कळ वेळां ऐकलं होतं.

आणखी ऐकायला ती तयार नव्हती. इकडच्या तिकडच्या गोष्टी करून ती आपल्या खोलींत निघून गेली.

साडेनऊ वाजतां विठू घरीं आला तेव्हां जनामावशीनें त्याच्यावर, त्याच्या चळवळींवर आणि त्याच्या पुढाऱ्यांवर शिव्या-शापांचा वर्षाव केला.

"अगे आये, पण," विठू तिला सांगूं लागला, "आतां रातचां पण एखादे येळ माकां घराक् येंवक मेळाचा नाय्—हो चांदताऱ्याचो संप माकांच चलंवचो आसा—फुडारी सगळे तुरुं-गांत—ठकारसाहबाक भायर पडाची सोय नाय्—माकांच सगळां करूंका होयां—"

"शिरां घाल तुझ्या फुडाऱ्याच्या तोंडार! मेले हंयसून थंयसून पैशे खातत् नी लोकांच्या पोरांक भिकेक लावतत—", जनामावशी तणतणली.

"कोण पैशे खातत? तुकां काय म्हायत् आसा?—ठकार साहब एम्. ए. झालो तेव्हां चारशें रुपयाची नोकरी तेचो बापूस तेंका देय होतो—ती मोडून तो कामगारांच्या चळवळींत इलो—तेचो बापूस मोटो सरकारी हुद्देदार आसा—", विठू आपल्या पुढा-ऱ्यांची तरफदारी करूं लागला.

"तांच सांगतय्—तेंका खावक् पिऊक् आसा भरपूर—तुझां कोन आसा मेल्या? तुकां होये कित्याक हे चाळे? गिरनींत नाय् तर खंय् तरी काम कर बगूं—माझ्यान् काय आतां होना नाय्—"

" थोडी थांबशीत तर समजात तुकां. असो संप करून करून आमी लालबावट्याचां राज्य करतलंव—मग सगळ्या काम-गारांक् नी गरीबांक भरपूर खावक् पिऊंक मेळतांला. ह्या सग-ळ्यांचां राज्य जावन् आमचा राज्य होतांला !",

भावी कामगार राज्याचं चित्र विठू रेखाटू लागला.

" मेलास राज्य करतले ! साह्यब गेले तर भटबामण येतीत—तुमच्या आज्यापंज्यान् कदीं राज्य केल्लां काय रे ? शेतांत खपाचां, नाय्तर गिरनींत मरांचां—दुसरां काय—राज्ये कर-तले—राज्य करनारांची तोंडा बघा !—," भातभाकरी वाढून त्याच्या पुढ्यांत ताट आपटीत जनामावशी म्हणाली.

चार घास कसेतरी तोंडांत टाकून विठू बिछान्यावर पडला. झोंपतेवेळीं त्या दिवशीं घडलेल्या इतर कुठल्याही प्रसंगापेक्षां लेनॉक्ससाहेबानें स्वतःशीं दाखवलेल्या मित्रभावाची त्याला राहून राहून आठवण होत होती, आणि आपण कुणी तरी मोठा माणूस आहोंत असें वाटत होतें.

दुसरे दिवशीं सकाळीं सात वाजतांच 'चांदताऱ्या'वरच्या पिकेटिंगची व्यवस्था पहायला विठू गेला. दुपारीं बारा साडेबारा झाले तरी तो घरीं जेवायला आला नाहीं. जनामावशीला चैन पडेना. 'चांदताऱ्या'वर कांहींतरी धरपकड झाल्याची बातमी नुकतीच चाळींत आली होती. आज दुपारीं जेवायला येतो म्हणून विठूनें सांगितले होतें. काल रात्रीं आपण वाटेल तसं बोलले म्हणून रागानें तो आला नाहीं कीं कांहीं बरंवाईट झालं, या

विचारानं म्हातारी अस्वस्थ झाली. एका डब्यांत तिनें जेवण बांधून घेतलं, आणि तडक ती 'चांदताऱ्या'कडे जायला निघाली.

'चांदताऱ्या'च्या फाटकाजवळ आज मोठा आणीबाणीचा प्रसंग होता. सार्जंट् लेनॉक्स ऐवजीं सार्जंट बॅरी आज लाठीबंद पोलीसाना घेऊन आला होता. कोंवळ्या मनाचा लेनॉक्स निरुपयोगी आहे हें पाहून सार्जंट बॅरी येईल अशी व्यवस्था शावकशानें केली होती. सार्जंट बॅरीनें आल्याबरोबर विठूला दरडावून दोनचार प्रश्न विचारले. तो उत्तर देण्याचा प्रयत्न करतो न करतो तोच गचांडी धरून त्याला त्यानें गिरफदार केला, आणि हवालदाराकडे पोलीसांची तुकडी सोंपवून बॅरी स्वतः एकदोन पोलीसांसह विठूला घेऊन चौकीवर गेला. मी परत यायच्या आंत तुम्हीं जर इथून हाललां नाहींत तर पुढच्या प्रसंगाला तयार रहा म्हणून बायकाना बजावून सांगून तो गेला होता. बायकांचा निश्चय कायम होता. नकू आणि साजू सगळ्यांना धीर देत होत्या. इतक्यांत समोरून जनामावशी येतांना त्यांच्या दृष्टीला पडली. तुझा पोर पकडला गेला, हें म्हातारीला कसं सांगायचं या विचारांत नकू आणि साजू होत्या, तों म्हातारी त्यांच्यापुढें येऊन थडकली.

"खंय नायसो झालो तुमचो फुडारी ?", म्हातारी गरजली.

"तेंका पकडून व्हेल्यानी पोलीसांनीं", नकू आणि साजू म्हणाल्या.

म्हातारी क्षणभर दचकली.

" बरां झालां—तसांच होयां मेल्याक—असोच खंय तरी मरतलो—मी म्हणयंच—" तिच्या चेहेऱ्यावर तीव्र दुःख दिसत होतें, पण तिच्या तोंडांतून संतापाचे शब्द बाहेर पडत होते. नकू आणि साजू तिच्या तोंडाकडे पहात होत्या. काय बोलावें तें त्यांना सुचेना.

म्हातारी वळली आणि तडक घरीं जायला निघाली. चार पावलें ती गेली, पण पुढें तिचें पाऊल उचलेना. नकू आणि साजू मागून तिच्याकडे पहात होत्या. डोळ्यांना पदर लावून ती स्फुंदत होती. अनावर हुंदक्यानीं तिचं जीर्ण शरीर थरथरत होतं. नकू आणि साजू तिच्याजवळ गेल्या, आणि तिच्या पाठीवर हात ठेवून म्हणाल्या, " मावशे–गे–मावशे, रडतस कित्याक् ?-—सुटात तो एखादे एळीं–नुसती चवकशी करून तेका सोडतीत असां कोण तरी म्हणा होतो मघांशीं."

" तेना काय केल्यान गो ?", हुंदके आवरून ती बोलूं लागली, " थंय नुसतो उभो–रवलो हुनान पकडतत ह्यां काय ? —ह्या पोलीसाकनी नी गिरणीवाल्याकनी गाडनारो कोन नाय काय गो ?"

" तेंका गाळी देवन् काय होतांला ?", नकू म्हणाली, " सगळ्यांनीं मेळान् काय केलां तर इातय असां फुडारी म्हण-तात, पन तूं फुडाऱ्याक नी आमकांच गाळी घालतस !"

"माकां काय समजतासा गो ! माझां म्हाताऱ्याचां काय

आयकतास ?", म्हातारी स्वतःवरच रागावून बोलत होती. आतां घराक जावन् तरी काय करूं !—हंयंच बसतंय तुमच्या-बरोबर."

" मी तांच सांगनार होतंय तुकां", नकू म्हणाली.

" घराक जावन्—खावन् नी पिवन् करूंचा आसां तरी काय ? एक पोर होतो तो पन न्हेल्यानी मेल्यानी !", तिला आंतून अगदीं कढ येत होते आणि गळा भरून आल्यामुळें तिचा आवाज घोगरा झाला होता; " तुमचां नशीब तां माझां—हंयच काय तां माझां करा." सर्व बायका बसल्या होत्या त्यांच्यांत नेऊन पुढेंच नकूनें आणि साजूनें म्हातारीला बसविली.

इतक्यांत बॅरी परत आला. त्याची कठोर नजर चहूं-बाजूला फिरली, सर्वांचे चेहरे एकदम गंभीर झाले. पोलीसांना जवळ बोलावून तो बायकांच्या समोर उभा राहिला. " चलो, एकदम उठ जाव !" तो ओरडला.

" नाय् उठाचंव,—तुझ्या बापाशीची जमीन आसा काय रे ?" त्याच्याहीपेक्षा मोठ्या आवाजांत जनामावशी ओरडली. सर्व बायका आणि आजूबाजूला उभे असलेले कामगार तिच्याकडे चमकून पाहूं लागले. तिला पुढारी व्हायची इच्छा नव्हती, किंवा तिला कुणी पुढारी केलंही नव्हतं. ती आपोआपच पुढारीण झाली. तिच्या तोंडातले शब्द विरतात न विरतात तोंच बॅरीनें खूण केली आणि जोराचा लाठीहल्ला सुरू झाला. बरेचसे पोलीस मालवणी होते, आणि आपल्याच बायकांवर काठी चालवणें

त्यांच्या मनाला कसेसेंच वाटत होतें; पण बॅरीच्या कठोर नजरेखालीं त्यांच्या हातांची यांत्रिक हालचाल चालू होती. बायकांत पांगापांग झाली. कांहीं सैरावैरा पळूं लागल्या. जनामावशीच्या पाठीवर,——खांद्यावर एकदोन काठ्या पडल्या, पण त्याचं तिला कांहींच वाटलं नाहीं. ती भानावरच नव्हती. विजेसारखी ती इकडून तिकडे फिरत होती, आणि पळणाऱ्या बायकांच्या आंगावर ओरडत होती, " भेकरांसारखी पळतांस काय गो? घोव घरांत मारता तेंवा निपचीत् पडान रवतास, आनी आतां पळांक काय झालां?" तिचा नवरा दारु पिऊन तिला मारी तेव्हां पहिल्या पहिल्यांदा ती स्वस्थ बसे, पण कांहीं दिवसांनीं त्याला खालीं पाडून ती त्याला करकचून बांधून ठेवूं लागली होती. तरुणपणीची ती शक्ती आणि स्फूर्ति आज कित्येक वर्षांनीं तिच्या अंगांत पुन्हां संचरली होती. आपल्या पोराला विनाकारण पकडणारी आणि निरपराध बायकांच्या अंगावर बेगुमानपणें काठ्या चालवणारी अन्यायी शक्ती आतां तिला डोळ्यासमोर दिसत होती; आणि प्राण गेला तरी बेहत्तर पण या शक्तीशीं शेवटपर्यंत झगडलंच पाहिजे ही जाणीव तिच्या नकळत तिच्या नसानसांतून उसळत होती. तिची धांवाधांव पाहून बॅरी तिच्याजवळ गेला आणि दंडाला धरून तिला बाजूला ओढूं लागला. एक हिसका देऊन तिनें आपला हात सोडवला, आणि आपल्या लांब, हाडकुळ्या बोटांच्या दोन्ही पंजांनीं बॅरीचा गळा पकडला. कासावीस होऊन बॅरीनें तिचे हात हिसडून टाकले. आपली कॉलर नीट

करीत तिला पकडण्याचा हुकूम तो देणार इतक्यांत मागे उभा असलेला मालवणी हवालदार म्हणाला, " साहेब वेडी आहे ती— सोडून द्या तिला." स्वतःची अब्रु आणखी कोर्टांत जायला नको म्हणून किंवा खरोखरच दयेनें असेल, बॅरीनें तो विचार सोडून दिला. त्या दिवसाचा लाठीहल्ला थांबला. मालकांनीं फाटकाला कुलूप लावल्यामुळें पिकेटिंगचीही जरुरी उरली नव्हती. सर्व बायका रांगा करून कामगार मैदानाकडे जात होत्या. काय व्हायचं तें होऊंद्या, असा विचार करून कॉमरेड ठकार आज सभेंत बोलणार होते. बायकांची मिरवणूक रस्त्यानें चालली होती. कुणाच्या डोक्यावर टेंगळें आलीं होतीं. कुणाच्या डोक्याना झालेल्या जखमांना कामगारवस्तींतल्या एकदोन डॉक्टरांनीं स्वतः होऊन पुढें येऊन पट्टया मारल्या होत्या. मिरवणूकीच्या अग्रभागीं जनामावशी आणि तिच्या दोन्ही बाजूना नकू आणि साजू हातांत लालबावटा घेऊन चालत होत्या.

सभा सुरू झाली. कॉमरेड ठकार उभे राहिल्याबरोबर सर्वत्र शांतता पसरली. एक एक शब्द मोजून शांतपणें कॉमरेड् ठकार बोलत होते; "...हा लालबावटा तुमच्या रक्तानं लाल झाला आहे...एकट्यादुकट्यानं दंगामस्ती करून कांहीं होणार नाहीं...शांत राहून आपण एकजूट केली पाहिजे... सर्व कामगारांची एकजूट झाल्यावर जगांत अशी एकही दुष्ट शक्ती नाहीं कीं जी..."

जनामावशी लक्ष देऊन ठकारांचा शब्दान् शब्द ऐकत

होती. लाल बावटा तुमच्या रक्तानं लाल झाला आहे, असं ते म्हणाल्याबरोबर तिनं आजूबाला पाहलं. कांहीं बायकांच्या पातळांचे पदर त्यांच्या डोक्यावरल्या जखमांच्या रक्ताने लाल झालेले तिच्या दृष्टीला पडले. लाल बावटयाला ती इतके दिवस शिव्या देत होती; पण आतां तिला तो आपलासा वाटूं लागला.

हा बोलणारा माणूस कांहीं तरी खरं सांगतो आहे असं तिला वाटलं. तिची नजर सभोंवार फिरली. हजारो कामगारांचे आणि त्यांच्या बायकांचे वेडेबगडे, खडबडीत चेहेरे तिला दिसूं लागले. आपल्या पोराला धरणाऱ्या,—या बायकांना छळणाऱ्या जगांतल्या सर्व—सर्व दुष्टपणाला गाडून टाकणारी—नेस्त-नाबूत करून टाकणारी महान् शक्ति या प्रचंड समुदायांत खास आहे, असं तिला वाटूं लागलं. पण काय करायचं—कसं करायचं हें तिच्या अज्ञ, अशिक्षित मनाला समजत नव्हतं. तिची नजर समोर उभा राहून शांतपणें, आत्मविश्वासानें बोलणाऱ्या कॉमरेड् ठकारकडे गेली. तरतरीत नाकाच्या, धगधगणाऱ्या डोळ्यांच्या, त्या उंच सडपातळ तरुणाची शुभ्र खादीधारी मूर्ती, सर्व दुष्टपणाला पुरून उरणाऱ्या त्या महान् शक्तीचं एकमेव प्रतीक आहे असं तिला वाटलं. तिला काय वाटत होतं हें तिला समजत नव्हतं; पण हा सांगेल तें ऐकलं पाहिजे, हा नेईल तिथं गेलं पाहिजे, अन्यायाशीं झगडायचं म्हणजे याचे हात बळकट केले पाहिजेत एवढं तिला कळलं. ठकारांचा प्रत्येक शब्द लक्ष देऊन ती ऐकूं लागली. संप नेटानं

पुढें चालवायचा म्हणजे संपवाल्यानां अन्न वाटायला पैसे पाहिजेत; तेव्हां कामगारांनीं शक्य असेल तें संपफंडाला दिलं पाहिजे, असं म्हणून ठकार स्तब्ध उभे राहिले. जनामावशीनें इकडे तिकडे पाह्यलं. कुणी पुढें होईना. जवळचं सर्व खिडुक-मिडुक विकल्यानंतर तांब्याच्या पट्टीवर सोन्याचा पत्रा बसवलेली तोळा दीड तोळ्याची एक पाटली तिच्या हातांत राहिली होती, ती तिनें ओढून काढली; आणि 'ही घेवा माझी पाटली' म्हणून ठकारांच्या पुढें नेऊन ठेवली. म्हातारीचं हें कृत्य पाहून सर्वत्र एकच खळबळ उडाली आणि इतर बायकांनीं भराभर, कुणी पायांतलीं चांदीचीं जोडवीं तर कुणी चांदीच्या वाक्या अशा वस्तू ठकारांच्या पुढें नेऊन टाकावयाला सुरुवात केली. विठूच्या आईकडे ठकार अभिमानानें आणि कृतज्ञतेनें पहात होते.

दुसऱ्या दिवसापासून जनामावशी रोज पिकेटिंगसाठीं इतर बायकांबरोबर जात होती. विठूचा पोलीस फार छळ करताहेत आणि त्याच्याकडून कांहींतरी कबुलीजबाब काढून घेण्याचा प्रयत्न करताहेत अशा बातम्या कानावर येत होत्या. पण त्यांचं आतां जनामावशीला कांहींच वाटेना. या अन्यायाशीं झगडायचं म्हणजे वेगळं कांहीं करायला नको, संपाचा हा प्रचंड झगडा चालवणं म्हणजेच आपल्या पोरावरल्या अन्यायाशीं झगडण्या-सारखं आहे, याची तिला खात्री वाटत होती. आणि त्याच खात्रीनें ती अधिकाधिक उत्साहानें पिकेटिंगमध्यें भाग घेत होती. पुन्हां चवथ्या दिवशीं भयंकर लाठीमार झाला. या लाठीमारांत

जनामावशीच्या डोक्याला जबरदस्त जखम झाली. पण ती हॉस्पिटलांत राह्यला कबूल होईना. डोक्याला बॅंडेज बांधून डॉक्टरनीं तिला घरीं पाठविली आणि पडून राह्यला सांगितलें.

संध्याकाळीं सात साडेसातचा सुमार होता. आपल्या खोलींत जनामावशी पडून होती. इतक्यांत दारावर कुणी टक् टक् केलं म्हणून उठून तिनें दार उघडलं, तो दारांत विठू उभा. ती आश्चर्यचकित झाली. तिला आनंदही झाला.

"ह्यांरे काय?—तूं कसो हंय् अवचित्?", ती उद्गारली.

"आये, आतां तुकां काम करूक् नको," विठू तिला आनंदानें सांगूं लागला, "माकां म्हयन्याक् साट रुपये मेळतले. आनी काम पन् काय भारी नाय्?"

"काय, म्हणतस काय तूं," तिच्या डोक्यांत कांहींच प्रकाश पडेना.

"अगे, तो पोलीसांचो साह्यब माझ्या ओळखीचो होतो ना?—तेनां नोकरी दिल्यान् माकां. कोनाक् सांगता कामा नये,—पण पोलिसांचो खबरो म्हणून काम करतलंय् मी—ठकारसाह्यबाच्या हपीसांत नेहमीसारख्यांच जावंचा—बसाचां, आणि कोन काय करतत तां पोलीसांक सांगाचां."

"मेल्या, काय म्हणतस काय?—साट रुपयांसाठीं त्या देवमाणसांचे गळे कापतलस? शिरां पडली तुज्या तोंडार—"

"अगे पन—" आई कां रागावली तें न कळल्यामुळें तो चांचरत बोलूं लागला, "तूंच माकां काम करूक सांगा होतस